| सुनावणीचा दि. 24.11.2016 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 1 | 3180/ 2015 | श्री. सुनिल धर्मदास राखे, ब-हामसिंग नगर, हनुमान मंदिराजवळ, नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड जि.नांदेड | ज.अ.अ. नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड जि.नांदेड | 0 | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 2 | 3188/ 2015 | श्री. सुनिल धर्मदास राखे, ब-हामसिंग नगर, हनुमान मंदिराजवळ, नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. पाणी पुरवठा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड जि.नांदेड | ज.अ.अ. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 3 | 3323/ 2015 | श्री. शितल रामेश्वर खांडील, राहणार-शिवाजी मंगल कार्यालय, बसवेश्वर नगर, जुना कौठा, नांदेड जि. नांदेड | सहाय्यक आयुक्त-आस्थापना-नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड जि.नांदेड | उपायुक्त-प्रशासन- नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 4 | 2995/ 2015 | श्री. सखाराम रघुनाथ कुलकर्णी, राहणार- दत्तविला अपार्टमेन्ट, सरपंचनगर, नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे कार्यालय, नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 5 | 3309/ 2015 | श्री. लक्ष्मण जी. येताळे, राज्यभवन निवास, कॉलेज रोड, धर्माबाद ता.धर्माबाद जि.नांदेड-431809 | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग-उत्तर, नांदेड जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 6 | 3299/ 2015 | श्री. त्र्यंबक के. जेटेवाड, राहणार- तिरुमला निवास एन.डी-42 डीएच-13/2 वसंतराव नाईक कालेज,सिडको, ता.जि.नांदेड | ज.मा.अ. महसूल गृह-शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | ज.अ.अ.जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 7 | 3138/ 2015 | श्री. एकनाथ मल्हारराव बनसोडे, राहणार- शैलेश निवास- नागसेन निवास, नागसेन नगर, आय.टी.आय.रोड, हदगांव | नायब तहसीलदार-आस्थापना-विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | तहसीलदार-सर्वसाधारण-जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 8 | 3324/ 2015 | श्री. वाघमारे परमेश्वर ग्यानोबा, मु.पो.कांडली-बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, हदगांव ता.हदगांव जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 9 | 3156/ 2015 | श्री. रवि ताराचंद धोटे, द्वारा-सावळे-7- गिरीजाई, सन्मान कॉलनी, शिव रोड, बेलानगरच्या पूर्वेस, तरोडा खुर्द, नांदेड जि.नांदेड | वैद्यकीय सहाय्यक, उप-जिल्हा रुग्णालय, हदगांव ता.हदगांव जि.नांदेड | वैद्यकीय अधिक्षक, उप-जिल्हा रुग्णालय, हदगांव ता.हदगांव जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 10 | 3055/ 2015 | श्री. दिलदारखान इलियासखान, राहणार- रजा पॅलेस, नुराणी कॉलनी, जामखेड-431201 ता.जामखेड जि.अहमदनगर | ज.मा.अ.कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नांदेड जि.नांदेड | ज.अ.अ.कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

## सुनावणीचा दि. 24.11.2016

| | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 3056/ 2015 | श्री. दिलदारखान इलियासखान, राहणार- रजा पॅलेस, नुराणी कॉलनी, जामखेड-431201 ता.जामखेड जि.अहमदनगर | ज.मा.अ.कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नांदेड जि.नांदेड | ज.अ.अ.कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 12 | 3289/ 2015 | श्री. शेख वहाबोद्यीन करीमोद्यीन मु.पा. तळेगांव ता.उमरी जि.नांदेड | ज.मा.अ. तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उमरी जि.नांदेड | ज.अ.अ. तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उमरी जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 13 | 2924/ 2015 | श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,05, विर सावरगर मार्ग, बाबानगर, नांदेड जि.नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड जि.नांदेड | प्राचार्य, शासकिय तंत्रनिकेतन नांदेड, जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 14 | 2925/ 2015 | श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,05, विर सावरगर मार्ग, बाबानगर, नांदेड जि.नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड जि.नांदेड | प्राचार्य, शासकिय तंत्रनिकेतन नांदेड, जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 185 | 2938/ 2015 | श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,05, विर सावरगर मार्ग, बाबानगर, नांदेड जि.नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड जि.नांदेड | प्राचार्य, शासकिय तंत्रनिकेतन नांदेड, जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 16 | 2939/ 2015 | श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,05, विर सावरगर मार्ग, बाबानगर, नांदेड जि.नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड जि.नांदेड | प्राचार्य, शासकिय तंत्रनिकेतन नांदेड, जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 17 | 2941/ 2015 | श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,05, विर सावरगर मार्ग, बाबानगर, नांदेड जि.नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड जि.नांदेड | प्राचार्य, शासकिय तंत्रनिकेतन नांदेड, जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 18 | 2942/ 2015 | श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,05, विर सावरगर मार्ग, बाबानगर, नांदेड जि.नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड जि.नांदेड | प्राचार्य, शासकिय तंत्रनिकेतन नांदेड, जि.नांदेड | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 19 | 3035/ 2015 | डॉ. नंदकुमार शेषेराव मगर, द्वारा-पाटील निवास, सिंहगड सोसायटी, कन्हेरी रोड, लातूर जि.लातूर | सहाय्यक कुलसचिव, शैक्षणिक विभाग, -संलग्नीकरण- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ज्ञानतिर्थ-विष्णुपूरी | संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ज्ञानतिर्थ-विष्णुपूरी नांदेड- | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| 20 | 3224/ 2015 | श्री. पांढरे सत्तारमियाँ बशीरसाब, राहणार- श्री.एस.मंजील, महिला स्वाधार केंद्राजवळ, इंडिया नगर, लातूर जि.लातूर | उपकुलसचिव-परिक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, ज्ञानतिर्थ-विष्णुपूरी नांदेड-431606. | परिक्षा नियंत्रक, परिक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, ज्ञानतिर्थ-विष्णुपूरी नांदेड-431606. | | वेळ सकाळी 10.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2016 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 51 | 2975/ 2015 | श्री. नारायण हरी ढेपे, रा. सहयोगनगर-वर्कशॉप, नांदेड ता.जि.नांदेड | ज.मा.अ. पंचायत समिती, मुदखेड ता.मुदखेड जि.नांदेड | ज.अ.अ. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 52 | 3009/ 2015 | श्री. गुलाब देवराव सुर्यवंशी, राहणार-पिंपळकौठा-चोर-पो.दरेगांव ता.मुदखेड जि.नांदेड | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळकौठा-चोर-पो.दरेगांव ता.मुदखेड जि.नांदेड | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 53 | 2956/ 2015 | श्री. ज्ञानेश्वर गणेशराव माने, राहणार-पारवा पो.कांडली बु. व्हाया- तामसा ता.हिमायतनगर जि.नांदेड | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय, हिमायतनगर जि.नांदेड | गट विकास अधिकारी,पंचायत समिती, हिमायतनगर जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 54 | 3151/ 2015 | श्री. गंगाराम सुरेश तिमापूरे, मु.पो.सिरंजनी, ता.हिमायतनगर जि.नांदेड | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सिरंजनी ता.हिमायतनगर जि.नांदेड | विस्तार अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, हिमायतनगर जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 55 | 3115/ 2015 | श्री. बापुराव गोविंदराव सिरुरकर, राहणार-प्राजक्ता निवास, दत्त मंदिराजवळ, ब्राम्हण गल्ली, अहमदपूर ता.अहमदपूर जि.लातूर- | ज.मा.अ. सहाय्यक लेखाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, लोहा जि.नांदेड | गट विकास अधिकारी,पंचायत समिती, लोहा जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 56 | 3116/ 2015 | श्री. बापुराव गोविंदराव सिरुरकर, राहणार-प्राजक्ता निवास, दत्त मंदिराजवळ, ब्राम्हण गल्ली, अहमदपूर ता.अहमदपूर जि.लातूर- | ज.मा.अ. सहाय्यक लेखाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, लोहा जि.नांदेड | गट विकास अधिकारी,पंचायत समिती, लोहा जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 57 | 3300/ 2015 | श्री. चंदुसिंग पापासिंग ठाकूर, राहणार-नावंदी ता.नायगांव खै. जि.नांदेड | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नावंदी ता.नायगांव खै. जि.नांदेड | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव खै. जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 58 | 3282/ 2015 | श्री. मारोती विजय परोडवाड, मु.जंगमवाडी पो.फुलवळ ता.कंधार जि.नांदेड | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जंगमवाडी ता.कंधार जि.नांदेड | विस्तार अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, कंधार जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 59 | 3282-अ/2015 | श्री. मारोती विजय परोडवाड, मु.जंगमवाडी पो.फुलवळ ता.कंधार जि.नांदेड | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय, कंधार जि.नांदेड | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 60 | 3283/ 2015 | श्री. मारोती विजय परोडवाड, मु.जंगमवाडी पो.फुलवळ ता.कंधार जि.नांदेड | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जंगमवाडी ता.कंधार जि.नांदेड | विस्तार अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, कंधार जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

| सुनावणीचा दि. 24.11.2016 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 21 | 3353/ 2015 | श्री. राजु विठ्ठलराव भोंडे, राहणार- व्यंकट रमनानगर, बालाजी मंदिराजवळ, मु.पो. मुक्रमाबाद ता. मुखेड जि.नांदेड | ज.मा.अ. समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | ज.अ.अ. समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड | 0 | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 22 | 2936/ 2015 | श्री. शेळगे संजय दत्तराम, राहणार- जिल्हा परिषद हायस्कुल वाघी, ता.जि.नांदेड | ज.मा.अ. कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग-प्राथमिक-जिल्हा परिषद, नांदेड | शिक्षणाधिकारी-प्राथमिक-जिल्हा परिषद, नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 23 | 2997/ 2015 | श्री. मुगाजी पुरभाजी बुरुड, मु.पो. इळेगांव ता.गंगाखेड जि.परभणी | ज.मा.अ. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 24 | 3089/ 2015 | श्री. मोतीराम गयबु काळे, रा. जानापूरी पो.वडेपूरी-एसआरटी, ता.लोहा जि.नांदेड | सहाय्यक अभियंता, श्रेणी-1, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग, नांदेड जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 25 | 3090/ 2015 | श्री. मोतीराम गयबु काळे, रा. जानापूरी पो.वडेपूरी-एसआरटी, ता.लोहा जि.नांदेड | सहाय्यक अभियंता, श्रेणी-1, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग, नांदेड जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 26 | 3362/ 2015 | श्री. संभाजी वामनराव पाटील, राहणार- रक्त क्रांती कार्यालय, एन-डी-42,पी-2 हडको, नविन नांदेड जि.नांदेड | सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांचे कार्यालय, नांदेड | सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 27 | 3361/ 2015 | श्री. संभाजी वामनराव पाटील, राहणार- रक्त क्रांती कार्यालय, एन-डी-42,पी-2 हडको, नविन नांदेड जि.नांदेड | सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांचे कार्यालय, नांदेड | सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 28 | 2953/ 2015 | श्री. बाबासाहेब जळबाजी मस्के, पोलीस नाईक/1964, पोलीस स्टेशन, देगलूर जि.नांदेड | सहायक पोलीस अधीक्षक-मु-नांदेड जि.नांदेड | अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 29 | 3366/ 2015 | श्री. अर्चना सुरेश औताडे, द्वारा-जाधव किराणा, मस्तगड रेल्वे स्टेशन रोड, मंमादेवी मंदिराजवळ, जालना ता.जि.जालना | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन-भाग्यनगर,नांदेड जि.नांदेड | अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 30 | 2967/ 2015 | श्री. विजयानंद हिरामण गायकवाड, द्वारा- श्री.वावळे याचे घर पोर्णिमा नगर, नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ शास्त्री नगर, नांदेड जि.नांदेड | ज.अ.अ. महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ शास्त्री नगर, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2016 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 31 | 2966/ 2015 | श्री. विजयानंद हिरामण गायकवाड, द्वारा- श्री.वावळे याचे घर पोर्णिमा नगर, नांदेड जि.नांदेड | ज.मा.अ. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प, नांदेड जि.नांदेड | ज.अ.अ. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 32 | 3354/ 2015 | डॉ.एस.एस.जाधव, रा.पटेल नगर, धर्माबाद ता.धर्माबाद जि.नांदेड | ज.मा.अ. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, यशवंत कॉलेज समोर, नांदेड जि.नांदेड | ज.अ.अ. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, यशवंत कॉलेज समोर, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 33 | 3158/ 2015 | श्री. सुभाष भास्करराव हिवाळे, राहणार-नवयुग कॉलनी, भावसींगपूरा, सावित्रीबाई शाळेजवळ, औरंगाबाद जि.औरंगाबाद | ज.मा.अ. तहसील कार्यालय, नांदेड जि.नांदेड | तहसीलदार-तहसील कार्यालय, नांदेड जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 34 | 3088/ 2015 | श्री. मोतीराम गयबु काळे, राहणार- जानापूरी पो.वडेपूरी-एस.आर.टी. ता.लोहा जि.नांदेड | ज.मा.अ. नायब तहसीलदार-रोहयो- तहसील कार्यालय, देगलूर जि.नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 35 | 3166/ 2015 | श्री. योगेश संभाजी शेळके, मु.मोरगांव पो.कांडली-बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड | तलाठी, सज्जा कांडली-बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 36 | 3265/ 2015 | श्री. सतिश ज्ञानोबा आनेराव, राहणार- शिवाजी चौक, लोहा ता.लोहा जि.नांदेड | ज.मा.अ. तहसील कार्यालय, कंधार जि.नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 37 | 2886/ 2015 | श्री. मोतीराम गयबु काळे, राहणार-जानापूरी पो.वडेपूरी-एसआरटी ता.लोहा जि.नांदेड | अव्वल कारकुन-निवडणूक शाखा, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, बिलोली ता.बिलोली जि.नांदेड | उपविभगीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, बिलोली ता.बिलोली जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 38 | 3091/ 2015 | श्री. मोतीराम गयबु काळे, राहणार-जानापूरी पो.वडेपूरी-एसआरटी ता.लोहा जि.नांदेड | अव्वल कारकुन-निवडणूक शाखा, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, बिलोली ता.बिलोली जि.नांदेड | उपविभगीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, बिलोली ता.बिलोली जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 39 | 3092/ 2015 | श्री. मोतीराम गयबु काळे, राहणार-जानापूरी पो.वडेपूरी-एसआरटी ता.लोहा जि.नांदेड | अव्वल कारकुन-निवडणूक शाखा, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, देगलूर ता.देगलूर जि.नांदेड | उपविभगीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, देगलूर ता.देगलूर जि.नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| 40 | 2885/ 2015 | श्री. मोतीराम गयबु काळे, राहणार- जानापूरी पो.वडेपूरी ता. लोहा जि.नांदेड | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, देगलूर जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | | वेळ सकाळी 11.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

| सुनावणीचा दि. 24.11.2016 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 61 | 3395/ 2015 | श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब रा.महानगरपालीका, शाळा क्रमांक 32 बरकत नगर, [illegible] | ज.मा.अ. लातूर महानगरपालीका, लातूर | ज.अ.अ. उपायुक्त, लातूर महानगरपालीका, लातूर | 0 | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 62 | 3347/ 2015 | श्री. अंकुश रामचंद्र चामे, मु.पो. चिखली ता.अहमदपूर जि.लातूर | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदपूर ता.अहमदपूर जि.लातूर | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 63 | 3057/ 2015 | श्री. प्रल्हाद उत्तमराव मुगळे, रा. प्लॉट नं.84, सुतमील कम्पाऊंड, सुतमील रोड, लातूर जि.लातूर | मुख्याध्यापक, परिमल माध्यमिक विद्यालय, नारायण नगर, लातूर जि.लातूर | शिक्षणाधिकारी-माध्यमिक-जिल्हा परिषद, लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 64 | 3053/ 2015 | श्री. विश्वंभर निवृत्ती चव्हाण, रा.रामेश्वर ता.जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रामेशवर ता.जि.लातूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 65 | 3194/ 2015 | श्री. भागवत दगडू जाधव, रा. सिध्दार्थ नगर, अहमदपूर ता.अहमदपूर जि.लातूर | नायब तहसीलदार-पुरवठा-तहसील कार्यालय, अहमदपूर जि.लातूर | तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 66 | 3443/ 2015 | श्री. उमाकांत धोंडीराम डीगे, मु.पो. अंधोरी ता.अहमदपूर जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, अहमदपूर जि.लातूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 67 | 3444/ 2015 | श्री. बालाजी विठ्ठलराव वाघमारे, रा.अंधारी ता.अहमदपूर जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, अंधारी ता.अहमदपूर जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, अहमदपूर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 68 | 3118/ 2015 | श्री. देविदास माधवराव पवार झरीकर, पो.जानवळ ता.चाकूर जि.लातूर | ज.मा.अ. पंचायत समिती, चाकूर ता.चाकूर जि.लातूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 69 | 3119/ 2015 | श्री. देविदास माधवराव पवार झरीकर, पो.जानवळ ता.चाकूर जि.लातूर | ज.मा.अ. पंचायत समिती, चाकूर ता.चाकूर जि.लातूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 70 | 3276/ 2015 | श्री. मोहनसिंग रणजितसिंग बायस, रा. किल्लारी ता.औसा जि.लातूर | तलाठी, सज्जा किल्लारी ता.औसा जि.लातूर | मंडळ अधिकारी, किल्लारी ता.औसा जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

| सुनावणीचा दि. 24.11.2016 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 41 | 2887/ 2015 | श्री. मोतीराम गयबु काळे, राहणार- जानापूरी पो.वडेपूरी ता. लोहा जि.नांदेड | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, देगलूर जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | 0 | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 42 | 2919/ 2015 | श्री. भागवत आत्माराम पुपलवाड, राहणार- पाटोदा ता.नायगांव . जि.नांदेड | उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, नायगांव जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 43 | 3281/ 2015 | श्री. विजय मारोती परोडवाड, मु. जंगमवाडी ता.कंधार जि.नांदेड | सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कंधार ता.कंधार जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 44 | 2994/ 2015 | श्री. सखाराम रघुनाथ कुलकर्णी, राहणार- दत्तविला अपार्टमेन्ट, सरपंचनगर, नांदेड जि.नांदेड | सहाय्यक अभियंता-श्रेणी-1 सार्वजनिक बांधकाम उपविभाग-दक्षीण- नांदेड जि.नांदेड | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 45 | 3325/ 2015 | श्री. गोपाळरेडडी कोनरेडडी कोटावाड, महा-ई सेवा केंद्र बाळापूर पो.ता. धर्माबाद जि.नांदेड | सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, धर्माबाद ता.धर्माबाद जि.नांदेड | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नांदेड जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 46 | 2918/ 2015 | श्री. भागवत आत्माराम उपलवाड, मु.पो. पाटोदा ता.नायगांव जि.नांदेड | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा-त.व.- ता.नायगांव खै. जि.नांदेड | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नायगांव खै. जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 47 | 3272/ 2015 | श्री. अनिल तेजेराव सिरसे, मु.पो.मिलिंदनगर मुखेड ता.मुखेड जि.नांदेड | ज.मा.अ. स्व. लिलावती सतिष आव्हाड, डि.फार्मसी कॉलेज होकर्णा तांडा ता.मुखेड जि.नांदेड | प्राचार्य, स्व. लिलावती सतिष आव्हाड, डि.फार्मसी कॉलेज होकर्णा तांडा ता.मुखेड जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 48 | 2902/ 2015 | श्री. मोहम्मद अब्दुल खुद्युस पि.मोहम्मद अब्दुल रशीद, द्वारा-431, शेख मारुफ, उमर फारुख मस्जिद जवळ, डॉ.एकबाल नगर, परभणी- | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय, भोकर ता.भोकर जि.नांदेड | मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकर ता.भोकर जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 49 | 2937/ 2015 | श्री. संजय दत्तराव शेळगे, रा. जिल्हा परिषद हायस्कुल वाघी, ता.जि.नांदेड | ज.मा.अ. पंचायत समिती, नांदेड | ज.अ.अ. शिक्षणाधिकारी- प्राथमिक- जिल्हा परिषद, नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| 50 | 2974/ 2015 | श्री. नारायण हरी ढेपे, रा. सहयोगनगर-वर्कशॉप, नांदेड ता.जि.नांदेड | ज.मा.अ. पंचायत समिती, मुदखेड ता.मुदखेड जि.नांदेड | ज.अ.अ. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड जि.नांदेड | | वेळ दुपारी 12.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2016 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अपील क्र | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | जन अपीलीय अधिकारी | त्रयस्थ | सुनावणीची वेळ |
| 71 | 3275/ 2015 | श्री. अहमद रसुल शेख, रा. तुरुकवाडी ता.शिरुर अनंतपाळ जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, तुरुकवाडी ता. शिरुर अनंतपाळ जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 72 | 2792/ 2015 | श्री. सवारे संग्राम ग्यानोबा, मु.पो.तिरुका ता.जळकोट जि.लातूर-413532 | तलाठी सज्जा, घोणसी, ता. जळकोट जि.लातूर | तहसीलदार, तहसील कार्यालय, जळकोट जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 73 | 2946/ 2015 | श्री. शेख मौलासाब पिता नन्हेसाब रा. कंधार वेस,दबिरपूरा- उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 74 | 3065/ 2015 | श्री. मातीराम गणपती राठोड व श्री. मेघराज हिरामण पवार, रा. सोमनाथपूर ता.उदगीर जि.लातूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपूर ता.उदगीर जि.लातूर | विस्तार अधिकारी-पंचायत-पंचायत समिती, उदगीर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 75 | 3168/ 2015 | श्री. रामलिंग करबसप्पा मळभागे, राहणार- श्री-निवास-आडत लाईन जवळ, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | उप कार्यकारी अभियंता, महावितरण-उपविभाग, उदगीर-ग्रामीण ता.उदगीर जि.लातूर | कार्यकारी अभियंता, महावितरण, विभागीय कार्यालय, उदगीर ता.उदगीर जि.लातूर | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 76 | 3411/ 2015 | श्री. विजय ज्ञानबा राऊत मु.कानडखेडा-खु- पो.कनेरगांव-नाका- ता.जि.हिंगोली-431513 | नायब तहसीलदार-महसुल-जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 77 | 3453/ 2015 | श्री. संतोष तुळशीराम दळवी, रा. मु.पो.हत्ता नाईक ता.सेनगांव जि.हिंगोली | मुख्याध्यापक, गजानन प्राथमिक आश्रम शाळा, हत्ता नाईक ता.सेनगांव जि.हिंगोली | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, हिंगोली जि.हिंगोली | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 78 | 3412/ 2015 | श्री. विजय ज्ञानबा राऊत मु.कानडखेडा-खु- पो.कनेरगांव-नाका- ता.जि.हिंगोली-431513 | उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली जि.हिंगोली | अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, हिंगोली जि.हिंगोली | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 79 | 3413/ 2015 | श्री. विजय ज्ञानबा राऊत मु.कानडखेडा-खु- पो.कनेरगांव-नाका- ता.जि.हिंगोली-431513 | ज.मा.अ. तहसील कार्यालय, हिंगोली जि.हिंगोली | तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली जि.हिंगोली | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| 80 | 3414/ 2015 | श्री. विजय ज्ञानबा राऊत मु.कानडखेडा-खु- पो.कनेरगांव-नाका- ता.जि.हिंगोली-431513 | ज.मा.अ. तहसील कार्यालय, हिंगोली जि.हिंगोली | तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली जि.हिंगोली | | वेळ दुपारी 02.00 वा. |
| | | सहायकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | | |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३१८०/२०१५

श्री. सुनिल धर्मदास राखे, — अपिलार्थी
रा. बऱ्हामसिंग नगर, हनुमान मंदिराजवळ, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.०६.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. अनिल वसंतराव जोशी, वरिष्ठ लिपीक, मनपा, नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०६.०७.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.०१.०५.२००९ ते दि.३०.०८.२००९ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"पाणी पुरवठा विभागामधील जुना मोंढा व किल्ला या झोनमधील दि.०१.०५.२००९ ते ३०.०८.२००९ पर्यंत श्री. के. टी. शास्त्री यांनी या कालावधीत लेबर किती लावले व किती पेमेंट केले याची पुर्ण संचिकेची झेरॉक्स देणे व लेबर मजूर कोणते लावले यांचे नावे देणे. "

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

" माहिती कोणत्याही प्रकारची दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.११.०८.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीची नोटीस पाठविल्याचे दिसून येत आहे तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणताही प्रतिसाद दिला नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर अजिबात सुनावणी घेतलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात कलम १९ (६) चा भंग दिसून येतो. अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्यामुळे अपिलार्थी यांचे अपील मंजूर करण्यात येत असून वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोच जतन करुन ठेवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मंजूर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याने त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन सादर करावा.

४. सदर निर्णयाची प्रत वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर तामील करावी व त्याची पोच अभिलेखात जतन करुन ठेवावी.

५. संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांच्या दि.११.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर अजिबात सुनावणी न घेतल्यामुळे कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(२) नुसार त्यांचविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

---

(अपील क्र.३१८०/२०१५, ३/३)

जावक क्र. 6663 दि. 28-12-16

२

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३१८८/२०१५

श्री. सुनिल धर्मदास राखे, — अपिलार्थी
रा. बऱ्हामसिंग नगर, हनुमान मंदिराजवळ, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.०६.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. अनिल वसंतराव जोशी, वरिष्ठ लिपीक, पाणी पुरवठा विभाग, मनपा, नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०६.०७.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, सन २००९ ते २०११ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

" सन २००९ ते २०११ मध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये अधिकृत नळ तपासणी मध्ये कनेक्शन अधिकृत केलेले व कोणकोणत्या प्लंबरने किती कनेक्शन अधिकृत केलेले आहेत त्याची पूर्ण यादी व प्लंबरचे नाव देणे."

" माहिती कोणत्याही प्रकारची दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.११.०८.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१०.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून त्रयस्थ पक्षाच्या सहमतीशिवाय देता येणार नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) नुसार स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत असून ती त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरुपाची माहिती असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि.१०.०८.२०१५ रोजीचे पत्र बाजूला सारण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणताही सारासार विचार न करता मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याचा निष्कर्ष काढलेला आहे. त्यांच्या अशा कृतीमुळे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात कलम ७ (१) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर अजिबात सुनावणी घेतलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात कलम १९ (६) चा भंग दिसून येतो. अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्यामुळे अपिलार्थी यांचे अपील मंजूर करण्यात येत असून वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोच जतन करुन ठेवावी.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी खेटया घालाव्या लागल्या. त्याचा त्यांना मानसिक व शारिरीक त्रास झाला आहे. त्यामुळे ते अधिनियामातील कलम १९(८)(ख) नुसार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मंजूर करण्यात येत आहे.
२. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत

टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणी पुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा जाणीवपूर्वक भंग केल्याने त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन सादर करावा.

४. सदर निर्णयाची प्रत वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर तामील करावी व त्याची पोच अभिलेखात जतन करुन ठेवावी.

५. संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांच्या दि.११.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर अजिबात सुनावणी न घेतल्यामुळे कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा.

६. अपिलार्थी यांना रु.२,०००/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. सदर नुकसान भरपाईची रक्कम कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या वेतनातून कपात करुन अपिलार्थीस अदा करावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---



जावक क्र. 6659 दि. 29-12-15

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३३२३/२०१५

श्री. शितल रामेश्वर खांडील, अपिलार्थी
रा. शिवाजी मंगल कार्यालय, बसवेश्वर नगर, जुना कौठा, नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, आस्थापना, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, प्रशासन, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.२२.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, आस्थापना, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड, एल. के. चौरे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०३.०७.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितलेली आहे.

"मनपातील कर्मचारी श्री. भालचंद्र मसलेकर यांच्याबाबत. १. कधी पासून मनपाच्या सेवेमध्ये कार्यरत? २. कोणत्या पदावर कार्यरत आहेत ? ३. दरमहा त्यांना किती पगार मिळतो ? ३० दिवसात सध्यस्थितीत ते कोणत्या विभागात व पदावर कार्यरत आहेत याबाबत माहिती दयावी. "

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

माहिती मिळाली नसल्यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१४.०८.२०१५रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

"माहिती दिली नाही" असे कारण नमुद करुन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जास दि.१०.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून त्रयस्थ पक्षाच्या सहमतीशिवाय ती देता येणार नसल्याचे अपिलार्थी यांना कळवून माहितीचा अर्ज निकाली काढलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणी संदर्भात दि.२१.०९.२०१५ रोजी सुनावणी नोटीस निर्गमीत केलेली आहे. तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०६.१०.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या निवेदनामध्ये, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्यामुळे प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी बोलवू नये असे नमूद केलेले आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपाआयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.१४.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटत आहे. यास्तव प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपाआयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन, अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत निर्णय पारित करावा. तसेच या सुनावणीदरम्यान अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनसार देय होणारी माहिती विनाविलंब उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपाआयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या दि.१४.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र. ३३२३/२०१५ २/२)

जावक क्र. 6606 दि. 27/12/16

(४)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९९५/२०१५

श्री. सखाराम रघुनाथराव कुलकर्णी, — अपिलार्थी
रा. दत्तविला अपार्टमेन्ट, सरपंचनगर, नांदेड, ता. जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, यांचे
कार्यालय, नांदेड दक्षिण, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.२०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, यांचे कार्यालय, नांदेड दक्षिण, नांदेड, श्री. एस. ए. कोटलवार व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री, एम. व्ही. सांगवीकर, उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०९.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाची शारदा कन्स्ट्रक्शन अॅन्ड कार्पोरेशन प्रा. लि., नांदेड ची माहिती खालीलप्रमाणे मागितलेली आहे.

१. या कंपनीस दिलेल्या कामाची प्रशासकीय मान्यता २. तांत्रीक मान्यता ३. T.C. (टेक्नीकल) मान्यता

४. कार्यारंभ आदेश ५. मोजमाप पुस्तीकेतील (M.B.) नोंदण्यात आलेल नोंदी ६. फॉर्म ४७ ची प्रत ७. S.E. ने मान्यता दिलेल्या E.I.R.L. (एक्स्ट्रा ॲटम) ची प्रत ८. C.E. औरंगाबाद S.E. नांदेड व S.E.V.Q.C.C. औरंगाबाद यांच्या पाहणीची प्रत या आर्थिक वर्षात दिलेल्या कामापैकी पुर्ण झालेली कामे व अपुऱ्या कामाची सद्यस्थिती ९. या सर्व प्रती साक्षांकित करुन दयावेत.

" मुदत संपूनही निकाल दिला नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१३.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

" दि.२५.०५.२०१५ रोजी सुनावणी घेऊन १५ दिवसात माहिती देण्याचा निर्णय देऊनही माहिती दिली नाही " असे कारण नमुद करुन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जास दि.१६.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये विहित मुदतीत प्रतिसाद देऊन एका विषयावरील माहितीची मागणी करावी असे कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०५.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाद्वारे त्यांनी १५ दिवसात विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन दोन वर्षाच्या कामाची यादी व कार्यारंभ आदेशाच्या प्रती प्रथम अपिलाच्या निर्णयासोबत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती दि.२६.०८.२०१५ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२६.०८.२०१५ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या लेखी निवेदनामध्ये, माहिती मिळाली असल्याचे नमूद करुन अर्ज निकाली काढण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एका विषयाची माहिती १० मुद्यांद्वारे मागितली असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.०९.०३.२०१५ रोजीचा असून आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे. कलम ६(१) नुसार प्राप्त झालेल्या माहिती अर्जासंदर्भात तीस दिवसाच्या मुदतीत प्रतिसाद देणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहिती अधिकाराअंतर्गत प्राप्त होणाऱ्या माहितीसाठीच्या अर्जांना कलम ७ (१) नुसार

विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देण्यासाठी दक्ष राहावे लागेल. अन्यथा कलम ७(१) च्या भंगास जबाबदार धरण्यात येऊन कलम २०(१) नुसार कारवाई करण्यात येईल अशी त्यांना या प्रकरणाच्या अनुषंगाने समज देण्यात येत आहे. वरील विवेचनाच्या अधीन राहून अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र. २९९५-२०१५ १/३)

जावक क्र. 6596 दि. 27-12-16

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३३०९/२०१५

श्री. लक्ष्मण जी. येताळे, अपिलार्थी
रा. राज्यभवन निवास, कॉलेज रोड, धर्माबाद,
ता. धर्माबाद, जि. नांदेड-४३१ ८०९.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर नांदेड, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२१.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी आज रोजीच्या सुनावणीसाठी आयोगासमोर विनाअनुमती अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी चौकशी करुन आवश्यकतेनुसार उचित कार्यवाही योजावी, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१८.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.१०.०८.२०११ ते दि.१५.०४.२०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"उपविभागात कार्यरत आसलेले शाखा अभियंता श्री. वैजनाथ मारोतीराव दाडगे यांना दिलेल्या कामाचा (कार्यभार) कार्यालयीन आदेशाच्या संपूर्ण प्रमाणित सत्यप्रती देणेबाबत. "

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

" माहिती दिली नसल्यामुळे " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१७.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

" माहिती मिळाली नसल्यामुळे " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणताही प्रतिसाद दिला नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात कलम १९ (६) चा भंग दिसून येत नाही. अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्यामुळे अपिलार्थी यांचे अपील मंजूर करण्यात येत असून वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर नांदेड, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोच जतन करुन ठेवावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मंजूर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर नांदेड, नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उत्तर नांदेड, नांदेड यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याने त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त

होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन सादर करावा.

४. सदर निर्णयाची प्रत वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर तामील करावी व त्याची पोच अभिलेखात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.३३०९/२०१५, ३/३)

जावक क्र. 6669 दि. 28-12-16

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना उक्त निर्णयातील परिच्छेद क्र.२, नुसार आवश्यक कार्यवाहीसाठी

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.-३२९९/२०१५

श्री. त्र्यंबक के. जेटेवाड,
रा. तिरुमला निवास, एन. डी-४२, डीएच-१३/२, वसंतराव नाईक
कॉलेज, सिडको, ता. जि. नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार (महसूल) गृह-शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) गृह-शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, श्री. बोलोलू एन.बी. उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०१.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. मा. माहिम विद्यासागर राव, राज्यपाल यांना व मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना दि.२९.०५.२०१५ रोजी मौजे जावरला ता. किनवट येथे श्री. नारायण शिडाम व श्री. विजय खुपशे व इतर आदिवासी समाजाचे कार्यकर्ते यांनी मन्नेरवारलू व कोळी महादेव समाजाचे विरुध्द जी तक्रार दिलेली आहे त्या तक्रारीची छायांकित प्रत साक्षांकित करुन मिळणे बाबत.
२. दि.२८.०५.२०१५ रोजी श्रीमती मंगाराणी व इतर मन्नेरवारलू समाज संघटनेने मा. माहिम विद्यासागर राव यांना जे निवेदन दिलेले आहे त्या निवेदनाची छायांकित प्रत मिळणे बाबत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि.२२.११.२०१६ रोजीचे निवेदन आयोगास सादर केले. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली असल्याचे व समाधान झाले असल्याचे नमूद करुन अपील अर्ज निकाली काढण्याची विनंती केलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.३२९९/२०१५ २/२)

जावक क्र. 6657 दि. 28-12-15

(7)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३१३८/२०१५

श्री. एकनाथ मल्हारराव बनसोडे,     अपिलार्थी
रा. शैलेश निवास, नागसेन निवास, नागसेन नगर, आय.टी.आय. रोड, हदगांव, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, आस्थापना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.०१.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, आस्थापना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, श्रीमती यु. ए. इज्जपवार उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०४.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. मंडळ निरिक्षक पदावर पदोन्नती झालेल्या आदेश वर्ष १९७६, १९८०, १९८३, १९८६, १९८८ या सालाची वर्षनिहाय माहिती द्यावी.
२. मंडळ निरिक्षक पदावर पदोन्नती देताना घेण्यात आलेल्या (प्रोसिडिंग) ठरावाच्या १९७६, १९८०, १९८१, १९८३, १९८६, १९८८ या सालाची वर्ष निहाय माहिती द्यावी.
३. मंडळ निरिक्षक यांना मंडळ अधिकारी पदावर पदस्थापना केलेल्या शासनाचे आदेशाची माहिती द्यावी.

४. महाराष्ट्र शासनाची केंद्रिय अधिनियमान्वये तयार केलेले नियम व आदेश जानेवारी २०१२ मधील तरतुदी माहिती द्यावी.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

" माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१५.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२१.०९.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

" माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वतःहून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, आस्थापना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रथमतः दि.२०.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील माहितीची अभिलेख शाखेकडे मागणी करुन मुद्दा क्र.३ व ४ च्या संदर्भातील माहितीसाठी कार्यालयामध्ये व्यक्तिशः उपस्थित राहुन सदर माहिती प्राप्त करुन घेणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी सुनावणी घेऊन दि.२१.०९.२०१५ रोजी निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२१.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये, मागितलेली माहिती फार जुनी असल्यामुळे व अभिलेखा कक्षामध्ये शोध घेऊन ती आढळून येत नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे शक्य होत नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद

अपिलार्थी यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत आहे. त्यामुळे अपील मंजूरीस पात्र ठरत आहे.

अतः तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थी यांना आवश्यक

असलेल्या माहितीसंदर्भातील संपूर्ण संचिकांचा १५ दिवसात शोध घेऊन माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदर संचिकांचा शोध घेऊनही त्या आढळ न झाल्यास अशा संचिका जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार यथोचित कारवाई योजावी, अशी तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड या प्रकरणी आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपील मंजूर करण्यात येत आहे.

२. तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भातील संपूर्ण संचिकांचा वर नमूद केल्याप्रमाणे १५ दिवसात शोध घेऊन माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदर संचिकांचा शोध घेऊनही त्या आढळ न झाल्यास अशा संचिका जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार यथोचित कारवाई योजावी, अशी तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड या प्रकरणी आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.३१३८/२०१५, ३/३)

जावक क्र. 6593 दि. 27-12-15

प्रत :- माहितीस्तव अग्रेषित.

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

(४)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३३२४/२०१५

श्री. वाघमारे परमेश्वर ग्यानोबा, — अपिलार्थी
मु. पो. कांडली बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, हदगांव,
जि. नांदेड.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२२.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीसाठी आयोगासमोर विनाअनुमती अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी चौकशी करुन आवश्यकतेनुसार कार्यवाही योजावी, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१७.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, २००३ ते २०१४ या कालावधीत कांडली बु. रेल्वेगेट ते कोकातांडा येथील डांबरीकरण रस्त्याची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. मौजे कांडली बु., रेल्वेगेट ते कोंकातांडा येथील डांबरीकरण रस्ता केलेल्या यंत्रणेचे परवाना प्रमाणपत्र. २. कामाचे प्रशासकीय मान्यता प्रत ३. कामाचे अंदाजपत्रक ४. कामाबाबतचा शेरा ५. काम पुर्ण व अपुर्ण किती.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

"माहिती प्राप्त झाली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२२.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.१०.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

" माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणताही प्रतिसाद दिला नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात कलम १९ (६) चा भंग दिसून येत नाही. अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्यामुळे अपिलार्थी यांचे अपील मंजूर करण्यात येत असून वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगांव, जि. नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोच जतन करुन ठेवावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मंजूर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगांव, जि. नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगांव, जि. नांदेड यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याने त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे

आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन सादर करावा.

४. सदर निर्णयाची प्रत वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर तामील करावी व त्याची पोच अभिलेखात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---



जावक क्र. 6595 दि. 27-12-16

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना उक्त निर्णयातील परिच्छेद क्र.२, नुसार आवश्यक कार्यवाहीसाठी

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३१५६/२०१५

श्री. रवि ताराचंद धोटे, अपिलार्थी
द्वारा- सावळे-७, गिरीजाई, सन्मान कॉलनी, शिव रोड, बेलानगरच्या पुर्वेस, तरोडा खुर्द, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वैद्यकिय सहाय्यक, उप जिल्हा रुग्णालय, हदगांव, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
वेद्यकिय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय, हदगांव, जि. नांदेड.

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.०४.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीसाठी आयोगासमोर विनाअनुमती अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड यांनी चौकशी करुन यथोचित कार्यवाही योजावी, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२०.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.१९.१०.२०११ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"श्री. रवि ताराचंद धोटे यांचा आपल्या रुग्णालयात दि.१९.१०.२०११ रोजी सकाळी नांदेड ACB पोलिस द्वारा MLC (तपासणी वैद्यकीय) केली होती त्याची प्रत."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

" माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचकडे कलम १९ (१) अन्वये दि.१०.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

" निकाल दिला नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी स्वतःची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदरची माहिती नियमानुसार उपलब्ध करुन दयावी किंवा न देण्याबाबतची कारणमिमांसा पुढील सुनावणीच्यावेळी सादर करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती दिल्याचा अहवाह किंवा माहिती न देण्याबाबतची कारणमिमांसा पुढील सुनावणीस सादर करावी. सुनावणीसाठीची पुढील तारीख सर्व संबंधितांना आयोगातर्फे यथावकाश कळविण्यात येईल.

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

(अपील क्र. ३१५६-२०१५, १/२)

जावक क्र.------------- दि.---------------

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड यांना उक्त निर्णयातील परिच्छेद क्र.२, नुसार आवश्यक कार्यवाहीसाठी

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३०५५/२०१५

श्री. दिलदारखान इलियासखान,
रा. रजा पॅलेस, नुराणी कॉलनी, जामखेड,
जि. अहमदनगर-४३१ २०१. — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.२६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड, श्री. लाडके शिवसांब विठ्ठलराव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.०१ एप्रिल २०१४ ते दि.३१ मार्च २०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"जिल्हा नांदेड अंतर्गत सर्व तालुका कोरडवाहू शेतीचे संपुर्ण कार्यक्रम प्रकल्प अहवाल आलेले अनुदान व खर्च झालेले अनुदान सर्व तालुका निहाय सर्व माहिती सिडी मध्ये मिळावी."

" माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२६.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी संदर्भात नोटीस पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

" अपूर्ण माहिती प्राप्त " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अर्जाद्वारे नांदेड जिल्हयातील तालुका निहाय माहिती सी डी मध्ये मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२२.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज तालुका कृषि अधिकारी, नांदेड, मुदखेड, अर्धापूर, लोहा, कंधार, देगलूर, मुखेड, बिलोली, नायगाव, धर्माबाद, किनवट, माहूर, हदगाव, हिमायतनगर, भोकर, उमरी यांच्याकडे वर्ग केलेला आहे. तसेच काही माहितीसाठी तंत्र शाखा -२ यांच्याकडे दि.२४.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अर्ज वर्ग केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी तंत्र शाखा (विस्तार) यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपिलार्थी यांना दि.१७.०७.२०१५ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच तालुका कृषि कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती दि.२१.०७.२०१५ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना तीन तालुक्यांची माहिती उपलब्ध करुन दिली असून उर्वरित तालुक्याची माहिती आज रोजी सोबत आणलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी उर्वरित १३ तालुक्यांची माहिती एकत्रित करुन सोबत आणलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेने उपलब्ध करुन द्यावी, या निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती विविध कार्यालयाशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयाकडून माहिती एकत्रित करुन अपिलार्थी यांना

उपलब्ध करुन दिली असल्यामुळे विलंब दिसून येतो. तथापि झालेला विलंब जाणीवपूर्वक नसल्यामुळे कलम ७ (१) चा भंग दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२२.०६.२०१५ रोजी सुनावणी असल्याबाबत नोटीस दिल्याचे दिसून येत आहे. तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात अधिनियमातील कलम १९(६) चा भंग दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.२६.०५.२०१५ रोजी प्रथम अपिलावर सुनावणी न घेतल्यामुळे अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.३०५५/२०१५, ३/३)

जावक क्र. 6571 दि. 27-12-16

(११)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३०५६/२०१५

श्री. दिलदारखान इलियासखान, — अपिलार्थी
रा. रजा पॅलेस, नुराणी कॉलनी, जामखेड,
जि. अहमदनगर-४३१ २०१.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड, श्री. लाडके शिवसांब विठ्ठलराव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.०१ एप्रिल २०१४ ते दि.३१ मार्च २०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"जिल्हा नांदेड अंतर्गत सर्व तालुका शेती शाळेचे पूर्ण अहवाल आलेले अनुदान व अनुदान खर्च कसा झाला त्याच्या (देयक) बिलांचे सर्व तालुका निहाय माहिती सिडी मध्ये मिळावी."

" माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२६.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी संदर्भात नोटीस पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

" अपूर्ण माहिती प्राप्त " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अर्जाद्वारे नांदेड जिल्हयातील तालुका निहाय माहिती सी डी मध्ये मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती त्यांच्या अधिनस्त असलेल्या ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे त्या कार्यालयाकडे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज वर्ग केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती अपिलार्थी यांना दि.०७.०७.२०१५ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सहा तालुक्यांची माहिती उपलब्ध करुन दिली असून उर्वरित दहा तालुक्याची माहिती आज रोजी सोबत आणलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी उर्वरित १० तालुक्यांची माहिती एकत्रित करुन सोबत आणलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेने उपलब्ध करुन द्यावी, या निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती विविध कार्यालयाशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयाकडून माहिती एकत्रित करुन अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्यामुळे विलंब दिसून येतो. तथापि झालेला विलंब जाणीवपूर्वक नसल्यामुळे कलम ७ (१) चा भंग दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२२.०६.२०१५

रोजी सुनावणी असल्याबाबत नोटीस दिल्याचे दिसून येत आहे. तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात अधिनियमातील कलम १९(६) चा भंग दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.२६.०५.२०१५ रोजी प्रथम अपिलावर सुनावणी न घेतल्यामुळे अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा.

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

(अपील क्र.३०५६/२०१५, ३/३)

जावक क्र. 6583 दि. 27-12-15

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३२८९/२०१५

श्री. शेख वहाबोद्दिन करिमोद्दिन,
मु. पो. तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड. — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उमरी,
जि. नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उमरी,
जि. नांदेड. : उत्तरवादी क्र.२

### (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

### निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१६.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीसाठी आयोगासमोर विनाअनुमती अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, नांदेड यांनी चौकशी करुन यथोचित कार्यवाही योजावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी कलम ६ (१) अन्वये दि.२९.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, इ. स. २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"MREGS अंतर्गत उमरी तालुक्यात चालु असलेल्या कामाची माहिती."

अपिलार्थी यांनी उपरोक्त माहिती, माहिती अर्जामध्ये तक्ता नमूद करुन त्या तक्त्यामध्ये अपेक्षित केलेली आहे.

" माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.११.०८.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेता दि.२१.०८.२०१५ रोजी अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

" माहिती मिळून दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि.२९.०५.२०१५ रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड यांच्याकडे माहितीचा अर्ज सादर केलेला आहे. तथापि माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड यांनी त्यांच्या दि.२०.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज गट विकास अधिकारी, उमरी / वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर / लागवड अधिकारी, भोकर / तालुका कृषि अधिकारी, उमरी यांच्याकडे वर्ग केलेला आहे. या नंतर अपिलार्थी यांनी दि.११.०८.२०१५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड यांनी त्यांच्या दि.२१.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये, माहितीसाठीचा अर्ज तालुका कृषि कार्यालयास प्राप्त झाला नसल्यामुळे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नसल्याचे व माहितीचा अर्ज या कार्यालयास सादर करावा म्हणजे माहिती देता येईल असे अपिलार्थी यांना कळवून प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.२९.०५.२०१५ रोजीचा आहे. तथापि माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज तालुका कृषि कार्यालय, उमरी, जि.नांदेड यांच्याकडे वर्ग केलेला आहे. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या आत संबंधित कार्यालयाकडे वर्ग करणे आवश्यक होते. त्यांनी असा अर्ज जवळजवळ तीन आठवडे इतक्या विलंबाने वर्ग केलेला आहे. त्यांची ही बाब अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग ठरते.

प्रस्तुत प्रकरणातील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जामध्ये तक्ता नमूद करुन त्या तक्त्यामध्ये माहिती अपेक्षित केलेली आहे. तथापि अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नसल्यामुळे ती अपिलार्थीस देय होणार नाही. पण अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असेल ती अपिलार्थी यांना या प्रकरणी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल, असे आयोगाचे मत आहे.

अत: प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड यांनी अपिलार्थी

यांच्या दि.११.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर नव्याने सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे संयुक्तिक होईल असे आयोगाचे मत आहे. यास्तव प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या दि.११.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दोनही बाजुचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारित करावा. तसेच प्रथम अपिलाच्या या सुनावणी दरम्यान, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती ज्या स्वरुपात कार्यालयाकडे उपलब्ध असेल ती माहिती अपिलार्थी यांना कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपिलाच्या या सुनावणीसाठी अपिलार्थी यांना नोंदणीकृत डाकेने सूचित करण्यात यावे. या निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड यांना कलम १९ (८) (ग) व कलम २० (१) नुसार शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन सादर करावा.

३. सदर निर्णयाची प्रत विद्यमान तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड यांच्यावर तामील करावी व त्याची पोच अभिलेखात जतन करुन ठेवावी.

४. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या दि.११.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दोनही बाजुचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारित करावा व प्रथम अपिलाच्या या सुनावणीदरम्यान अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

(अपील क्र.३२८९/२०१५, ३/३)

जावक क्र.- 6582 दि.- 27-12-15

प्रत :- माहिती तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड
२. तहसीलदार, तहसील कार्यालय, उमरी, जि.नांदेड

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९२४/२०१५

श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
पैनगंगा-०५, विर सावरकर मार्ग, बाबानगर, नांदेड. — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
वि.प्र.वै.अनु.,
शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वि.प्र.वै.अनु.,शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड, श्री. बी. व्ही. यादव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२२.०९.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, व्यक्तिशः खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"ज्ञापन क्र. शातंनिना/गोप.शाखा/२०१४/२४६१ दि.१६.०९.१४ चा संदर्भ, तक्रार अथवा टिप्पणी आवक जावक कर्मचाऱ्याला उद्दटपणे बोललेल्या कर्मचाऱ्याचे नांव दिनांक संदर्भ टिप्पणी व तक्रार यांची प्रत, आपल्या संस्थेत / कार्यालयात आल्याचा दिनांक, संदर्भ, टिप्पणी व तक्रार यांची प्रत, माहिती अधिकार अर्ज दि.०८.०८.२०१४, दि.१९.०८.२०१४, दि.२६.०८.२०१४, दि.०९.०९.२०१४, दि.१०.०९.२०१४,दि.१९.०९.२०१४

या अर्ज व अपिलाच्या आवक जावक क्रमांक नोंदणीसह अर्ज व अपील प्रती."

उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वतःहून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे.

" माहिती मिळाली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२२.१०.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२७.०४.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवादामध्ये कथन केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०१६ रोजी रु.१००/- च्या बॉंडपेपर प्राचार्यांना उद्देशून हमीपत्र दिलेले आहे. या हमीपत्रामध्ये अपिलार्थी यांनी, मी (अपिलार्थी) महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई, सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना गेल्या अनेक दिवसापासून वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकाराचा वापर करुन कार्यरत असलेले कार्यालयाबद्दल (शासकीय तंत्रनिकेतन नांदेड) व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांची वैयक्तिक माहिती मागितली असून त्याचा गैरवापर केला आहे. ती माझेकडून (अपिलार्थी) चूक झाल्याचे मान्य करतो व या पुढे असे वर्तन करणार नाही अशी हमी देतो, असे नमूद केलेले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. या व यापूर्वीच्या अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदेर्शनास आले की, अपिलार्थी यांनी ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केले आहेत. आज रोजीही अपिलार्थी यांची प्रस्तुत अपिलासह आणखी पाच व्दितीय अपिले आयोगासमोर विचाराधीन आहेत.

(अपील क्र.२९२४/२०१५, २/५)

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता, बहुतांश माहिती क्लिष्ट स्वरुपाची, वैयक्तिक हेव्यादेव्याची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणातील कार्यवाही करुन घेणेबाबतची, प्रशासनास वेठीस धरुन स्वतःची पकड मजबूत करणे, खुलासे वजा, आरोप प्रत्यारोपाची, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची, शासकीय कामकाज शासनाच्या ज्या मानकांनुसार चालते त्याची माहिती वैगेरे वैगेरे अशा स्वरुपाची असल्याचे दिसून येते. याहीपेक्षा अपिलार्थी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयातील बहुतांश पत्रव्यवहार त्यांनी हाताळलेला असतो व अशा पत्रव्यवहाराच्या अनुषंगानेच माहिती अधिकारात माहितीची मागणे करणे उचित नाही. अपिलार्थी यांची कर्मचारी म्हणून काही अडचण असल्यास त्यांनी वरिष्ठांकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करणे उचित ठरत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेली बहुतांश माहिती क्लिष्ट, गुंतागुंत निर्माण करणारी, आरोप प्रत्यारोप करणारी, सहजासहजी न समजणारी, घडलेल्या घटनेची कागदपत्र स्वरुपातील माहिती अशा स्वरुपाची माहिती असल्याचे दिसून येत आहे. तथापि अशी माहिती एकत्रित करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

राज्य माहिती आयोग
खंडपीठ औरंगाबाद

या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने, अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहिती अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे / खुलासा देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

या व यापूर्वीच्या काही प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अशा प्रकरणी अपिलार्थी संबंधित ज्या कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी आहेत त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागतात. बहुतांश प्रकरणामध्ये अपिलार्थी (अधिकारी / कर्मचारी) माहितीची मागणी करण्याऐवजी कार्यालयीन कामकाजाची, कार्यालयात घडून गेलेल्या एखाद्या घटनेची, स्वत:शी संबंधित एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने कार्यवाहीची अपेक्षा ठेवून माहिती मागणे, सहकारी अथवा वरिष्ठांविषयी आकस ठेवून गुंतागुंत करणारी माहिती मागणे किंवा वैरभावाने माहितीची मागणी करतात. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. आपण ज्या कार्यालयात काम करतो त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागणे सहसा योग्य ठरत नाही. कारण आपण ज्या कार्यालयात कार्यरत आहोत किंवा होतो त्या कार्यालयात कोणती माहिती आहे किंवा कोणती नाही किंवा कोणती माहिती नष्ट केली आहे या बाबी अधिकारी / कर्मचारी यांना ज्ञात असतात असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. अत: असा अधिकार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनाही प्राप्त झालेला आहे. तथापि शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना माहिती अधिकाराचा वापर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचा विसर पडून चालणार नाही असे आयोगाचे मत आहे. विशेषत: अधिकारी / कर्मचारी यांनी माहितीची मागणी करताना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या किंवा संबंधित कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही ही बाब प्रामुख्याने विचारात ठेवणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रमुख उद्दिष्ट नागरिकांना माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने एक व्यवहार्य शासन प्रणाली निर्माण करणे आहे. जेणेकरुन सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण होईल. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रगटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना जसे शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालविणे व मर्यादित साधनसामग्रीचा इष्टतम वापर होणे इ. बाबीस बाधा येणार नाही या बाबी पाहणे आवश्यक आहे. अत: या दोघांचा मेळ घालणे जरुरी आहे. यामुळे शासन सेवेत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहिती अधिकाराचा वापर करताना ही बाब प्रामुख्याने लक्षात ठेवण्याची महत्वाची जबाबदारी आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असून त्यांनी त्यांच्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केलेले आहेत. ही बाब माहिती

(अपील क्र.२९२४/२०१५, ४/५)

अधिकार अधिनियमातील भूमिका व त्यातील उद्दिष्टांच्या विपरित आहे.

अतः माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (घ) नुसार राज्य माहिती आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अपिलार्थी यांचे विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

(अपील क्र.२९२४/२०१५, ५/५)

जावक क्र.- 6552 - दि.- 28-12-16

(14)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९२५/२०१५

श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, — अपिलार्थी
रा. शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,०५, विर सावरकर मार्ग,
बाबानगर, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वि.प्र.वै.अनु.विद्या.,
शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वि.प्र.वै.अनु.विद्या., शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड, श्री. बी. व्ही. यादव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१९.०९.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"द्वितीय पाळी मानधन वाटप आदेश, संदर्भ उपयोगीता प्रमाणपत्र कालावधी माहे जुलै-२०१२ ते माहे ऑक्टोबर-२०१२ नुसार व पैनगंगा ईमारतीचे एकूण क्षेत्रफळ, द्वितीय पाळी मानधन वाटप माहे नोव्हेंबर २०१२ ते डिसेंबर २०१३ उपयोगीता प्रामणपत्र, कार्यालयीन हजेरी पट माहे जुलै २०१३ ते माहे एप्रिल २०१४ ची प्रत, पैनगंगा मासिक सेवा शुल्क."

उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वतःहून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे.

" माहिती मिळाली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१९.१०.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२७.०४.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवादामध्ये कथन केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०१६ रोजी रु.१००/- च्या बाँडपेपर प्राचार्यांना उद्देशून हमीपत्र दिलेले आहे. या हमीपत्रामध्ये अपिलार्थी यांनी, मी (अपिलार्थी) महाराष्ट्रशासन, प्रधान सचिव, महाराष्ट्रराज्य माहिती आयोग, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई, सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना गेल्या अनेक दिवसापासून वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकाराचा वापर करुन कार्यरत असलेले कार्यालयाबद्दल (शासकीय तंत्रनिकेतन नांदेड) व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांची वैयक्तिक माहिती मागितली असून त्याचा गैरवापर केला आहे. ती माझेकडून (अपिलार्थी) चूक झाल्याचे मान्य करतो व या पुढे असे वर्तन करणार नाही अशी हमी देतो, असे नमूद केलेले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. या व यापूर्वीच्या अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदेर्शनास आले की, अपिलार्थी यांनी ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केले आहेत. आज रोजीही अपिलार्थी यांची प्रस्तुत अपिलासह आणखी पाच व्दितीय अपिले आयोगासमोर विचाराधीन आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता, बहुतांश माहिती क्लिष्ट स्वरुपाची, वैयक्तिक हेव्यादेव्याची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणातील कार्यवाही करुन घेणेबाबतची, प्रशासनास वेठीस धरुन स्वतःची पकड मजबूत करणे, खुलासे वजा, आरोप प्रत्यारोपाची, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची, शासकीय कामकाज शासनाच्या ज्या मानकांनुसार चालते त्याची माहिती वैगेरे वैगेरे अशा स्वरुपाची असल्याचे दिसून येते. याहीपेक्षा अपिलार्थी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयातील बहुतांश पत्रव्यवहार त्यांनी हाताळलेला असतो व अशा पत्रव्यवहाराच्या अनुषंगानेच माहिती अधिकारात माहितीची मागणे करणे उचित नाही. अपिलार्थी यांची कर्मचारी म्हणून काही अडचण असल्यास त्यांनी वरिष्ठांकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करणे उचित ठरत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेली बहुतांश माहिती क्लिष्ट गुंतागुंत निर्माण करणारी, आरोप प्रत्यारोप करणारी, सहजासहजी न समजणारी, घडलेल्या घटनेची कागदपत्र स्वरुपातील माहिती अशा स्वरुपाची माहिती असल्याचे दिसून येत आहे. तथापि अशी माहिती एकत्रित करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार उचित ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने, अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहिती अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे / खुलासा देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

या व यापूर्वीच्या काही प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अशा प्रकरणी अपिलार्थी संबंधित ज्या कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी आहेत त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागतात. बहुतांश प्रकरणामध्ये अपिलार्थी (अधिकारी / कर्मचारी) माहितीची मागणी करण्याऐवजी कार्यालयीन कामकाजाची, कार्यालयात घडून गेलेल्या एखाद्या घटनेची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने कार्यवाहीची अपेक्षा ठेवून माहिती मागणे, सहकारी अथवा वरिष्ठांविषयी आकस ठेवून गुंतागुंत करणारी माहिती मागणे किंवा वैरभावाने माहितीची मागणी करतात. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. आपण ज्या कार्यालयात काम करतो त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागणे सहसा योग्य ठरत नाही. कारण आपण ज्या कार्यालयात कार्यरत आहोत किंवा होतो त्या कार्यालयात कोणती माहिती आहे किंवा कोणती नाही किंवा कोणती माहिती नष्टकेली आहे या बाबी अधिकारी / कर्मचारी यांना ज्ञात असतात असे आयोगाचे मत

आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. अत: असा अधिकार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनाही प्राप्त झालेला आहे. तथापि शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना माहिती अधिकाराचा वापर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचा विसर पडून चालणार नाही असे आयोगाचे मत आहे. विशेषत: अधिकारी / कर्मचारी यांनी माहितीची मागणी करताना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या किंवा संबंधित कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही ही बाब प्रामुख्याने विचारात ठेवणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रमुख उद्दिष्ट नागरिकांना माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने एक व्यवहार्य शासन प्रणाली निर्माण करणे आहे. जेणेकरुन सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण होईल. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रगटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना जसे शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालविणे व मर्यादित साधनसामग्रीचा इष्टतम वापर होणे इ. बाबीस बाधा येणार नाही या बाबी पाहणे आवश्यक आहे. अत: या दोघांचा मेळ घालणे जरुरी आहे. यामुळे शासन सेवेत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहिती अधिकाराचा वापर करताना ही बाब प्रामुख्याने लक्षात ठेवण्याची महत्वाची जबाबदारी आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असून त्यांनी त्यांच्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केलेले आहेत. ही बाब माहिती अधिकार अधिनियमातील भूमिका व त्यातील उद्दिष्टांच्या विपरित आहे.

अत: माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (घ) नुसार राज्य माहिती आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अपिलार्थी यांचे विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.२९२५/२०१५, ४/४)

जावक क्र. 12 दि. 4-1-17

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९३८/२०१५

श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, — अपिलार्थी
रा. शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,०५, विर सावरकर मार्ग,
बाबानगर, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वि.प्र.वै.अनु.विद्युत,
शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

राज्य माहिती आयोग
खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०१४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वि.प्र.वै.अनु.विद्युत, शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड, श्री. बी. व्ही. यादव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०९.०९.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"माहिती अधिकारात माहिती मिळविण्याचा हक्क कोणासाठी उपलब्ध आहे. याचा शासन निर्णय, माहिती अर्ज स्विकारणे व नाकारणे याबाबतचा शासन निर्णय, माहिती उघड करण्यातून सुट असलेल्या अधिनियमाचा शासन निर्णय, माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याबाबत कालावधीचा शासन निर्णय, गोपनीय बाबत माहिती अधिकार उघड करण्याचा शासन निर्णय, माहिती अधिकाराचा गैरवापर व गैरर्वनाचा शासन निर्णय या सर्व निर्णयाच्या (GR)प्रती मिळणे."

उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे.

" माहिती दिली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.०९.१०.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२७.०४.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवादामध्ये कथन केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०१६ रोजी रु.१००/- च्या बॉंडपेपर प्राचार्यांना उद्देशून हमीपत्र दिलेले आहे. या हमीपत्रामध्ये अपिलार्थी यांनी, मी (अपिलार्थी) महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई, सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना गेल्या अनेक दिवसापासून वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकाराचा वापर करुन कार्यरत असलेले कार्यालयाबद्दल (शासकीय तंत्रनिकेतन नांदेड) व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांची वैयक्तिक माहिती मागितली असून त्याचा गैरवापर केला आहे. ती माझेकडून (अपिलार्थी) चूक झाल्याचे मान्य करतो व या पुढे असे वर्तन करणार नाही अशी हमी देतो, असे नमूद केलेले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. या व यापूर्वीच्या अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केले आहेत. आज रोजीही अपिलार्थी यांची प्रस्तुत अपिलासह आणखी पाच व्दितीय अपिले आयोगासमोर विचाराधीन आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता, बहुतांश माहिती क्लिष्ट स्वरुपाची, वैयक्तिक हेव्यादेव्याची, स्वत:शी संबंधित एखाद्या प्रकरणातील कार्यवाही करुन घेणेबाबतची, प्रशासनास वेठीस धरुन स्वत:ची पकड मजबूत करणे, खुलासे वजा, आरोप प्रत्यारोपाची, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची, शासकीय कामकाज शासनाच्या ज्या मानकांनुसार चालते त्याची माहिती वैगेरे वैगेरे अशा स्वरुपाची असल्याचे दिसून येते. याहीपेक्षा अपिलार्थी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयातील बहुतांश पत्रव्यवहार त्यांनी हाताळलेला असतो व अशा पत्रव्यवहाराच्या अनुषंगानेच माहिती अधिकारात माहितीची मागणे करणे उचित नाही. अपिलार्थी यांची कर्मचारी म्हणून काही अडचण असल्यास त्यांनी वरिष्ठांकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करणे उचित ठरत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी विविध शासन निर्णयांची / माहिती अधिकार नियम २००५ मधील तरतुदींची माहिती मागितलेली आहे. तथापि शासनाचे बहुतांश शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असतात. तसेच जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असते ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी शासनाच्या अधिपत्त्याखालील कार्यालयामध्ये कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. अशा कार्यालयामध्ये शासन निर्णय / माहिती अधिकार अधिनियम २००५ शासननिर्णय संचिकेत (Standing Order File) उपलब्ध असतात व ते अपिलार्थी कार्यालयातील कर्मचारी म्हणून सहज हस्तगत करु शकतात. त्यासाठी त्यांनी असे शासन निर्णय / माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी माहिती अधिकारातंर्गत मागणे संयुक्तिक वाटत नाही.

या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने, अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहिती अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे / खुलासा देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

या व यापूर्वीच्या काही प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अशा प्रकरणी अपिलार्थी संबंधित ज्या कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी आहेत त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागतात. बहुतांश प्रकरणामध्ये अपिलार्थी (अधिकारी / कर्मचारी) माहितीची मागणी करण्याऐवजी कार्यालयीन कामकाजाची, कार्यालयात घडून गेलेल्या एखाद्या घटनेची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने कार्यवाहीची अपेक्षा ठेवून माहिती मागणे, सहकारी अथवा वरिष्ठांविषयी आकस ठेवून गुंतागुंत करणारी माहिती मागणे किंवा वैरभावाने माहितीची मागणी करतात. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. आपण ज्या कार्यालयात काम करतो त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागणे सहसा योग्य ठरत नाही. कारण आपण ज्या कार्यालयात कार्यरत आहोत किंवा होतो त्या कार्यालयात कोणती माहिती आहे किंवा कोणती नाही किंवा कोणती माहिती नष्ट केली आहे या बाबी अधिकारी / कर्मचारी यांना ज्ञात

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

असतात असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. अत: असा अधिकार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनाही प्राप्त झालेला आहे. तथापि शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना माहिती अधिकाराचा वापर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचा विसर पडून चालणार नाही असे आयोगाचे मत आहे. विशेषत: अधिकारी / कर्मचारी यांनी माहितीची मागणी करताना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या किंवा संबंधित कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही ही बाब प्रामुख्याने विचारात ठेवणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रमुख उद्दिष्ट नागरिकांना माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने एक व्यवहार्य शासन प्रणाली निर्माण करणे आहे. जेणेकरुन सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण होईल. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रगटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना जसे शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालविणे व मर्यादित साधनसामग्रीचा इष्टतम वापर होणे इ. बाबीस बाधा येणार नाही या बाबी पाहणे आवश्यक आहे. अत: या दोघांचा मेळ घालणे जरुरी आहे. यामुळे शासन सेवेत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहिती अधिकाराचा वापर करताना ही बाब प्रामुख्याने लक्षात ठेवण्याची महत्वाची जबाबदारी आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असून त्यांनी त्यांच्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केलेले आहेत. ही बाब माहिती अधिकार अधिनियमातील भूमिका व त्यातील उद्दिष्टांच्या विपरित आहे.

अत: माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (घ) नुसार राज्य माहिती आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अपिलार्थी यांचे विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.२९३८/२०१५, ४/४)

जावक क्र. 13 दि. 5-1-017

(16)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९३९/२०१५

श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, — अपिलार्थी
रा. शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,०५, विर सावरकर मार्ग,
बाबानगर, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वि.प.दै.अनु.विद्युत,
शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०१४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वि.प.दै.अनु.विद्युत, शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड, श्री. बी. व्ही. यादव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१४.१०.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"ज्ञापन क्र. शातंनिना/गोप/२०१४/४५ दि.२६.०९.२०१४ नुसार श्री. एस. एल. सिगारवाड यांच्या टिप्पणी व तक्रारीची प्रत. शासकीय वसतिगृहात राहून घरभाडे भत्ताही घेतलेल्या कर्मचारी / अधिकारी यांची माहिती (Aug-२०१३- Aug २०१४) असभ्य व गैरवर्तनाची तक्रारीची टिपणी, कामाच्या जागेवर उपस्थित नसल्याबाबत संबंधित टिप्पणी व तक्रारीची प्रत, कर्मचाऱ्यारी यांची मानसिक स्थिती प्रमाणकाचा शासन निर्णय."

उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वतःहून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे.

"माहिती दिली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१४.११.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२७.०४.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवादामध्ये कथन केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०१६ रोजी रु.१००/- च्या बॉंडपेपर प्राचार्यांना उद्देशून हमीपत्र दिलेले आहे. या हमीपत्रामध्ये अपिलार्थी यांनी, मी (अपिलार्थी) महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई, सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना गेल्या अनेक दिवसापासून वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकाराचा वापर करुन कार्यरत असलेले कार्यालयाबद्दल (शासकीय तंत्रनिकेतन नांदेड) व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांची वैयक्तिक माहिती मागितली असून त्याचा गैरवापर केला आहे. ती माझेकडून (अपिलार्थी) चूक झाल्याचे मान्य करतो व या पुढे असे वर्तन करणार नाही अशी हमी देतो, असे नमूद केलेले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. या व यापूर्वीच्या अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केले आहेत. आज रोजीही अपिलार्थी यांची प्रस्तुत अपिलासह आणखी पाच व्दितीय अपिले आयोगासमोर विचाराधीन आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता, बहुतांश माहिती क्लिष्ट स्वरुपाची, वैयक्तिक हेव्यादेव्याची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणातील कार्यवाही करुन घेणेबाबतची, प्रशासनास वेठीस धरुन स्वतःची पकड मजबूत करणे, खुलासे वजा, आरोप प्रत्यारोपाची, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची, शासकीय कामकाज शासनाच्या ज्या मानकांनुसार चालते त्याची माहिती वैगेरे वैगेरे अशा स्वरुपाची असल्याचे दिसून येते. याहीपेक्षा अपिलार्थी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयातील बहुतांश पत्रव्यवहार त्यांनी हाताळलेला असतो व अशा पत्रव्यवहाराच्या अनुषंगानेच माहिती अधिकारात माहितीची मागणे करणे उचित नाही. अपिलार्थी यांची कर्मचारी म्हणून काही अडचण असल्यास त्यांनी वरिष्ठांकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करणे उचित ठरत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेली बहुतांश माहिती क्लिष्ट, गुंतागुंत निर्माण करणारी, आरोप प्रत्यारोप करणारी, सहजासहजी न समजणारी, घडलेल्या घटनेची कागदपत्र स्वरुपातील माहिती अशा स्वरुपाची माहिती असल्याचे दिसून येत आहे. तथापि अशी माहिती एकत्रित करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार उचित ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने, अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहिती अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे / खुलासा देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

या व यापूर्वीच्या काही प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अशा प्रकरणी अपिलार्थी संबंधित ज्या कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी आहेत त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागतात. बहुतांश प्रकरणामध्ये अपिलार्थी (अधिकारी / कर्मचारी) माहितीची मागणी करण्याऐवजी कार्यालयीन कामकाजाची, कार्यालयात घडून गेलेल्या एखाद्या घटनेची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने कार्यवाहीची अपेक्षा ठेवून माहिती मागणे, सहकारी अथवा वरिष्ठांविषयी आकस ठेवून गुंतागुंत करणारी माहिती मागणे किंवा वैरभावाने माहितीची मागणी करतात. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. आपण ज्या कार्यालयात काम करतो त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागणे सहसा योग्य ठरत नाही. कारण आपण ज्या कार्यालयात कार्यरत आहोत किंवा होतो त्या कार्यालयात कोणती माहिती आहे किंवा कोणती नाही किंवा कोणती माहिती नष्ट केली आहे या बाबी अधिकारी / कर्मचारी यांना ज्ञात असतात असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक

नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. अतः असा अधिकार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनाही प्राप्त झालेला आहे. तथापि शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना माहिती अधिकाराचा वापर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचा विसर पडून चालणार नाही असे आयोगाचे मत आहे. विशेषतः अधिकारी / कर्मचारी यांनी माहितीची मागणी करताना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या किंवा संबंधित कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही ही बाब प्रामुख्याने विचारात ठेवणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रमुख उद्दिष्ट नागरिकांना माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने एक व्यवहार्य शासन प्रणाली निर्माण करणे आहे. जेणेकरुन सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण होईल. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रगटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना जसे शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालविणे व मर्यादित साधनसामग्रीचा इष्टतम वापर होणे इ. बाबीस बाधा येणार नाही या बाबी पाहणे आवश्यक आहे. अतः या दोघांचा मेळ घालणे जरुरी आहे. यामुळे शासन सेवेत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहिती अधिकाराचा वापर करताना ही बाब प्रामुख्याने लक्षात ठेवण्याची महत्वाची जबाबदारी आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असून त्यांनी त्यांच्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केलेले आहेत. ही बाब माहिती अधिकार अधिनियमातील भूमिका व त्यातील उद्दिष्टांच्या विपरित आहे.

अतः माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (घ) नुसार राज्य माहिती आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अपिलार्थी यांचे विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

(अपील क्र.२९३९/२०१५, ४/४)

जावक क्र. १५ दि. ५-१-१७

(17)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९४१ २०१५

श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, अपिलार्थी
रा. शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,०५, विर सावरकर मार्ग,
बाबानगर, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वि.प्र.वै.अनु विद्युत,
शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वि.प्र.वै.अनु विद्युत, शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड, श्री. बी. व्ही. यादव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०५.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"माहे जानेवारी २०१४ ते जून २०१४ द्वितीय पाळी मानधन वाटप आदेशाची प्रत, द्वितीय पाळी मानधन वाटपाचे उपयोगीता प्रमाणपत्र, द्वितीय पाळी मानधन वाटपाचा शासन निर्णय व संदर्भाची प्रत."

उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वतःहून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे.

"माहिती दिली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१९.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी

यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२७.०४.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवादामध्ये कथन केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०१६ रोजी रु.१००/- च्या बाँडपेपर प्राचार्यांना उद्देशून हमीपत्र दिलेले आहे. या हमीपत्रामध्ये अपिलार्थी यांनी, मी (अपिलार्थी) महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई, सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना गेल्या अनेक दिवसापासून वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकाराचा वापर करुन कार्यरत असलेले कार्यालयाबद्दल (शासकीय तंत्रनिकेतन नांदेड) व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांची वैयक्तिक माहिती मागितली असून त्याचा गैरवापर केला आहे. ती माझेकडून (अपिलार्थी) चूक झाल्याचे मान्य करतो व या पुढे असे वर्तन करणार नाही अशी हमी देतो, असे नमूद केलेले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. या व यापूर्वीच्या अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केले आहेत. आज रोजीही अपिलार्थी यांची प्रस्तुत अपिलासह आणखी पाच व्दितीय अपिले आयोगासमोर विचाराधीन आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता, बहुतांश माहिती क्लिष्ट स्वरुपाची, वैयक्तिक हेव्यादेव्याची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणातील कार्यवाही करुन घेणेबाबतची, प्रशासनास वेठीस धरुन स्वतःची पकड मजबूत करणे, खुलासे वजा, आरोप प्रत्यारोपाची, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची, शासकीय कामकाज शासनाच्या ज्या मानकांनुसार चालते त्याची माहिती वैगेरे वैगेरे अशा स्वरुपाची असल्याचे दिसून येते. याहीपेक्षा अपिलार्थी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयातील बहुतांश पत्रव्यवहार त्यांनी हाताळलेला असतो व अशा पत्रव्यवहाराच्या अनुषंगानेच माहिती अधिकारात माहितीची मागणे करणे उचित नाही. अपिलार्थी यांची कर्मचारी म्हणून काही अडचण असल्यास त्यांनी वरिष्ठांकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करणे उचित ठरत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेली बहुतांश माहिती क्लिष्ट, गुंतागुंत निर्माण करणारी, आरोप प्रत्यारोप करणारी, सहजासहजी न समजणारी, घडलेल्या घटनेची कागदपत्र स्वरुपातील माहिती अशा

स्वरुपाची माहिती असल्याचे दिसून येत आहे. तथापि अशी माहिती एकत्रित करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार उचित ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने, अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहिती अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे / खुलासा देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

या व यापूर्वीच्या काही प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अशा प्रकरणी अपिलार्थी संबंधित ज्या कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी आहेत त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागतात. बहुतांश प्रकरणामध्ये अपिलार्थी (अधिकारी / कर्मचारी) माहितीची मागणी करण्याऐवजी कार्यालयीन कामकाजाची, कार्यालयात घडून गेलेल्या एखाद्या घटनेची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने कार्यवाहीची अपेक्षा ठेवून माहिती मागणे, सहकारी अथवा वरिष्ठांविषयी आकस ठेवून गुंतागुंत करणारी माहिती मागणे किंवा वैरभावाने माहितीची मागणी करतात. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. आपण ज्या कार्यालयात काम करतो त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागणे सहसा योग्य ठरत नाही. कारण आपण ज्या कार्यालयात कार्यरत आहोत किंवा होतो त्या कार्यालयात कोणती माहिती आहे किंवा कोणती नाही किंवा कोणती माहिती नष्ट केली आहे या बाबी अधिकारी / कर्मचारी यांना ज्ञात असतात असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. अतः असा अधिकार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनाही प्राप्त झालेला आहे. तथापि शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना माहिती अधिकाराचा वापर करताना

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचा विसर पडून चालणार नाही असे आयोगाचे मत आहे. विशेषतः अधिकारी / कर्मचारी यांनी माहितीची मागणी करताना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या किंवा संबंधित कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही ही बाब प्रामुख्याने विचारात ठेवणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रमुख उद्दिष्ट नागरिकांना माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने एक व्यवहार्य शासन प्रणाली निर्माण करणे आहे. जेणेकरुन सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण होईल. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रगटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना जसे शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालविणे व मर्यादित साधनसामग्रीचा इष्टतम वापर होणे इ. बाबीस बाधा येणार नाही या बाबी पाहणे आवश्यक आहे. अतः या दोघांचा मेळ घालणे जरुरी आहे. यामुळे शासन सेवेत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहिती अधिकाराचा वापर करताना ही बाब प्रामुख्याने लक्षात ठेवण्याची महत्वाची जबाबदारी आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असून त्यांनी त्यांच्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केलेले आहेत. ही बाब माहिती अधिकार अधिनियमातील भूमिका व त्यातील उद्दिष्टांच्या विपरित आहे.

अतः माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (घ) नुसार राज्य माहिती आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अपिलार्थी यांचे विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

---

(अपील क्र.२९४१/२०१५, ४/४)

जावक क्र. 16 दि. 4-1-17

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९४२/२०१५

श्री. विजय ओमप्रकाश चक्रुपे, — अपिलार्थी
रा. शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पैनगंगा,०५, विर सावरकर मार्ग,
बाबानगर, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वि.प्र.वै.अनु विद्युत,
शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड.

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वि.प्र. वै. अनु विद्युत, शाासकीय तंत्रनिकेतन, नांदेड, श्री. बी. व्ही. यादव उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१०.०९.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"आदेश क्र. आस्था-२/२०१४/२१६३ दि.२०.०८.२०१४ या आदेशाची व संदर्भाची प्रत श्री. ए. आर. शुकूर अधि, गणीत तथा विभाग नियंत्रक विज्ञान विभाग यांची दि.१९.०८.२०१४ तक्रारस्पद टिप्पणी , श्री. के.. पी. जोशी अधि. यंत्र अमि. तथा चौकशी समिती अध्यक्ष यांनी दि.०९.०९.२०१४ ला केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, चक्रुपे विजय ओमप्रकाश यांच्या निवेदनाची प्रत, शा. तं. नि. नांदेड विज्ञान विभाग ऑगस्ट २०१२ ते ऑगस्ट २०१४ चे हजेरी पटाची प्रत."

उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः हवी असल्याचे त्यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहितीपोटीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वतःहून ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते असे आयोगाचे मत आहे.

"माहिती दिली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१०.१०.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२७.०४.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवादामध्ये कथन केले की, अपिलार्थी यांनी दि.२४.०६.२०१६ रोजी रु.१००/- च्या बाँडपेपर प्राचार्यांना उद्देशून हमीपत्र दिलेले आहे. या हमीपत्रामध्ये अपिलार्थी यांनी, मी (अपिलार्थी) महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई, सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना गेल्या अनेक दिवसापासून वेळोवेळी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकाराचा वापर करुन कार्यरत असलेले कार्यालयाबद्दल (शासकीय तंत्रनिकेतन नांदेड) व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांची वैयक्तिक माहिती मागितली असून त्याचा गैरवापर केला आहे. ती माझेकडून (अपिलार्थी) चूक झाल्याचे मान्य करतो व या पुढे असे वर्तन करणार नाही अशी हमी देतो, असे नमूद केलेले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. या व यापूर्वीच्या अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केले आहेत. आज रोजीही अपिलार्थी यांची प्रस्तुत अपिलासह आणखी पाच व्दितीय अपिले आयोगासमोर विचाराधीन आहेत. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता, बहुतांश माहिती क्लिष्ट स्वरुपाची, वैयक्तिक हेव्यादेव्याची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणातील कार्यवाही करुन घेणेबाबतची, प्रशासनास वेठीस धरुन स्वतःची पकड मजबूत करणे, खुलासे वजा, आरोप प्रत्यारोपाची, दैनंदिन कार्यालयीन कामकाजाची, शासकीय कामकाज शासनाच्या ज्या मानकांनुसार चालते त्याची माहिती वैगेरे वैगेरे अशा स्वरुपाची असल्याचे दिसून येते. याहीपेक्षा अपिलार्थी ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयातील बहुतांश पत्रव्यवहार त्यांनी हाताळलेला असतो व अशा पत्रव्यवहाराच्या अनुषंगानेच माहिती अधिकारात माहितीची मागणे करणे उचित नाही. अपिलार्थी यांची कर्मचारी म्हणून काही अडचण असल्यास त्यांनी वरिष्ठांकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे. त्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करणे उचित ठरत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेली बहुतांश माहिती क्लिष्ट, गुंतागुंत निर्माण करणारी, आरोप प्रत्यारोप करणारी, सहजासहजी न समजणारी, घडलेल्या घटनेची कागदपत्र स्वरुपातील माहिती अशा स्वरुपाची माहिती असल्याचे दिसून येत आहे. तथापि अशी माहिती एकत्रित करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार उचित ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने, अधिनियमातील तरतुदीनुसार ज्यावेळी माहिती अर्ज प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन उपलब्ध करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे / खुलासा देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियेंचा अथवा या स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

या व यापूर्वीच्या काही प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अशा प्रकरणी अपिलार्थी संबंधित ज्या कार्यालयाचे अधिकारी / कर्मचारी आहेत त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागतात. बहुतांश प्रकरणामध्ये अपिलार्थी (अधिकारी / कर्मचारी) माहितीची मागणी करण्याऐवजी कार्यालयीन कामकाजाची, कार्यालयात घडून गेलेल्या एखाद्या घटनेची, स्वतःशी संबंधित एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने कार्यवाहीची अपेक्षा ठेवून माहिती मागणे, सहकारी अथवा वरिष्ठांविषयी आकस ठेवून गुंतागुंत करणारी माहिती मागणे किंवा वैरभावाने माहितीची मागणी करतात. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. आपण ज्या कार्यालयात काम करतो त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागणे सहसा योग्य ठरत नाही. कारण आपण ज्या कार्यालयात कार्यरत आहोत किंवा होतो त्या कार्यालयात कोणती माहिती आहे किंवा कोणती नाही किंवा कोणती माहिती नष्ट केली आहे या बाबी अधिकारी / कर्मचारी यांना ज्ञात असतात असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक

नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. अतः असा अधिकार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनाही प्राप्त झालेला आहे. तथापि शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना माहिती अधिकाराचा वापर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमांचा विसर पडून चालणार नाही असे आयोगाचे मत आहे. विशेषतः अधिकारी / कर्मचारी यांनी माहितीची मागणी करताना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या किंवा संबंधित कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही ही बाब प्रामुख्याने विचारात ठेवणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रमुख उद्दिष्ट नागरिकांना माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने एक व्यवहार्य शासन प्रणाली निर्माण करणे आहे. जेणेकरुन सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण होईल. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रगटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना जसे शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालविणे व मर्यादित साधनसामग्रीचा इष्टतम वापर होणे इ. बाबीस बाधा येणार नाही या बाबी पाहणे आवश्यक आहे. अतः या दोघांचा मेळ घालणे जरुरी आहे. यामुळे शासन सेवेत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहिती अधिकाराचा वापर करताना ही बाब प्रामुख्याने लक्षात ठेवण्याची महत्वाची जबाबदारी आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असून त्यांनी त्यांच्याच कार्यालयात माहितीसाठीचे बरेच अर्ज सादर केलेले आहेत. ही बाब माहिती अधिकार अधिनियमातील भूमिका व त्यातील उद्दिष्टांच्या विपरित आहे.

अतः माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (घ) नुसार राज्य माहिती आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अपिलार्थी यांचे विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील फेटाळण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---



जावक क्र.--15------- दि.--4-1-17---

19

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३०३५/२०१५

डॉ. नंदकुमार शेषेराव मगर,
द्वारा- पाटील निवास, सिंहगड सोसायटी,
कन्हेरी रोड, लातूर. — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
उप कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा,
विद्यापीठ, विष्णुपूरी, नांदेड-४३१ ६०६. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड-४३१६०६. : उत्तरवादी क्र.२

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.२४.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, विद्यापीठ, विष्णुपूरी नांदेड, श्री. महेश हरिश्चंद्र त्रिभुवन उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०१.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, प्राध्यापकांच्या तक्रारीसंदर्भातील अहवालाची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. मग्गीरवार समिती-९ ते १७ मार्च १९७८.

२. डॉ. सोनटक्के समिती-१८.१०.२००२.

३. डॉ. कल्याणकर समिती-२२.०७.२००४.

४. मा. कुलगुरु गायकवाड समिती-०६.०४.२००५.

५. डॉ. सरनाईक (BCUD) समिती-२७.११.२००९.

६. मा. संचालक तथा कुलगुरु के.एम. कुलकर्णी-२५.०१.२०१४ व १६.०९.२०१४

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत आहे.

" जाणीव पुर्वक, हेतुपुर्वक व दुष्ट हेतुने माहिती नाकारली आहे " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१४.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.११.०९.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

"जाणीव पुर्वक माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या सहा समित्यांच्या अहवालापैकी तीन समित्यांचे अहवाल अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. उर्वरित डॉ.सोनटक्के डॉ.कल्याणकर व मा.कुलगुरु गायकवाड समित्यांचे अहवालांचा शोध घेऊनही ते उपलब्ध झाले नसल्यामुळे या संदर्भातील माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देता येणे शक्य झाले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास अवगत केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.०९.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या डॉ.सोनटक्के डॉ.कल्याणकर व मा.कुलगुरु गायकवाड समित्यांचे अहवालांचा ३० दिवसाचे आत अभिलेखामध्ये शोध घ्यावा व माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अशी माहिती जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्यांच्यावर उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार यथोचित कारवाई करावी, या निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणात अधिनियमातील कलम ७ (१) व १९ (६) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी वर

नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत माहितीचा शोध घेऊन माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास वर नमूद केल्याप्रमाणे संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कारवाई करावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.३०३५/२०१५, ३/३)

जावक क्र. 6586 दि. 27-12-16

(७०)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३२७४/२०१५

श्री. पांढरे सत्तारमियाँ बशीरसाब,,
रा. श्री. एस. मंजील, महिला स्वाधार केंद्राच्या बाजूस, इंडियानगर,
लातूर. — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र,
लातूर. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
परिक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१४.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र, लातूर, श्री. साळुंके मेघशाम वामनराव व प्रथम अपिलीय अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डॉ. रवि, एन. सरोदे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.११.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, २०१५ ते २०१६ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"आपल्या विद्यापीठाच्या एम. ए., एम.बी.ए., एल.एल.बी. व बी. एड. अभ्यास क्रमासाठी महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समकक्षता किंवा मानव संसाधन विकास मंत्रालयाची समकक्षता असे लिहिलेली असते त्या समकक्षता परिक्षांचा महाराष्ट्र शासन आदेशाची झेरॉक्स प्रत मिळणे बाबत."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१२.०६.२०१५ रोजी प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत आहे.

" असमाधान असल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२६.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२८.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

"आदेश देऊन माहिती न मिळाल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१२.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन संबंधित शासन आदेश उपलब्ध नसल्याबाबत अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२८.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या शासननिर्णयाचा शोध घेऊन १५ दिवसात उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी दि.१४.०६.१९९९ रोजीचा शासन निर्णय आयोगासमोर सादर केला. यावर आयोगाने अपिलार्थीस अशी विचारणा केली की, सदर शासन निर्णय उपलब्ध असताना या शासन निर्णयाची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी का केली ? यावर अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, सदर निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही झाली नाही त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, विद्यापिठाचे कामकाज शासनाने ठरवून दिलेल्या निदेशानुसार चालते.

वरील सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांची माहितीची मागणी करण्यामागे विद्यापिठातील कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने काही तक्रार असल्याचे दिसून येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेला शासननिर्णय जोडून संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे तक्रार अर्ज करुन त्या संदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक होईल, या निर्देशासह अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. प्रस्तुत प्रकरणात कलम ७ (१) व कलम १९ (६) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

औरंगाबाद
२४.११.२०१६

(अपील क्र.३२७४/२०१५, २/२)

जावक क्र. 6569 दि. 27-12-15

(21)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३३५३/२०१५

श्री. राजू विठ्ठलराव भोंडे, — अपिलार्थी
रा. व्यंकटरमना नगर, बालाजी मंदिराजवळ,
मु. पो. मुक्रामाबाद, ता. मुखेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अधीक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. वैद्य प्रशांत पुरुषोत्तम, सहाय्यक सल्लागार उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.११.११.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"निवासी मुकबधिर विद्यालय यावल जि.जळगाव ही शाळा ज्या संस्थेवर हस्तांतरीत होऊन मौ.मुखेड येथे स्थलांतरन झाली त्याची पूर्ण माहिती कार्यालयीन स्थळप्रतीच्या टिपणीसह द्यावी. ५० विद्यार्थ्यासाठी व ५ वर्षाकरीता मिळालेल्या अनुज्ञाप्ती क्र.५७३ ची सर्व कार्यालयीन कागदपत्रे."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

" माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.०४.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

" सुनावणी न घेऊन माहिती न दिल्यामुळे " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार उपलब्ध करुन दयावी किंवा न देण्याबाबतची कारणमिमांसा पुढील सुनावणीच्यावेळी सादर करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती दिल्याचा अहवाह किंवा माहिती न देण्याबाबतची कारणमिमांसा पुढील सुनावणीस सादर करावी. सुनावणीसाठीची पुढील तारीख सर्व संबंधितांना आयोगातर्फे यथावकाश कळविण्यात येईल.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र. ३३५३/२०१५, २/२)

जावक क्र. 6605 दि. 27-12-16

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९३६/२०१५

श्री. शेळगे संजय दत्तराम,
रा. जिल्हा परिषद हायस्कूल, वाघी, ता. जि. नांदेड. — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग-प्राथमिक,
जिल्हा परिषद, नांदेड : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. यरेपूलवाड बी. आय. अधीक्षक, वर्ग-२, उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१७.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

मा. गटविकास अधिकारी केंद्रे साहेब हे चौकशी अधिकारी म्हणून जि. प. हा. वाघी या शाळेस, दि.०३.०२.२०१५ रोजी भेटून चौशी केली त्या चौकशी अहवालाच्या सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती व चौकशी दरम्यान शाळेतील शिक्षकांनी दिलेल्या पत्राच्या प्रती, वाघी येथील गावकऱ्यांच्या लेखी पत्राच्या प्रती, वरिष्ठांकडे पाठविलेला चौकशी अहवालाची प्रत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. येरपुलवाड बी. आय. अधीक्षक वर्ग-२ यांनी अपिलार्थी यांचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि.२४.११.२०१६ रोजीचे निवेदन आयोगास सादर केले. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्याचे नमूद करुन द्वितीय अपील निकाली काढण्याची विनंती केलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र. २९३६/२०१५ २/२)

जावक क्र. 6667 दि. 28-12-16

(२३)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९९७/२०१५

श्री. मुगाजी पुरभाजी बुरुड,
मु. पो. इळेगांव, ता. गंगाखेड, जि. परभणी. अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड, डॉ. एन. डी. बोडके उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१५.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, २०१४ ते २०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"(RKSK) राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत नांदेड जिल्हयातील सर्व तालुक्यामधील २०१४ ते २०१५ मध्ये झालेल्या खर्चाचा प्रत्येक प्रा. आ. केंद्र अंतर्गत उपकेंद्रातील महसूली गावामध्ये किशोरवयीन मुलींच्या बैठका घेतलेल्या मिटींगाच्या तारखासह फोटोसह किशोरवयीन मुलींच्या सहया सहित आणि सर्व नांदेड जिल्हयातील सर्व तालुक्यामधील माहिती हवी आहे. आरोग्य कार्यालयामधून उपकेंद्रामधून सर्व माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांची साक्षांकित करुन प्रमाणित करुन माहिती हवी आहे.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

" माहिती देण्यात आली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१७.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी संपूर्ण नांदेड जिल्ह्याशी संबंधित माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा अर्ज दि.१८.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड यांच्याकडे वर्ग केलेला आहे. या नंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१६.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा अर्ज नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे वर्ग केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी जिल्हास्तरावर उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना दि.१६.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२३.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती विविध कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे ती माहिती संबंधित कार्यालयाकडून एकत्रित करण्यासाठी विलंब झाला. तथापि अपिलार्थी यांना आवश्यक असलेली जवळजवळ १५०० पृष्ठांची माहिती आज रोजी एकत्रित करुन अपिलार्थी यांना देण्यासाठी सोबत आणलेली आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली जवळजवळ १५०० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना देण्यासाठी सोबत आणलेली आहे. सदर माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर दिली असता सदर माहिती अपिलार्थी यांनी स्विकारण्यास नकार देऊन विलंब झाला असल्यामुळे उद्देश सफल होत नसल्याबाबत कथन केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप विस्तृत व व्यापक असल्याचे दिसून येत आहे. तसेच माहिती विविध कार्यालयाकडून एकत्रित करुन अपिलार्थीस द्यावयाची असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केलेले कारण आयोगास संयुक्तिक वाटत आहे.

अतः जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश

प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी या निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणात अधिनियमातील कलम ७ (१) व कलम १९ (६) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.२९९७/२०१५, ३/३)

जावक क्र. 6591 दि. 27-12-15

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३०८९/२०१५

श्री. मोतीराम गयबु काळे, — अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वडेपुरी- एसआरटी, ता. लोहा, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-१, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-१, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग, नांदेड, श्री. जी. पी. स्वामी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. जी. एम. कुलकर्णी, उप कार्यकारी अभियंता, रा.म. विभाग, नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१८.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.०१ जानेवारी २०१४ ते दि.१८.०६.२०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. दि.०१ जानेवारी २०१४ ते आजपर्यंत ३६१ नांदेड ते लोहा या राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे किती वेळा व कोणकोणत्या तारखेला बूजविण्यात आले व त्यावर एकूण किती खर्च व एकूण खड्डे किती.
२. मा. कै. डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय विष्णूपुरीच्या लोकआर्पन सोहळयाप्रसंगी कोठून कुठपर्यंत किती खड्डे बुजविण्यात आले व त्यावर एकूण किती खर्च.

३. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान मा. उध्दवजी ठाकरे, शिवसेना प्रमुख व मा. नरेंद्र मोदिजी (प्रधानमंत्री) यांच्या सभा प्रसंगी एकूण किती खड्डे बुजविण्यात आली व त्यावर एकूण किती खर्च व कोठून कुठपर्यंत खड्डे बुजविण्यात आली याची सविस्तर माहिती मिळणे.
४. आज रोजी या महामार्गावर आजून किती खड्डे आहेत त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, विभाग नांदेड यांना उद्देशून लिहिलेले व राज्य माहिती आयोगास पृष्ठांकित केलेले दि.०३.१०.२०१६ रोजीचे निवेदन आयोगास सादर केले. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्याचे नमूद करुन द्वितीय अपील अर्ज खारीज करण्याची विनंती केलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.३०८९/२०१५ २/२)

जावक क्र. 6594 दि. 27/12/16

(२२)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३०९०/२०१५

श्री. मोतीराम गयबु काळे, — अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वडेपुरी- एसआरटी, ता. लोहा, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक अभियंता, श्रेणी-१, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-१, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग, नांदेड, श्री. जी. पी. स्वामी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. जी. एम. कुलकर्णी, उप कार्यकारी अभियंता, रा.म. विभाग, नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१८.०६.२०१६ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.०१ जानेवारी २०१४ ते १८.०६.२०१५या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. दि.०१ जानेवारी २०१४ ते दि.१८.०६.२०१५ पर्यंत एकूण किती खडयावर एकूण किती डांबराच्या टाक्या व किती ब्रास गीट्टी वापरण्यात आली व त्यावर एकूण किती खर्च झाला.
२. डांबर व गीट्टी खरेदीच्या पावतीच्या सत्यप्रती मिळणे.
३. दि.०१ जानेवारी २०१४ ते दि.१८.०६.२०१५ पर्यंत ३६१ या रस्त्यावरील आंबेडकर चौक नांदेड ते लोहा या राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे किती वेळा व किती खड्डे बूजविण्यात आले व त्यावर एकूण किती खर्च.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, विभाग नांदेड यांना उद्देशून लिहिलेले व राज्य माहिती आयोगास पृष्ठांकित केलेले दि.०३.१०.२०१६ रोजीचे निवेदन आयोगास सादर केले. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्याचे नमूद करुन द्वितीय अपील अर्ज खारीज करण्याची विनंती केलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र. ३०९०/२०१५ १/२ )

जावक क्र. 6661 दि. 28-12-10

२६

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३३६२/२०१५
अपिलार्थी

श्री. संभाजी वामनराव पाटील,
रा. रक्त क्रांती कार्यालय, एन-डी-४२,पी-२,
४७/४, हडको, नविन नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
सरकारी कामगार अधिकारी,
सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांचे कार्यालय,
शिवाजी नगर, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक कामगार आयुक्त,
शिवाजीनगर, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)
## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, नांदेड, श्री.अविनाश जयवंतराव पेरके व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, नांदेड, श्री. बी. एम. मोरडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२९.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितलेली आहे.

"आश्विनी हॉस्पीटल तथा रमाकांत हार्ट केअर सेंटर, शिवाजी नगर, ग्लोबल हॉस्पीटल, औद्योगिक वसाहत, नांदेड या दोन्ही दवाखान्यातील नर्स, कॅम्पाऊंडर व इतर कामगार यांची जानेवारी २०१४ ते मे २०१५ पर्यंतच्या पगारी रजीस्टरची कॉपी देण्यात यावी."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१६.०७.२०१५ रोजी प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत आहे.

"माहिती देण्यास जाणून बुजून टाळाटाळ केल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२३.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.०६.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत दि.१६.०७.२०१५ रोजी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.०६.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. या निर्णयामध्ये त्यांनी खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

*"जन माहिती अधिकारी व दुकान निरीक्षक यांनी प्रतिपादन केले की, अपिल कर्त्याने मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच आस्थापनांतील कामागारांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक या कार्यालयात ठेवले जात नाहीत तसेच सदर माहिती या कार्यालयाचे अभिलेखात समानिष्ट नाही. तथापि आस्थापनांच्या नोंदी असलेले महाराष्ट्र दुकाने व अस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत "सी" रजिस्टर ठेवले जाते. उभय पक्षाचे प्रतिपादन व उपलब्ध नस्ती यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागविलेली माहिती कार्यालयीन अभिलेखात नसल्याने देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि सदर आस्थापनांच्या नोंदी असलेल्या महाराष्ट्र दुकाने व अस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत सी रजिस्टरच्या प्रती देता येणे शक्य आहे."*

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित

केल्यानुसार सी रजिस्टरची प्रत अपिलार्थी यांना दि.१४.०९.२०१५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसलेली माहिती मागितलेली आहे. अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरील असल्याने ती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचे अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.३३६२/२०१५, ३/३)

जावक क्र. 6585 दि. 27-12-16

(२७)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३३६१/२०१५

श्री. संभाजी वामनराव पाटील, : अपिलार्थी
रा. रक्त क्रांती कार्यालय, एन-डी-४२,पी-२,
हडको, नविन, नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सरकारी कामगार अधिकारी,
सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड यांचे कार्यालय,
शिवाजी नगर, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहायक कामगार आयुक्त,
शिवाजी नगर, नांदेड.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.२८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, नांदेड, श्री.ए.जे. पेरके व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, नांदेड, श्री. बी. एम. मोरडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२९.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितलेली आहे.

"विजय क्लॉथ सेंटर व विजय साडीसेंटर व कन्नावर क्लॉथ सेंटर व कन्नावार साडी सेंटर, गुरुनानक मार्केट, बालाजी मंदिराजवळ, नांदेड या दोन्ही दुकानाची जानेवारी २०१५ ते जून २०१५ पर्यंतची कामगार किंवा सेल्समन यांच्या पगारी रजीस्टरची कॉपी देण्यात यावी."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१६.०७.२०१५ रोजी प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत आहे.

"माहिती देण्यास जाणून बुजून टाळाटाळ केल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२३.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.०६.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

कारण नमुद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत दि.१६.०७.२०१५ रोजी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.०६.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. या निर्णयामध्ये त्यांनी खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

*"जन माहिती अधिकारी व दुकान निरीक्षक यांनी प्रतिपादन केले की, अपिल कर्त्याने मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच आस्थापनांतील कामागारांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक या कार्यालयात ठेवले जात नाहीत तसेच सदर माहिती या कार्यालयाचे अभिलेखात समानिष्ट नाही. तथापि आस्थापनांच्या नोंदी असलेले महाराष्ट्र दुकाने व अस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत "सी" रजिस्टर ठेवले जाते. उभय पक्षाचे प्रतिपादन व उपलब्ध नस्ती यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागविलेली माहिती कार्यालयीन अभिलेखात नसल्याने देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि सदर आस्थापनांच्या नोंदी असलेल्या महाराष्ट्र दुकाने व अस्थापना अधिनियम १९४८ अंतर्गत सी रजिस्टरच्या प्रती देता येणे शक्य आहे."*

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार सी रजिस्टरची प्रत अपिलार्थी यांना दि.१४.०९.२०१५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसलेली माहिती मागितलेली आहे. अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील माहिती या शब्दाच्या

व्याख्येच्या व्याप्तीबाहेरील असल्याने ती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांचे अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.३३६१/२०१५, ३/३)

जावक क्र. 6590 दि. 27-12-15

(२८)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९५३/२०१५

श्री. बाबासाहेब जळबाजी मस्के,
रा. पोलीस नाईक/१९६४, पोलीस स्टेशन,
माहूर, जि. नांदेड.

अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस अधीक्षक (मुख्यालय),
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यायल, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१४.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस अधीक्षक (मु.), नांदेड, श्री. व्ही. पी. नांदेडकर उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२३.०९.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"आम्ही (पो. ना/१९६४ ने) पो. नि.श्री. डी.डी. ओंबासे साहेब हे बनावट गैरहजीरचे सर्व स्टॉपसह आमचेही गैरहजरी रेकॉर्ड तयार केल्याने आम्ही दि.१२.०९.२०१४ रोजी मा. पो. अधिक्षक साहेब आपल्याकडे लेखी तक्रार केल्याने व नाराज पत्रकारांनी सदरची बातमी पेपरमध्ये दिल्याने आमची कामाची पध्दत लोकाना व वरिष्ठांना माहित झाल्याने आमची बदनामी झाली असा समज पो. नि. ओंबासे साहेबांनी करुन घेवून तुझ्यामुळे (NPC/१९६४) माझी बदनामी झाली मी ही तुला सोडणार नाही ? तुझीपण बदली करतो म्हणून माझ्या खोटा कसुरी रिपोर्ट मा. पो. अधीक्षक साहेब (आमच्याकडे) क्राईम मिटींग दि.१६.०९.२०१४ रोजी केला आहे. पो. नि. ओंबासे यांनी दि.२०.०९.२०१४ रोजी संध्याकाळी माझी डयुटीचे ठिकाणी येवून त्यांनी स्वत: कळवीले आहे तरी वरिल माहिती मिळणे ही विनंती आहे.

खोटा कसुरी रिपोर्ट पाठविल्याची माहिती, कसुरी रिपोर्ट व संबंधित सर्व कागदपत्रासह सत्यप्रती मिळणेबाबत."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२९.१०.२०१४ रोजी प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत आहे.

" माहिती देण्यास नाकारली " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.११.११.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.१५.०५.२०१५ रोजी निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

" माहिती देण्यास नकार" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस अधीक्षक (मु.), नांदेड यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.०२.१०.२०१४ रोजी अधिनियमातील कलम ५(५) अन्वये प्रमुख लिपीक, विभागीय चौकशी शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांच्याकडे वर्ग केला. मानीव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.१०.२०१४ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ पोट कलम (त्र) मधील तरतुदीनुसार सदरची माहिती नाकारण्यात येत आहे असे कळविलेले आहे. यथावकाश अपिलार्थी यांनी दि.११.११.२०१४ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि.१५.०५.२०१५ रोजी घेण्यात आली. सदर अपिलात शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१२/९८९/प्रं.क्र.४७९/सहा दि.१७.१०.२०१४ अन्वये माहिती नाकारण्यात आलेली आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती प्रथमतः दि.२९.१०.२०१४ रोजीच्या पत्रान्वये कलम ८ पोटकलम (ज) अन्वये नाकारण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन केले आहे. सद्यस्थितीमध्ये अपिलार्थी यांनी ज्या प्रकरणाच्या अनुषंगाने माहितीची मागणी केलेली आहे त्या प्रकरणी विभागीय चौकशी सुरु असून अशी चौकशी पूर्ण झाल्यानंतर माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने चौकशीची प्रक्रिया सुरु असल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही या निर्देशासह सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी अधिनियमातील कलम ७ (१) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विलंबाने सुनावणी घेतलेली आहे. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येतो. भविष्यात माहिती अधिकारातंर्गत प्राप्त होणाऱ्या प्रथम अपिलावर संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस

अधीक्षक, नांदेड यांनी विहित मदुतीत सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्याची दक्षता घ्यावी, अशी त्यांना या प्रकरणी आयोगातर्फे समज देण्यात येत आहे. अन्यथा कलम १९ (६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येवून येथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र. २९५३/२०१५, ३/३)

जावक क्र. 6588 दि. 27-12-16

(29)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३३६६/२०१५

श्रीमती अर्चना सुरेश औताडे,
द्वारा- जाधव किराणा, मस्तगड रेल्वे स्टेशन रोड, मंमादेवी मंदिराजवळ, जालना. — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन, भाग्यनगर, नांदेड. : उत्तरवादी क्र.१

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. बी.बी. खंदारे, पो.उप.नि.नांदेड व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. व्ही. पी. नांदेडकर, पोलीस उप अधीक्षक (मु.), नांदेड उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२२.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. श्री. नामदेव सुरेश औताडे c/o श्री. अरविंद लगविदे शिवदत्तनगर मालेगाव रोड नांदेड यांनी दि.०८.०२.२०१५ रोजी तक्रार अर्ज. सदरिल अर्ज हा अनिता नामदेव राठोड व सुरेश एकनाथ औताडे यांच्या विरुध्द दिलेला आहे याची नक्कल.
२. अनिता नामदेव राठोड यांनी दि.१४.०२.२०१५ रोजी दिलेली तक्रार अर्जाची नक्कल.
३. सुरेश एकनाथ औताडे यांच्या विरुध्द गुन्हा नोंद झालेली पोलीस केस डायरीची नक्कल.
४. सुरेश एकनाथ औताडे यांच्या दि.१३.०२.२०१५ रोजी नोंदविलेला जबाबाची प्रमाणीत नक्कल.

" माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२०.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.०१.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

" मागितलेली कागदपत्रे दिली नाहीत" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन, भाग्य नगर नांदेड, यांनी यांच्या दि.०३.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिलेला आहे. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी प्रकरणाच्या अनुषंगाने काही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन दिली. सदर कागदपत्रांची पडताळणी केली असता, जन माहिती अधिकारी यांच्या दि.०३.०८.२०१५ रोजीच्या पत्रामध्ये विसंगती आढळून येत आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद, अपिलार्थीस नियमानुसार देय होणारी माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय यासर्व बाबींचा सांगोपांग विचार करता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(८)(क) (२) नुसार अप्पर पोलीस अधीक्षक, नांदेड यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती व देय होणारी माहिती सदर निर्णय प्राप्त होताच तीस दिवसात उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस माहिती दिल्याच्या अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित राहावे. पुढील सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे. सुनावणीसाठीची पुढील तारीख सर्व संबंधितांना आयोगातर्फे यथावकाश कळविण्यात येईल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा अहवाह पुढील सुनावणीस सादर करावा. सुनावणीसाठीची पुढील तारीख सर्व संबंधितांना आयोगातर्फे यथावकाश कळविण्यात येईल.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.३३६६/२०१५ २/२)

जावक क्र. 6604 दि. 27-12-16

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२९६७/२०१५

श्री. विजयानंद हिरामण गायकवाड,
रा.भीमनगर, हतईपुरा, कंधार,
ता.कंधार, जि.नांदेड
: अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा व्यवस्थापक,
महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ मर्या.,
शास्त्री नगर, नांदेड.
: उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक व्यवस्थापक,
महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ शास्त्री नगर,
देवानगरी, शहानूरमियाँ दर्गा रोड, औरंगाबाद.
: उत्तरवादी क्र.२

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीसाठी आयोगासमोर विनाअनुमती अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ मर्या., मुंबई यांनी चौकशी करुन आवश्यकतेनुसार शिस्तभंग विषयक कारवाईबाबत निर्णय घ्यावा व यासंदर्भात

अहवाल आयोगास सादर करावा, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (ख) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२३.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"आपल्या महामंडळाकडून दि.१९ एप्रिल २०१३ ते २३.०३.२०१५ पर्यंत किती व्यक्तींना/ गटांना कर्जपुरवठा करण्यात आला त्यासर्व व्यक्तींचे नाव, व्यवसाय व किती रुपये कर्ज घेतले याबाबतची सविस्तर माहितीच्या सत्यप्रती देणे."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२२.०४.२०१५ रोजी प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत आहे.

" चुकीचे कारण दर्शवून जाणीवपुर्वक माहिती नाकारल्यामुळे " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२०.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.१७.०६.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

" अपुर्ण माहिती दिल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगापुढे कथन केले की, मला जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली आहे. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीची आयोगाने पडताळणी केली असता त्यामध्ये तथ्यांश असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ मर्या., नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांना आवश्यक असलेली उर्वरित माहिती कलम ७ (६) नुसार नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.अधिनियामातील कलम ७ (१) व १९(६) चा जाणीवुंक भंग दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ मर्या., नांदेड यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

औरंगाबाद
२४.११.२०१६

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.२९६७/२०१५, ३/३)

जावक क्र.-6600- दि.-27-12-16-

प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ मर्या., मुंबई

३२

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३३५४/२०१५

श्री. एस. एस. जाधव, — अपिलार्थी
रा. पटेलनगर, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड४३१ ८०९.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, यशवंत कॉलेज समोर, नांदेड : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, यशवंत कॉलेज समोर, नांदेड : उत्तरवादी क्र.२

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. एम. के. ठोंबरे, अधीक्षक, सहसंचालक कार्यालय, नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.३०.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, सन २०१४-२०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. माझा भ.नि.निधी G.P.F. क्र.१३३४ आहे. आर्थिक वर्ष ३१ मार्च २०१५ अखेर माझ्या G.P.F. खात्यावर किती रक्कम शिल्लक आहे त्याची माहिती G.P.F. पावती (Statement) सह देणे.
२. नांदेड शिक्षण सह संचालकाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या चार जिल्हयातील नांदेड, परभणी, हिंगोली मधील एकूण किती महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी G.P.F. च्या पावत्या ३१ मार्च २०१५ अखेर पर्यंतच्या प्रदान केलेल्या आहेत त्याची माहिती जिल्हानिहाय आकडेवारी/ संख्येत देणे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम. के. ठोंबरे, अधीक्षक यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग नांदेड यांना उद्देशून लिहिलेले व राज्य माहिती आयोगास पृष्ठांकित केलेले दि.२१.११.२०१६ रोजीचे निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्याचे व काहीही आक्षेप नसल्याचे नमूद केलेले आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

(अपील क्र. ३३५४/२०१५ २/२)

जावक क्र. 6680 दि. 28-12-16

(३३)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३१५८/२०१५

श्री. सुभाष भास्करराव हिवाळे, — अपिलार्थी
रा. नवयुग कॉलनी, भावसींगपुरा, सावित्रीबाई शाळेजवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसीलदार, महसूल-१, तहसील कार्यालय, नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.०४.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, श्री. पी. के. ठाकूर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१९.०६.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"भाग्य नगर पोलीस स्टेशनची संचीका आपल्याकडे अभिलेख विभागामध्ये आहे. त्यामुळे सुमीत सुभाष हे रेल्वेकडून मृत्यू पावले आहेत. त्याबाबतचे रेल्वे मास्तरचे प्रमाणपत्र देण्याची विनंती आहे. पो.स्टे. भाग्यनगर आ.मृ.२९/०९ दि.०५.०५.२००९ रोजी अन्वये अंबेगावचे हाताने लिहलेले प्रमाणपत्र देण्यात यावे."

"माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१९.०७.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

" माहिती न दिल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विलंबाने दि.०७.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती संदर्भातील संचिकेचा शोध सुरु असून, संचिका उपलब्ध होताच माहिती देण्यात येईल असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त झाली असल्याचे दिसून येत नाही.

अतः तहसीलदार, नांदेड यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहिती संदर्भातील संचिकेचा १५ दिवसात शोध घेऊन, पुढील सुनावणीच्यावेळी संपूर्ण माहितीसह आयोगासमोर उपस्थित राहावे. पुढील सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे. सुनावणीसाठीची पुढील तारीख सर्व संबंधितांना आयोगातर्फे यथावकाश कळविण्यात येईल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

वर नमूद केल्याप्रमाणे तहसीलदार, नांदेड यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसह पुढील सुनावणीसाठी उपस्थित राहावे. सुनावणीसाठीची पुढील तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र. ३१५८/२०१५, २/२)

जावक क्र. 6592 दि. 27-12-16

(35)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३१६६/२०१५

श्री. योगेश संभाजी शेळके, — अपिलार्थी
रा. मोरगांव, पो. कांडली बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
तलाठी,
सजा कांडली बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसीलदार,
तहसील कार्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.०५.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा कांडली बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड, श्री. आर. एम. पुरी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड, श्री. गजानन एस. शिंदे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१३.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितलेली आहे.

१. मोरगाव- वडगाव गट क्र. ३०, ३१ लगतच्या शिवेची रुंदी किती आहे.
२. मोरगाव- कांडली गट क्र.३०, २९, २८, २५, २३, २२, १८ व १५ लगतच्या शिवेची रुंदी किती आहे.
३. शिवसज्जा विभाजनाची एक रेषा असल्यास रस्ता काढण्यासाठी जमीन संपादन करण्यासाठी पध्दती स्पष्ट करणे.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

"माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.०७.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

" माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा, कांडली बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड (श्री. पी. व्ही. बुरकुले) यांनी अपिलार्थी यांच्या दि.१२.०५.२०१५ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी अधिनियमातील कलम ७ (१) चा स्पष्ट भंग दिसून येतो. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड, श्री. शरद एस. झाडके यांनी अपिलार्थीच्यादि.०७.०७.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर अजिबात सुनावणी घेतलेली नाही. त्यामुळे या प्रकरणीअधिनियमातील कलम १९ (६) चाही स्पष्ट भंग दिसून येत आहे.

अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्यामुळे अपिलार्थी यांचे अपील मंजूर करण्यात येत असून वर्तमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा कांडली बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती विलंब झाला असल्या कारणाने कलम ७ (६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व पोच प्रत जतन करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा कांडली बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
३. प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा कांडली बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड (श्री. पी. व्ही. बुरकुले) यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याने त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा.
४. सदर आदेशाची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर तामील करावी व त्याची पोच प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

५. प्रस्तुत प्रकरणी संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड, श्री. शरद एस. झाडके यांनी अपिलार्थीच्या दि.०७.०७.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर अजिबात सुनावणी घेतलेली नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केला आहे. त्यासाठी अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.३१६६/२०१५, ३/३)

जावक क्र. 6562 दि. 27-12-15

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३२६५/२०१५

श्री. सतिश ज्ञानोबा आनेराव, — अपिलार्थी
रा. शिवाजी चौक, लोहा, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसीलदार,
तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१४.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड, श्री. सारंग चव्हाण उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.०६.०७.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"फेर नं. १७०३ तहसील क्र.९३३/ जमा/१/ सी.आर तहसील कार्यालय, कंधार दि.०५.०२.१९९३ आधारे मा. तहसीलदार साहेब यांनी तहसील कार्यालयाचा आदेश ०५.०२.१९९३ सर्वे नं. २७९ जमीन २०/१ जमीनच्या फेरफार संबंधी आदेशाची संपुर्ण माहिती देणे संबंधी."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत नाही.

"माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१०.०८.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

"माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड, श्री.सुरेश वडवळकर यांनी अपिलार्थी यांच्या दि.०६.०७.२०१५ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग दिसून येत आहे. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड, श्रीमती अरुणा संगेवार यांनी अपिलार्थीच्या दि.१०.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी अधिनियमातील कलम १९ (६) चाही भंग दिसून येत आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयातील अभिलेखामध्ये शोध घेऊनही ती उपलब्ध झाली नसल्यामुळे ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही.

माहितीचा शोध सुरु असून उपलब्ध होताच ती उपलब्ध करुन देण्यात येईल अशा स्वरुपाचा प्रतिसाद तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने देणे आवश्यक होते असे आयोगाचे मत आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी लेखी स्वरुपात कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्यामुळे अपिलार्थी यांचे अपील मंजूर करण्यात येत असून वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयातील अभिलेखामध्ये शोध घ्यावा व माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य

उपलब्ध करुन द्यावी. शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अशी माहिती जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, कंधार, जि.नांदेड यांनी यथोचित कारवाई योजावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा १५ दिवसात शोध घेऊन माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास वर नमूद केल्याप्रमाणे संबंधितांविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार यथोचित कारवाई योजावी.

३. प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड , श्री.सुरेश वडवळकर यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याने त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा.

४. सदर आदेशाची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर तामील करावी व त्याची पोच प्रत अभिलेखात जतन करुन ठेवावी.

५. प्रस्तुत प्रकरणी संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड, श्रीमती अरुणा संगेवार यांनी अपिलार्थीच्या दि.१०.०८.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर अजिबात सुनावणी घेतलेली नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केला आहे. त्यासाठी अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.३२६५/२०१५, ३/३)

जावक क्र.----6853---- दि.----28-12-16----

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२८८६/२०१५

श्री. मोतीराम गयबु काळे, — अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वडेपुरी, एसआरटी,
ता. लोहा, जि. नांदेड-४३१ ६०६.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय,
बिलोली, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय,
बिलोली, जि. नांदेड.

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीसाठी आयोगासमोर विनाअनुमती अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी चौकशी करुन यथोचित कार्यवाही योजावी, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.१६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.०६.०१.२०१५ ते दि.१६.०४.२०१५ पर्यंतची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. मा. उपविभागीय अधिकारी, बिलोली, जि. नांदेड यांनी दि.२४ मार्च २०१५ रोजी तहसीलदार बिलोली यांना निर्देशीत करण्यात आले त्यानुसार तहसीलदार बिलोली यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती मिळणे.

२. दि. ३० मार्चला कागदपत्र सादर केली नसतील तर जि. प. प. स. निवडणूक २०१२ या कालावधीत अपहार झाल्याचे निश्चित समजून तसा अहवाल मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना सादर केलेल्या अहवालाच्या सत्यप्रती मिळणे.

३. दि.१३.०१.२०१५, ०४.०२.२०१५ रोजीच्या पत्रानुसार तहसीलदार बिलोली हे चौकशीसाठी हजर होऊन चौकशी कामी सहकार्य केले नसल्यास यांच्यावर कोणती कारवाई प्रस्तावीत केली. त्या कारवाईच्या सत्यप्रती मिळणे.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१६.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

" माहिती पुरविण्यात आली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.२९.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणीसाठी नोटीस निर्गमित केल्याचे दिसून येत आहे. तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

"जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देताच दिली आहे असे खोटे भासवून अर्ज निकाली काढला व सुनावणीसाठीचे पत्र देण्यात आले पण निर्णयाची प्रत मिळाली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.११.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती यापूर्वीच उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी, अपिलार्थी यांच्या दि.२९.०५.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठीची नोटीस निर्गमित केली असल्याचे दिसून येत आहे. तथापि निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये माहिती मिळाली नसल्याचे व प्रथम अपिलाचा निर्णय मिळाला नसल्याचे नमूद केलेले आहे.

अतः प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.२९.०५.२०१५ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटत आहे. यास्तव प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,

उपविभागीय अधिकारी कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या दि.२९.०५.२०१५ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दोनही बाजुचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारित करावा. प्रथम अपिलाच्या या सुनावणी दरम्यान अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपिलाच्या या सुनावणीसाठी अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे सूचित करण्यात यावे, या निर्देशासह सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे. भविष्यात माहिती अधिकारातंर्गत प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जांवर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, बिलोली, जि.नांदेड यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत कार्यवाही करुन निर्णय पारित करण्याची दक्षता घ्यावी, अशी त्यांना या प्रकरणी आयोगातर्फे समज देण्यात येत आहे. अन्यथा कलम १९ (६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येऊन कलम २० (२) नुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या दि.२९.०५.२०१५ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

(अपील क्र.२८८६/२०१५, ३/३)

जावक क्र. 6603 दि. 27-12-16

प्रत :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३०९१/२०१५

श्री. मोतीराम गयबु काळे, — अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वडेपुरी, एसआरटी, ता. लोहा, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, बिलोली, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, बिलोली, जि. नांदेड.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.२७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीसाठी आयोगासमोर विनाअनुमती अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी चौकशी करुन यथोचित कार्यवाही योजावी, अशी त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२८.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, जि. प. व, प. स. निवडणूक २०१२ या कालावधीत तहसीलदार, बिलोली, जि. नांदेड यांनी अपहार केले बाबतची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"जा.क्र.२०१५/मि बी/ डेस्क-१/ ग्रापनि / सिआर-२ दि.१२.०५.२०१५ च्या जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या पत्रावर उपविभागीय अधिकारी, बिलोली, जि. नांदेड यांनी केलेल्या कारवाईच्या सत्यप्रती मिळणे. केलेल्या कारवाईच्या व जिल्हाधिकारी नांदेड यांना पाठविलेल्या अहवालाच्या सत्यप्रती."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१७.०६.२०१५ रोजी प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत आहे.

"माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.०८.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी नोटीस निर्गमित केली असल्याचे दिसून येत आहे. तथापि निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

"माहिती दिली नाही व निर्णय दिला नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.०६.२०१५ रोजी विहित मुदतीत प्रतिसाद देऊन, मागितलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरणात चौकशीची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यामुळे माहिती देता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरणामध्ये चौकशीची प्रक्रिया सुरु असल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही असे आयोगाचे मत आहे. तथापि संबंधित प्रकरणाच्या अनुषंगाने चौकशीची प्रक्रिया पूर्ण होऊन निर्णय अंतिम झाला असल्यास अशी माहिती अपिलार्थी यांना देय होते.

संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीसाठीची नोटीस निर्गमित केलेली आहे. तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये, माहिती मिळाली नसल्याचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय पारित केला नसल्याचे नमूद केलेले आहे.

अतः प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.०८.०७.२०१५ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटत आहे. यास्तव प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दोनही बाजुचे म्हणणे विचारात घेऊन निर्णय पारित करावा. प्रथम अपिलाच्या या सुनावणी दरम्यान, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरणात चौकशी पूर्ण होऊन निर्णय अंतिम झाला असल्यास, अशी माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी.

प्रथम अपिलाच्या या सुनावणीसाठी अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे सूचित करण्यात यावे, या निर्देशासह सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, बिलोली, जि.नांदेड यांनी भविष्यात माहिती अधिकारातंर्गत प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जांवर अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्याची दक्षता घ्यावी, अशी त्यांना या प्रकरणी आयोगातर्फे समज देण्यात येत आहे. अन्यथा कलम १९ (६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येऊन कलम २० (२) नुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या दि.०८.०७.२०१५ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.३०९१/२०१५, ३/३)

जावक क्र.-6584- दि.-27-12-15

प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.३०९२/२०१५

श्री. मोतीराम गयबु काळे, — अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वडेपुरी, एसआरटी, ता. लोहा, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, देगलूर, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, देगलूर, जि. नांदेड.

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि.२७.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. शेख गुलाब (अ.का.), उपविभागीय अधिकारी कार्यालय, देगलूर, जि. नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२९.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.०७.०५.२०१५ ते दि.२९.०५.२०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक मनरेगा नांदेड यांच्या जा.क्र.७६७ दिनांक ०७.०५.२०१५ च्या पत्रानुसार उपविभागीय अधिकारी, देगलूर यांनी केलेल्या कारवाईच्या व तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन सादर केलेल्या अहवालाच्या सत्यप्रती मिळणे."

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०६.०७.२०१५ रोजी प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येत आहे.

" माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.०८.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.३०.११.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

"माहिती मिळाली नाही व निर्णयाची प्रत मिळालेली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.०७.२०१५ रोजी प्रतिसाद देऊन माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिवार दि.३०.११.२०१५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अधिनियमातील कलम ७ (१) व कलम १९ (६) चा जाणीवपुर्वक भंग दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये माहिती व प्रथम अपील निर्णयाची प्रत मिळाली नसल्याचे नमूद केलेले आहे. ही बाब विचारात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, देगलूर, जि.नांदेड यांनी अपिलार्थी यांना माहिती अर्जाव्दारे आवश्यक असलेली माहिती व प्रथम अपिलावरील निर्णयाची प्रत पुनश्च विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, या निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

---

(अपील क्र.३०९२/२०१५, २/२)

जावक क्र. 6565 दि. 27-12-15

(40)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२८८५/२०१५

श्री. मोतीराम गयबु काळे,
रा. जानापुरी, पो. वडेपुरी, एसआरटी, ता. लोहा, जि. नांदेड. — अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर,
जि. नांदेड. : उत्तरवादी क्र.१

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड. : उत्तरवादी क्र.२

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर, जि. नांदेड, श्री. एस. डी. वाघमारे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२९.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.११.०८.२०१४ ते २९.०५.२०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मनरेगा, नांदेड यांच्या दि.२६.०३.२०१५ व २५.०५.२०१५ च्या पत्रावर मा. कार्यकारी अभियंता, सा. बा. विभाग, नांदेड यांनी केलेल्या कारवाईच्या सत्यप्रती व जिल्हाधिकारी, नांदेड यांना मा. कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, नांदेड यांनी स्वंयस्पष्ट पाठवलेल्या अहवालाच्या सत्यप्रती मिळणे.
२. दि.११.०८.२०१४ ते दि.२९.०५.२०१५ पर्यंत केलेल्या कार्यवाहीची व पत्रव्यवहाराची संचिका मिळणे.

" माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.०४.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि.२८.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे.

" प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय खोटा आहे " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२३.०६.२०१५ रोजी प्रतिसाद देऊन वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कळविलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली असल्याचे नमूद केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे बरेच माहिती अधिकारातंर्गत माहितीसाठीचे अर्ज केलेले आहेत. सदर प्रत्येक अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोनातून प्रतिसाद देऊन देय होणारी माहिती अपिलार्थी यांना वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतरही अपिलार्थी यांचे समाधान होत नाही. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी ज्या कामाच्या संदर्भात माहितीची मागणी केलेली आहे ते काम देगलूर उपविभागाकडून करण्यात आलेले आहे. तथापि देगलूर उपविभागाने केलेल्या कामाची देगलूर उपविभागाने चौकशी करण्याची बाब उचित नसल्यामुळे प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील मजुरांचे हजेरीपत्रक विभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात आले असून त्या अनुषंगाने चौकशी प्रगतीपथावर आहे. ही बाबही अपिलार्थी यांना वेळेत कळविण्यात आलेली आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर, जि.नांदेड यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्यांश दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा अर्ज उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याकडे सादर करुन, जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मनरेगा, नांदेड यांच्या दि.२६.०३.२०१५ व दि.२५.०५.२०१५ रोजीच्या पत्रावर कार्यकारी अभियंता, नांदेड यांनी केलेल्या कारवाईच्या सत्यप्रती व इतर अनुषंगिक माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी माहितीच्या विषयात नमूद केलेले काम देगलूर उपविभागाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर, जि.नांदेड

(अपील क्र.२८८५/२०१५, २/४)

यांच्याकडे वर्ग केला असल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड येथे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार ज्यावेळी माहितीचा अर्ज प्राप्त होतो त्यावेळी माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालयात उपलब्ध असेल ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध असेल ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये देणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखाद्या कार्यवाहीची अपेक्षा करणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे / खुलासा देणे, भविष्यात माहिती प्राप्त होईल म्हणून माहितीचा अर्ज प्रलंबित ठेवणे या प्रक्रियांचा किंवा या संदर्भातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सरळ व सोपी असून अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड या कार्यालयाशी संबंधित असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अशी माहिती जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाव्दारे अभिप्रेत असलेली माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे अपिलार्थी यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

अतः जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी, जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या संबंधित पत्राच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी कार्यवाही केली असेल तर त्या संदर्भातील माहिती अनुषंगिक कागदपत्रासह अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी किंवा जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या संबंधित पत्राच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही केली नसेल तर त्या संदर्भात माहिती निरंक असे स्पष्ट स्वरुपात अपिलार्थी यांना कळविण्यात यावे. प्रस्तुत प्रकरणात अधिनियमातील कलम ७ (१) व कलम १९ (६) चा जाणीवपूर्वक भंग दिसून येत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

३. आयोगाने आदेशित केल्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील ही बाब अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी व्यक्तिशः पहावी.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

---

(अपील क्र.२८८५/२०१५, ४/४)

जावक क्र. 6601 दि. 27-12-16

प्रत : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड.

(41)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र.२८८७/२०१५

श्री. मोतीराम गयबु काळे, — अपिलार्थी
रा. जानापुरी, पो. वडेपुरी, एसआरटी, ता. लोहा, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि.१०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी असल्याबद्दल दि.०९.११.२०१६ रोजी अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर, जि.नांदेड, श्री.एस.डी.वाघमारे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.एम.व्ही.सांगविकर, उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.११.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये, दि.११.०८.२०१४ ते दि.११.०५.२०१५ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. सोबत जोडलेल्या दिनांक ०१ एप्रिल २०१५ रोजी सहि केलेल्या कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, नांदेड व त्यांनीच दिनांक २३.०३.२०१५ रोजी सा.बा. विभाग नांदेड येथे सुनावणी घेतली त्या निर्णयात मुद्दा नं.२ जन माहिती अधिकारी यांनी विषय- सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत ठोसणी ते काळगट्टा व इब्राहिमपूर ते खंडोबा मंदिर रस्त्यावर खर्च केलेल्या २

लाख ४८ हजार ७०२ रुपयाच्या कामाची व त्यावर वापरलेल्या ८ हाजेरी पत्रकाची व त्यावरील मजूरांची चौकशी करणे बाबतचा अर्ज उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.), यांच्याकडे अर्ज पाठविण्याची सत्यप्रत व त्यासोबत पाठवलेल्या पत्राची सत्यप्रत मिळणे व आवक जावक रजिस्टरची सत्यप्रत मिळणे.

२. दि.११.०८.२०१४ ते दि.११.०५.२०१५ पर्यंत कार्यकारी अभियंता यांनी चौकशी का केली नाही त्याबाबतची शासकीय कागदपत्राच्या सत्यप्रती मिळणे.

" माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये दि.१६.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही.

कारण नमूद न करता अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.११.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देगलूर, जि.नांदेड यांनी त्यांच्या दि.१७.०६.२०१५ रोजीच्या पत्रासोबत संबंधित अर्ज व अनुषंगिक कागदपत्रे उपजिल्हाधिकारी, रोहयो, नांदेड यांच्याकडे पाठविली असल्याचे दिसून येत आहे. संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेले आहे. तथापि माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन दिसून येत नाही.

अतः प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.१६.०६.२०१५ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आयोगास गरजेचे वाटत आहे. यास्तव प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.१६.०६.२०१५ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत सुनावणी घेऊन दोनही बाजुचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारित करावा. प्रथम अपिलाच्या या सुनावणीदरम्यान अपिलार्थीस आवश्यक असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी

संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे सूचित करण्यात यावे. भविष्यात माहिती अधिकारातंर्गत प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत कार्यवाही करुन निर्णय पारित करण्याची प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी दक्षता घ्यावी, अशी त्यांना या प्रकरणी आयोगातर्फे समज देण्यात येत आहे. अन्यथा कलम १९ (६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येऊन कलम २० (२) नुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी, या निर्देशासह सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या दि.१६.०६.२०१५ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

(अपील क्र.२८८७/२०१५, ३/३)

जावक क्र. 6558 दि. 27-12-16

(४२)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९१९/२०१५

श्री. भागवत आत्माराम पुपलवाड, : अपिलार्थी
मु. पो. पाटोदा, ता. नायगांव खैर, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उप विभाग, नायगांव खैर, जि. नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ११.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम. व्ही. सांगवीकर हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीबाबतची चौकशी करुन त्याचा अहवाल आयोगास पाठवावा असे अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना कलम १९ (८) (क) नुसार कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१०.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सन २००५ ते २०१५ मध्ये बरबडा फाटा ते बरबडा येथील डांबरीकरणाचे रस्त्याच्या कामाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "कसलीच माहिती मिळाली नाही अद्याप" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २८.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर दि. २५.०५.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती अधिकारी यांना आठ दिवसांत माहिती देण्याचे आदेश दिले. पण माहिती मिळाली नाही." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

> "सन २००५ ते २०१५ मध्ये बरबडा फाटा ते बरबडा, ता. नायगांव खैर, जि. नांदेड येथील डांबरीकरण रस्त्याचे काम (खड्डे बुजविणे, दुरुस्ती, डांबरीकरण व पुनर्नुतणीकरण) कोणत्या-कोणत्या वर्षी कोणत्या गुत्तेदारामार्फत किती कि. मी. करण्यात आले? व हॉट मिक्स डांबरीकरण किती कि.मी. कुठुन कुठपर्यंत करण्यात आले. सदर रस्त्यावर २००५ ते २०१५ पर्यंत एकुण किती रक्कम खर्च करण्यात आली? कोणत्या विभागामार्फत, त्याचा पुर्ण तपशील व सद्यस्थिती रोडची अवस्था काय? याचा तपशील व बरबडा फाटा ते बरबडा रोडवर किती छोटे पुल बांधण्यात आले? कोणत्या वर्षात व त्याची रक्कम."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन त्यांना माहिती पुरविण्याबाबत कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना प्रथम अपील करावे लागले. त्यानंतर प्रथम

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद

अपीलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशत: मान्य करुन खालीलप्रमाणे आदेश पारीत केले.

"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित अशी परिपुर्ण माहिती हा निर्णय प्राप्त झाल्यापासुन आठ दिवसाचे आत विनाशुल्क द्यावी."

जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रथम अपीलीय आदेशानंतरसुध्दा अपिलार्थीस माहिती पुरविलेली नाही. यावरुन त्यांची माहितीचा अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात उदासिनता स्पष्ट होते. पर्यायाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा जाणीवपुर्वक भंग झाल्याचे आयोगाचे निरिक्षण आहे. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी यांचे नाव निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र. 6577 दि. 27-12-16 (अपील क्र.२९१९/२०१५)

प्रत,

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, स्नेहनगर, वर्कशॉप रोड, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२८१/२०१५

श्री. विजय मारोती परोडवाड, : अपिलार्थी
मु. जंगमवाडी, पो. फुलवड, ता. कंधार, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उप विभाग, कंधार, जि. नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १६.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. ए. एस. उबाळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम. व्ही. सांगवीकर हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०९.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जंगमवाडी पाटी ते जंगमवाडी रस्त्याच्या कामाबाबत माहिती

मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती दिली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १२.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २२.०६.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिश: मागितलेली आहे.

"आपल्या विभागाअंतर्गत चालु असलेल्या जंगमवाडी पाटी ते जंगमवाडी रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक, निविदा, वर्क ऑर्डर, कामासाठी वापरण्यात येत असलेल्या मटेरियलच्या पावत्या, फिस वर्करची नावे. इत्यादी माहिती "

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविल्याचा पुरावा आयोगाच्या पटलावर उपलब्ध करुन दिला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीस अपेक्षित परिपुर्ण माहिती १५ दिवसाचे आत विनाशुल्क द्यावी असे नमुद करुन अपील मान्य करण्यात आले आहे. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविल्याचे पोहच आयोगाच्या पटलावर सादर केले. त्यावर अपिलार्थी यांनी मी मागितलेली माहिती मिळाली व ती समाधानकारक मिळाली आहे. अशा स्वरुपाची दि. २८.०६.२०१६ रोजीची पोहच नमुद आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे व त्यांचे समाधान झाल्याने सदर अपील निकाली काढण्यास पात्र आहे. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत माहिती न उपलब्ध करुन दिल्यामुळे कलम ७ (१) चा भंग झाला असल्याचे आयोगाचे निरिक्षण आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे नांव निश्चित करुन त्यांच्यावर सदर आदेश तामील करावे व त्याची पोहच अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.---6658--- दि.---28-12-16---

(अपील क्र.३२८१/२०१५)

प्रत,

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, श्रेयनगर, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(46)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९१८/२०१५

श्री. भागवत आत्माराम पुपलवाड, : अपिलार्थी
मु. पो. पाटोदा, ता. नायगांव खैर, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, : उत्तरवादी
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा (त.ब.)
ता. नायगांव खैर, जि. नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, नायगांव खैर, जि. नांदेड

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ११.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. त्यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीबाबतची चौकशी करुन त्याचा अहवाल आयोगास पाठवावा असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना कलम १९ (८) (क) अन्वये कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.११.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मौजे पाटोदा त.ब., ता. नायगांव खैर येथील पहिल्या आदर्श शाळेबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.०३.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १८.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १५.०६.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती अधिकारी यांना सात दिवसांत माहिती देण्याचे आदेश दिले. अद्याप माहिती मिळाली नाही." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

> "मौजे पाटोदा (त.ब.) ता. नायगांव खैर, जि. नांदेड येथील पहिली जि. प. आदर्श शाळा कोणत्या कालावधीत व कोणत्या ठिकाणी होती? त्या जागेची माहिती देण्यात यावी. ती जागा कोणाच्या मालकीची होती. सद्यस्थितीत ती जागा (शाळेची) कोणाच्या ताब्यात आहे? त्या जागेची चतु:सिमा व नकाशाची माहिती देण्यात यावी."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांचा माहिती मागण्याबाबत सार्वजनिक हित स्पष्ट होते. ज्या ठिकाणी जुनी शाळा आहे ती जुन्या गट नंबरमध्ये असुन त्यावर खासगी व्यक्तिचा ताबा आहे असा अपिलार्थी यांनी आयोगासमोर युक्तीवाद केला. त्यामुळे सदर माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरी ती अपिलार्थींना मिळणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेऊन आयोग कलम १९ (८) (क) नुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव खैर, जि. नांदेड यांना जन माहिती अधिकारी म्हणुन निश्चित करीत आहे. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव खैर, जि. नांदेड यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जामध्ये नमुद माहिती नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाचे आत पुर्ण करावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.----------- 6578 दि.----------- 27-12-16 (अपील क्र.२९१८/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२७२/२०१५

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

श्री. अनिल तेजेराव सिरसे, : अपिलार्थी
मिलिंदनगर, मुखेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
स्व. लिलावती सतिष आव्हाड, डी. फार्मसी कॉलेज
होकर्णा तांडा, ता. मुखेड, जि. नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, : उत्तरवादी
स्व. लिलावती सतिष आव्हाड, डी. फार्मसी कॉलेज
होकर्णा तांडा, ता. मुखेड, जि. नांदेड

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १४.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीबाबतची चौकशी करुन त्याचा अहवाल आयोगास पाठवावा असे सह संचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१०.०७.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये डी. फार्मसी कॉलेजची विविध विषयाची माहिती (सन २०१० ते २०१५) मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मुदतीत माहिती न दिल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ११.०८.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "मुदतीत माहिती न दिल्यामुळे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"१) आपल्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी प्रवेश फी किती आहे? त्याबाबत लेखी स्वरुपात सविस्तर माहिती देणे २) आपल्या कॉलेजमध्ये सन २०१० ते आजपर्यंत एस. सी. चे विद्यार्थी किती? व ओपनचे विद्यार्थी किती होते? त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व इ.बी.सी. किती मिळाली ? व किती वाटप करण्यात आली? ३) सर्व विषयाच्या लॅबमध्ये लागणारे सर्व प्रकारचे रसायन व सर्व लॅबमध्ये लागणारे साहित्य व मशिनरी किती? ४) आपल्या कॉलेजमध्ये सर्व लॅब किती ? व असिस्टंट किती आहेत? ५) आपल्या कॉलेजमध्ये जे प्राध्यापक आहेत त्यांच्या शैक्षणिक कागदपत्रांची व जात पडताळणीच्या प्रमाणपत्रांची छायांकित प्रत ६) आपल्या कॉलेजचा स्टाफ किती आहे? व त्यांना वेतन किती आहे? बँकेतुन दिलेल्या स्टेटमेंटची छायांकित प्रत."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती त्यांना पुरविली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा सुनावणी घेऊन यथोचित आदेश पारित केले नाही. अपिलार्थीच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता,

त्यांनी एकुण ६ मुद्यावर माहिती मागितलेली असुन त्यातील विषय वेगवेगळे असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ चे नियम ३ (क) (सुधारणा - २०१२) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.

> " ३ (क)- अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधीत असावा आणि त्यात सर्व साधारणपणे दिडशे पेक्षा अधिक शब्द नसावेत, अर्जदाराला एकापेक्षा अधिक विषयाची माहिती हवी असेल तर तो त्याकरीता स्वतंत्र अर्ज करील ;
>
> परंतु एकापेक्षा अधिक विषयाशी संबंधीत अर्ज केला असेल अशा प्रकरणी, जन माहिती अधिकारी केवळ पहिल्या विषयाशी संबंधीत विनंतीबद्दलच माहिती देईल आणि इतर प्रत्येक विषयाकरीता स्वतंत्र करण्याचा सल्ला अर्जदाराला देईल"

उक्त तरतुदीनुसार अपिलार्थी हे मुद्या क्रमांक ०१ मधील माहिती देय ठरते. इतर विषयांसाठी अपिलार्थी यांनी स्वतंत्र अर्ज करणे अपेक्षित आहे. प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडुन अनुक्रमे कलम ७(१) व १९ (६) चा भंग झाल्याचे आयोगाचे निरिक्षण आहे. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**<u>आदेश</u>**

१. सदर अपील अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. १ ची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

५. सह संचालक (तंत्रशिक्षण), विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.--6587------ दि.--27-12-16------ (अपील क्र.३२७२/२०१५)

प्रत,

सह संचालक (तंत्रशिक्षण), विभागीय कार्यालय, शासकिय तंत्रनिकेतनच्या बाजुला, पत्रपेटी क्र. ५१६, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९०२/२०१५

श्री. मोहम्मद अब्दुल खुद्दुस पि. मोहम्मद अब्दुल रशीद, द्वारा -४३१, शेख मारुफ, उमर फारुख मस्जिद जवळ, डॉ. एकबाल नगर, परभणी-४३१४०१ : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी नगरपरिषद कार्यालय, भोकर, जि. नांदेड : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, भोकर, जि. नांदेड : उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १०.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी श्री. सुरेश विठ्ठलराव कावळे हे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१६.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सौ. सफिया बेगम मोहम्मद अब्दुल रशीद यांना नगरपरिषदेने भाडयाने दिलेल्या जागेसंदर्भात माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०७.०५.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "अपीलीय अधिकारी जाणुन-बुजुन सुनावणीला टाळाटाळ करत आहे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती शीघ्र टपालाने मागितलेली आहे.

"आपले पत्र माहिती अधिकार अधिनियम - २००५ जा.क्र./नपभो/१३९८५/२०१३-१४ दि. २८.११.२०१४ चे प्रमाणे सौ. सफिया बेगम मोहम्मद अब्दुल रशीद यांना दिलेली जागा नंतर सभा क्र. ०३ ठराव क्र. ०१, दि. १७.११.२००० रोजी घेतलेला ठराव प्रमाणे ही जागा शे. अजीमोद्दीन शे. बाशुमियाँ व शे. मुखीद व शे. मुमताज यांना भाडयाने दिली आहे अशी माहिती आपण दिली होती. पण या सर्वांना ठराव क्र. ०१ सभा क्र. ०३ प्रमाणे किती जागा भाडे तत्वावर देण्यात आली? याची काहीही माहिती आपण दिली नाही. तरी जन माहिती अधिकारी यांना विनंती की, हया सर्वांना देण्यात आलेली जागेची चतु:सिमा (आत व रोडवर किती?) द्यावी. आणि यांना कोणत्या दिनांकापासुन जागा भाडे तत्वावर देण्यात आली याची माहिती द्यावी.

आपण दिलेली माहिती नुसार तीन लोकांना सभा क्र. ०३ ठराव क्र. ०१ दि. १७.११.२००० प्रमाणे जागा भाडयाने दिली आहे. १) शे. अजीमोद्दीन शे. बाशुमियाँ २) शे. मुखीद ३) शे. मुमताज तर वसुल रजिस्टरवर दोनच नाव का आहे तीन का नाही. तिसरा व्यक्ति कोण आहे? नियमाप्रमाणे आपण जागा भाडेतत्वावर देत आहे म्हणुन प्रमाणपत्र दिला जातो. तर हे सर्वांना आपण प्रमाणपत्र दिले होते का? जर दिले असेल तर त्याची झेरॉक्स देण्यात यावी.

दि. १७.११.२००० रोजी घेण्यात आलेली सभा क्र. ०३ ला किती सभासद उपस्थित होत. व किती सभासदांची मंजुरी या ठराव क्र. ०१ ला होती? याची माहिती व सभासदांची उपस्थिती पुरावा आणि ठरावपत्राची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

सौ. सफिया बेगम मोहम्मद अब्दुल रशीद यांच्याकडुन केव्हापासुन व कुठपर्यंत भाडे घेण्यात आले. शे. अजीमोद्दीन शे. बाशुमियाँ व शे. मुखीद व शे. मुमताज यांच्याकडुन केव्हा पासुन भाडे घेण्यात आले ? व आज आपण जागा भाडे व इतर कोणतेही प्रकारचे भाडे घेत आहे का? जर घेत असेल तर कोणाच्या नावाने घेत आहे?

सौ. सफिया बेगम मोहम्मद अब्दुल रशीद यांना सभा क्र. ४१ ठराव क्र. १८३ (२) दि. २५.११.१९८६ रोजी घेतलेल्या ठरावाप्रमाणे १५/४० फुट नांदेड-भोकर रोडवरची जागा भाडेतत्वावर देण्यात आली होती नंतर या जागेवर एकुण किती ठराव घेण्यात आले ? याची माहिती देण्यात यावी."

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, जन माहीती अधिकारी यांनी अपीलार्थी यांचा माहीतीचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन त्यांना मुदतीत माहीती पुरविण्यास्तव सकारात्मक दृष्टिकोन ठेवुन प्रयत्न केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अधिनियमातील तरतुदीनुसार कर्तव्याचे पालन केलेले नाही. सुनावणी दरम्यान अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन न देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. रामेश्वर शंकरराव वाघमारे, कार्यालयीन अधिक्षक, नगरपरिषद, भोकर व प्रथम अपीलाची सुनावणी न घेण्यास तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी श्री. आशुतोष दिगंबरराव चिंचाळकर, मुख्याधिकारी, नगरपरिषद, भोकर हे जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे.

माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. त्यामुळे सदर अपील मंजुरीस पात्र ठरते. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे अपिलार्थीस नुकसान भरपाई का मंजुर करण्यात येऊ नये? याबाबतचा संबंधीतांकडुन घेणे आयोगास आवश्यक वाटते. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. रामेश्वर शंकरराव वाघमारे, यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी श्री. आशुतोष दिगंबरराव चिंचाळकर यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

५. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थीस कलम १९ (८) (ख) अन्वये रु. १०,०००/-(दहा हजार फक्त) नुकसान भरपाई का मान्य करण्यात येऊ नये? याचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. रामेश्वर शंकरराव वाघमारे व तत्कालीन प्रथम

अपीलीय अधिकारी श्री. आशुतोष दिगंबरराव चिंचाळकर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

६. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी तत्कालीन जन माहीती अधिकारी श्री. वाघमारे व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी श्री. चिंचाळकर यांच्यावर सदर आदेशाची प्रत तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.------------ 6665 दि.------------ 28-12-16

(अपील क्र.२९०२/२०१५)

प्रत,

जिल्हाधिकारी, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९३७/२०१५

| | | |
|---|---|---|
| | श्री. संजय दत्तराम शेळगे,<br>जिल्हा परिषद हायस्कुल, वाघी, ता. जि. नांदेड | : अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, नांदेड | : उत्तरवादी |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : उत्तरवादी |

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १२.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी. आय. येरपुलवार हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जिल्हा परिषद हायस्कुल, वाघी या शाळेसंबंधीत माहिती मागितलेली

आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.०४.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याबाबत" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १८.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "निकाल दिला नाही माहिती दिली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"१) बहुजन शिक्षक संघाने मा. मु.का.अ. जि.प. नांदेडे यांच्याकडे जि. प. हा. वाघी शाळेसंबंधीत तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने आपण दि. ०३.०२.२०१५ रोजी केलेल्या चौकशीच्या सर्व कागदपत्रासह व तक्रारी अर्जासह अहवालाची प्रती २) शाळेतील शिक्षक सुर्यवंशी, बिंगेवार, हनुमते, सोनकांबळे व गावातील पालक यांनी दिलेल्या अर्जाच्या प्रती. ३) वरिष्ठांनी आपणांस चौकशी अधिकारी म्हणुन नेमले होते त्या पत्राची प्रत व वरिष्ठांकडे आपण पाठविलेले अहवाल."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १६.०४.२०१५ अन्वये प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेतल्याचे आढळुन आले नाही. तथापी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे मला माहिती मिळाली आहे व माझे द्वितीय अपील निकाली काढावे अशा स्वरुपाचे लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केले.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीस माहिती मिळाली असल्यामुळे सदर अपील निकाली काढण्यास पात्र आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कलम ७ (१) जाणीवपुर्वक भंग झाल्याचे दिसुन येत नाही. तथापी, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलीय सुनावणीचे आदेश पारीत न

केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग झाला असल्याचे आयोगाचे निरिक्षण असुन त्यामुळे संबंधीताचा खूलासा घेणे आयोगास आवश्यक वाटते. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी यांचे नाव निश्चित करुन त्यांच्यावर सदर आदेश तामील करावे व त्याची पोहच अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

दिनांक:२४.११.२०१६

---

जावक क्र.--6563---- दि.--22-12-16

(अपील क्र.२९३७/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३००९/२०१५

श्री. गुलाब देवराव सुर्यवंशी,
पिंपळकौठा, (चोर), पो. दरेगांव, ता. मुदखेड, जि. नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पिंपळकौठा (चोर), ता. मुदखेड,
जि. नांदेड. : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, मुदखेड, जि. नांदेड. : उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २१.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्रीमती एम. आर. बाचेवाड व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. एन. सी. बंगाळे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२०.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये ग्रामपंचायत पिंपळकौठा (चोर), या कार्यालयाच्या अंतर्गत झालेल्या कामाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती विहित मुदतीत न दिल्याने नाराजीने अपील" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २६.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २९.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती न मिळाल्यामुळे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"सन २०१० ते २०१५ या कालवधीत जि. प. व पं. स. अंतर्गत ग्रा. पं. कार्यालय पिंपळकौठा ता. मुदखेड, जि. नांदेड कार्यालयास प्राप्त निधीचा खर्चाचा तपशील व m.b. मिळणे बाबत. सन २०१० ते २०१५ या कालावधीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत मंजुर झालेल्या खर्चाचा तपशील व m.b. मिळणे बाबत. सन २००८ ते २०१५ या कालावधीत महाराष्ट्र ग्रा. रो. ह. यो. अंतर्गत व महात्मा गां. ग्रा. रो. ह. योजने अंतर्गत मंजुर झालेल्या कामाचा खर्चाचा तपशील तसेच सदरील योजनेवर मजुरी केलेल्या रोजगार हजेरी मस्टर प्रत. तसेच सन २०१० ते २०१५ कालावधीतील मंजुर घरकुल लाभार्थी यादी व त्यांचे अंदाजपत्रक मिळणे बाबत. "

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन माहिती पुरविण्यासंदर्भात कोणताही प्रयत्न केल्याचे आयोगास दिसुन आले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. २९.०७.२०१५ रोजी सुनावणी घेऊन १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेशीत केले आहे. या आदेशाचे अवलोकन केले असता, पुर्वीचे ग्रामसेवक श्री. सुनिल पारडे यांनी पदभार दिला नसल्यामुळे अर्जदारास माहिती देता आली नाही ही बाब समोर येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आता माहिती प्राप्त झाली आहे असे आयोगासमोर सांगितले असता सदर माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी

अशी सुचना त्यांना करण्यात आली. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तत्कालीन ग्रामसेवक श्री. राठोड, श्री. पारडे व श्री. पपुलवाड हे जबाबदार असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले. त्यामुळे आयोगास त्यांचा खुलासा घेणे आवश्यक वाटतो. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. राठोड, श्री. पारडे व श्री. पपुलवाड यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) (एकत्रित) शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी श्री. राठोड, श्री. पारडे व श्री. पपुलवाड यांच्यावर सदर आदेशाची प्रत तामील करावी व त्याची प्रत आयोगास पाठवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र. 6602 दि. 27-12-16 (अपील क्र.३००९/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९५६/२०१५

श्री. ज्ञानेश्वर गणेशराव माने, : अपिलार्थी
रा. पारवा, पो. कांडली (बु.) (व्हाया तामसा),
ता. हिमायतनगर, जि. नांदेड-४३१७१३

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, पारवा, ता. हिमायतनगर, जि. नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, हिमायतनगर, जि. नांदेड

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १४.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. जाधव व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. आर. डी. क्षिरसागर हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.३०.०८.२०१४ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सन २०१२-१३ ते २०१३-१४ या आर्थिक वर्षातील ग्रामपचांयतीच्या

कामाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती मिळाली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २८.११.२०१४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती शीघ्र टपालाने मागितलेली आहे.

> "सन २०१२-१३ ते २०१३-१४ या आर्थिक वर्षातील गट ग्रामपंचायत कार्यालय, पारवा बु. येथील आलेल्या निधीचा तपशील, कोणत्या कामासाठी आला?, कोणत्या कामासाठी वापरला? व विशेषत: तंटामुक्तीचा निधी कोणत्या कामासाठी वापरला."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही. त्यानंतर अपिलार्थीने आयोगाकडे दि. १२.०१.२०१५ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपील क्र. १२०/२०१५ मध्ये दि. ०७.०३.२०१५ रोजीच्या आदेशानुसार अपिलार्थीच्या दि. २८.११.२०१४ रोजीच्या प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा असे आदेशीत केले होते. सदर प्रकरणामध्ये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर, जि. नांदेड यांना प्रथम अपीलीय अधिकारी म्हणुन निश्चित केले होते. आयोगाने आदेशीत करुनही संबंधीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणताही सुस्पष्ट आदेश पारित केल्याचा पुरावा सुनावणी दरम्यान आयोगाच्या पटलावर आला नाही.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांच्या दि. ३०.०८.२०१४ रोजीच्या माहिती अर्जानुसार संबंधीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या उदासिनतेमुळे अद्याप पर्यंत त्यांना माहिती मिळाली नसल्याने ते कलम १९ (८) (ख) अन्वये नुकसान भरपाईस पात्र ठरतात. तसेच संबंधीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची कृती अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) च्या भंग करणारी आहे. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. कलम १९ (८) (ख) अन्वये अपिलार्थी यांना रु. २०००/- नुकसान भरपाई मान्य करण्यात येते. सदर नुकसान भरपाई आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाने अदा करावी.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

५. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर, जि. नांदेड यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.------------- 6567 दि.------------- 27/12/16

(अपील क्र.२९५६/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३१५१/२०१५

श्री. गंगाराम सुरेश तिमापुरे, : अपिलार्थी
मु.पो. सिरंजणी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, सिरंजणी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, हिमायतनगर, जि. नांदेड

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०३.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. आर. के. खिल्लारे व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. आर. डी. क्षिरसागर हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१४.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये २००५ ते २०१५ पर्यंत ग्रामपंचायतीच्या विविध कामाची माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती अधिकाराचा अर्ज करुन विहित मुदत संपुनही माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २४.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"२००५ ते २०१५ आज अखेरपर्यंत १) सर्व शासकिय यंत्रणांच्या लाभार्थ्यांची यादी २) सर्व मंजुर चालु विकास कामांची माहिती प्रत्येक योजनानिहाय खर्च कोठे कसा झाला त्याच्या पावत्या व खर्चाचे रजिस्टरचे झेरॉक्स मिळाव्या ३) प्रत्येक ग्रामसभेच्या सर्व ठरावाच्या प्रती, ग्रामसभेच्या उपस्थित रजिस्टरच्या झेरॉक्स ४) ग्रामपंचायतीच्या २००५ पासुन आजपर्यंत प्रत्येक वर्षीचा लेखापरिक्षण अहवाल."

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही.

माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ च्या प्रभावी

अंमलबजावणीबाबतची उदासिनता आयोगास दिसुन आली. परिणाम स्वरुप संबंधीतांची कृती अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. गर्दसवार व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. आर. डी. क्षीरसागर जबाबदार असल्याचे सुनावणी दरम्यान आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. गर्दसवार यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. प्रथम अपिलीय अधिकारी श्री. आर. डी. क्षीरसागर यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र. 6579 दि. 27-12-15

(अपील क्र.३१५१/२०१५)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३११५/२०१५

श्री. बापुराव गोविंदराव शिरुरकर, : अपिलार्थी
प्राजक्ता निवास, दत्त मंदिराजवळ, ब्राम्हणगल्ली,
अहमदपुर, जि. लातुर- ४१३५१५

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक लेखा अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, लोहा, जि. नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, लोहा, जि. नांदेड

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ३१.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. ए. व्ही. बनसोडे व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. आय. एन. मोगले हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१८.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांनी अपील क्र. ३१९६/२०१३ मध्ये दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत (दि. ०७.१०.२०१४ ते आजपर्यंत) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०६.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती दिली नाही, माहिती न देण्याची कारणे कोणती?" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०६.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, माहिती दिली नाही, आयोगाच्या निर्णय आदेशाचा अवमान केला आहे." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

"मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांनी प्रकरण क्र. ३१९६/२०१३ प्रकरणी ३० दिवसाच्या आत वस्तुनिष्ठ माहिती पुरविण्याचे आदेश दि. ०७.१०.२०१४ च्या निकालपत्रानुसार दिले. आज सहा महिने होऊन गेले रा.मा.आ. खंडपीठ औरंगाबादच्या आदेशानुसार माहिती का दिली नाही? आदेशाचे अवमान झाल्याचे यावरुन दिसुन येते. ३० दिवसांतच काय पण आजपर्यंत ही आदेशाची अंमलबजावणी झाली नाही. व आदेशानुसार मला किंवा राज्य माहिती आयोगाला आजपर्यंत कोणतीही माहिती का दिली नाही? मा. रा. मा. आ. खंडपीठ औरंगाबाद यांच्या प्रकरण क्र. ३१९६/२०१३ च्या निर्णयाची प्रत यापुर्वी मी आपल्या कार्यालयास दिली आहे. व आयोगानेही प्रत पाठवली आहे"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी गट विकास अधिकारी, लोहा पंचायत समिती यांचे आमच्याकडे कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे पत्र आयोगाच्या पटलावर ठेवले. यासह अपिलार्थी यांनी दि. ०१.१२.२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), गट विकास अधिकारी, पंचायत समिती लोहा, जन माहिती अधिकारी तथा सहायक लेखाधिकारी, पंचायत समिती, लोहा यांना उद्देशुन दिलेले पत्र सुध्दा आयोगास दिले.

त्यामध्ये संबंधीतांना आयोगाच्या आदेशानुसार माहितीच्या अधिकारातील प्रकरणे सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन हाताळावे याबाबत समज दिलेली आहे.

अपिलार्थी यांची मुळ मागणी द्वितीय अपील क्र. ३१९६/२०१३ मध्ये केलेल्या कार्यवाही संदर्भात आहे. सदर द्वितीय अपील क्र. ३१९६/२०१३ मध्ये सुनावणी दि. ०७.१०.२०१४ अन्वये आयोगाने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी वस्तुस्थिती आहे ती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत नोंदणीकृत टपालाने कळवावे असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना आदेशीत केले होते. अशी माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असणे अपेक्षित नाही. अपिलार्थी यांनी सदर माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचेस्तरावर माहिती करणे अपेक्षित होते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०६.२०१५ च्या पत्रान्वये दिलेला प्रतिसाद प्रथम दर्शनी समर्थनीय वाटतो. सदर दि. २०.०६.२०१५ चे पत्र मला दि. १०.११.२०१५ रोजी मिळाल्याचे अपिलार्थीचे सदर पत्रावर पोहच नमुद असुन त्यापृष्ठयर्थ टपाल पाकीटाचा पुरावा त्यांनी आयोगासमोर ठेवला. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन पत्र तब्बल चार महिन्यानंतर निर्गमित केले असे दिसुन येते. त्यानंतर त्यांच्या दि. ०६.०७.२०१५ रोजीच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेतली नाही. याठिकाणी अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) चा भंग स्पष्ट होतो.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलाश्याचे अवलोकन केले असता, त्यांनी द्वितीय अपील क्र. ३१९६/२०१३ मधील प्रकरणाचा खुलासा सादर करुन आयोगाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी चौकशी करावी व आवश्यकतेनुसार संबंधीतांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी व त्याचा अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत पाठवावा तसेच अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र "अ" मध्ये नमुद केल्यानुसार द्वितीय अपील क्र. ३१९६/२०१३ मध्ये आयोगाने आदेशीत केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाच्या पटलावर आलेला नाही. त्यामुळे सदर प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीस वस्तुस्थिती कळविली किंवा कसे? याची शहानिशा झाली नाही. तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी याबाबत

झालेल्या विलंबाचा खुलासा एक महिन्याच्या आत आयोगास पाठवावा असे त्यांना कलम १९ (८) (क) नुसार कळविण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०६.२०१५ अन्वये अपिलार्थीस दिलेला प्रतिसादाच्या अधीन राहुन सदर अपील निकाली काढण्यास पात्र असल्याचे आयोगाचे निरिक्षण आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र. 6580 दि. 27-12-16 (अपील क्र.३११५/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

५६)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३११६/२०१५

श्री. बापुराव गोविंदराव शिरुरकर, : अपिलार्थी
प्राजक्ता निवास, दत्त मंदिराजवळ, ब्राम्हणगल्ली,
अहमदपुर, जि. लातुर- ४१३५१५

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक लेखा अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, लोहा, जि. नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, लोहा, जि. नांदेड

राज्य माहिती आयोग
खंडपीठ औरंगाबाद

## (आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)
## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. ३१.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. ए. व्ही. बनसोडे व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. आय. एन. मोगले हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१८.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांनी अपील क्र. १८५१/२०१२ मध्ये दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत (दि. ०७.१०.२०१४ ते आजपर्यंत)

माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०६.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०६.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "अपीलीय अधिकारी पं. स. लोहा यांनी सुनावणी घेतली नाही, माहिती दिली नाही, आयोगाच्या निर्णयाचा अवमान केला आहे." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांनी प्रकरण क्र. १८५१/२०१२ च्या निर्णय आदेशात ३० दिवसाच्या आत वस्तुनिष्ठ माहिती पुरविण्याचे आदेश दि. ०७.१०.२०१४ दिले. आज सहा महिन्या वर कालावधी लोटला अद्याप पावेतो मला किंवा मा. रा.मा.आ. खंडपीठ औरंगाबाद यांना कोणतीही वस्तुनिष्ठ माहिती आदेशानुसार का कळविली नाही? आदेशाची अंमलबजावणी का केली नाही? वस्तुनिष्ठ माहिती न देण्याचे कारणे कोणती? मा. रा. मा. आ. खं. औरंगाबाद यांच्या आदेशाचा अवमान का केला? वरील प्रकरण क्र. १८५१/२०१२ च्या निर्णयाची प्रत यापुर्वी मा. आयोगाने आणि मी स्वत: आपल्या कार्यालयास पाठविलेली आहे. ती आपल्याला मिळाली आहे. वस्तुनिष्ठ माहिती का पुरविली नाही? खंडपीठाच्या आदेशाचा अवमान का केला? अंमलबजावणी का केली नाही?"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी गट विकास अधिकारी, लोहा पंचायत समिती यांचे आमच्याकडे कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे पत्र आयोगाच्या पटलावर ठेवले. यासह अपिलार्थी यांनी दि. २०.१०.२०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), गट विकास अधिकारी, पंचायत समिती लोहा, यांना उद्देशुन दिलेले पत्र आयोगास दिले.

अपिलार्थी यांची मुळ मागणी द्वितीय अपील क्र. १८५१/२०१२ मध्ये केलेल्या कार्यवाही संदर्भात आहे. सदर द्वितीय अपील क्र. १८५१/२०१२ मध्ये सुनावणी दि. ०७.१०.२०१४ अन्वये आयोगाने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी वस्तुस्थिती आहे ती अपिलार्थी यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाचे आत नोंदणीकृत टपालाने कळवावे असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना आदेशीत केले होते. अशी माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असणे अपेक्षित नाही. अपिलार्थी यांनी सदर माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचेस्तरावर माहिती करणे अपेक्षित होते. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०६.२०१५ च्या पत्रान्वये दिलेला प्रतिसाद प्रथम दर्शनी समर्थनीय वाटतो. सदर दि. २०.०६.२०१५ चे पत्र मला दि. १०.११.२०१५ रोजी मिळाल्याचे अपिलार्थीचे सदर पत्रावर पोहच नमुद असुन त्यापृष्ठयर्थ टपाल पाकीटाचा पुरावा त्यांनी आयोगासमोर ठेवला. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन पत्र तब्बल चार महिन्यानंतर निर्गमित केले असे दिसुन येते. त्यानंतर त्यांच्या दि. ०६.०७.२०१५ रोजीच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेतली नाही. याठिकाणी अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) चा भंग स्पष्ट होतो.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र "अ" मध्ये नमुद केल्यानुसार द्वितीय अपील क्र. १८५१/२०१२ मध्ये आयोगाने आदेशीत केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाच्या पटलावर आलेला नाही. त्यामुळे सदर प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीस वस्तुस्थिती कळविली किंवा कसे? याची शहानिशा झाली नाही. तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी याबाबत झालेल्या विलंबाचा खुलासा एक महिन्याच्या आत आयोगास पाठवावा असे त्यांना कलम १९ (८) (क) नुसार कळविण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०६.२०१५ अन्वये अपिलार्थीस दिलेला प्रतिसादाच्या अधीन राहुन सदर अपील निकाली काढण्यास पात्र असल्याचे आयोगाचे निरिक्षण आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

## आदेश

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

दिनांक:२४.११.२०१६

---

जावक क्र. 6581 दि. 27-12-16

(अपील क्र.३११६/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३३००/२०१५

श्री. चंदुसिंग पापासिंग ठाकुर, : अपिलार्थी
मु. पो. नावंदी, ता. नायगांव (खै), जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत नावंदी, ता. नायगांव (खै), जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), : उत्तरवादी
पंचायत समिती नायगांव (खै), जि. नांदेड.

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. चव्हाण एस. सी. व प्रथम अपीलीय अधिकारी बी. वाय. काटकर हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२३.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सन २०१२ पासुन ग्रामपंचायत नावंदी येथे किती सिंचन विहिरी मंजुर झाले व किती गोठे मंजुर झाले या कामांची स्थिती व रोजगारांची व अदा केलेल्या रकमेची माहिती मिळणे बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "दि. २३.०४.२०१५ च्या मा. अ. अर्जाप्रमाणे ग्रा. पं. नावंदी कार्यालयाकडुन माहिती मिळाली नसलेबाबत." असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे

कलम १९(१) अन्वये दिनांक २२.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती अधिकार अधिनियम -२००५ द्वारे मागविण्यात आलेली माहिती न दिल्याबाबत व पंचायत समिती स्तरावर अपील अर्जाची सुनावणी न करता दखल न घेतल्या बाबत " असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितलेली आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

"दि. ०२ एप्रिल २०१२ पासुन आज तारखेपर्यंत किती सिंचन विहिरींना मंजुरी मिळाली त्या शेतकऱ्यांचे संपुर्ण नांव व गट क्रमांकाची माहिती देणे. मंजुर झालेल्या सिंचन विहिरीपैकी पुर्ण कामे किती, चालु कामे किती, बंद कामे किती, बंद झाल्याचे कारणे काय? सर्व मंजुर मस्टरची झेरॉक्स प्रती सहीत अदा झालेली रकमेची संपुर्ण माहिती. गोठयांची मंजुरी तसेच कामाची स्थिती याबाबत अदा झालेली रकमेची माहिती मंजुर मस्टरची झेरॉक्स प्रती मिळणे बाबत. दि. २९.१२.२०१४ रोजी दिलेल्या अर्जाची कार्य शहानिशा केली त्याची संपुर्ण माहिती"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता सदर माहिती ही वैयक्तिक वादापोटी मागितलेली दिसुन आल्याने आयोगाने अपिलार्थी यांना ही बाब स्पष्ट विचारली असता, त्यांनी वाद असल्याचे कबुल केले व त्यास जन माहिती अधिकारी यांनी दुजोरा दिला. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन माहिती अधिकार अधिनियम- २००५ च्या कलम ८ (१) (त्र) मधील तरतुदीच्या अधीन राहुन सदर अपील फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

तथापी, प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर विहित मुदतीत प्रतिसाद न दिल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दाखल प्रथम अपीलावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) चा

जाणीवपुर्वक भंग झाल्याचे आयोगाचे निरिक्षण आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदर अपील फेटाळण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणी न घेतल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.---6560--- दि.---27-12-15 (अपील क्र.३३००/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२८२/२०१५

श्री. विजय मारोती परोडवाड, : अपिलार्थी
मु. जंगमवाडी, पो. फुलवळ, ता. कंधार, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत जंगमवाडी, ता. कंधार, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), : उत्तरवादी
पंचायत समिती कंधार, जि. नांदेड.

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १६.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. एस. एल. सोनटक्के व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी एस. ए. कदम हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०१.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये आर्थिक वर्ष २०१४ ते २०१५ मध्ये करण्यात आलेल्या कामाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती दिली नसल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०६.०७.२०१५ रोजी प्रथम अपील

दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ३१.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

> "आपल्या कार्यालयाअंतर्गत आर्थिक वर्ष २०१४ ते २०१५ आजपर्यत कोणकोणते कामे करण्यात आली? त्याची कामनिहाय अंदाजपत्रक, वर्क ऑर्डर, सर्व साधारण अहवाल, मोजमाप पुस्तिका, काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, योजनानिहाय बँक स्टेटमेंट इ."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना प्रथम अपीलाच्या सुनावणी दरम्यान माहिती उपलब्ध करुन दिली होती परंतु त्यांनी त्यातील संपुर्ण माहिती न स्विकारता "जनरल कॅशबुकचे फक्त पाच पेजेस दिले व्यतिरिक्त कोणतीच माहिती देण्यात आली नाही " असा शेरा नमुद करुन तेवढीच माहिती स्वीकारुन स्वाक्षरी केलेली दिसते. आज जन माहिती अधिकारी यांनी ५८ पृष्ठे असलेली माहिती आयोगासमक्ष अपिलार्थीस दिली. तथापी, पुर्वी दिलेली माहिती तपासुन त्यावर अपिलार्थी यांनी दिलेला शेरा योग्य दिसुन येत नाही. अपिलार्थीस माहिती मिळाली असल्याने सदर अपील निकाली काढण्यास पात्र आहे. जन माहिती अधिकारी श्री. एस. एल. सोनटक्के यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांची कृती कलम ७ (१) चा भंग ठरणारी आहे. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी श्री. एस. एल. सोनटक्के यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांनी जन माहीती अधिकारी श्री. एस. एल. सोनटक्के यांच्यावर सदर आदेशाची प्रत तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.------------- 6568 दि.------------- 27-12-16

(अपील क्र.३२८२/२०१५)

प्रत,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२८२-अ/२०१५

श्री. विजय मारोती परोडवाड, : अपिलार्थी
मु. जंगमवाडी, पो. फुलवळ, ता. कंधार, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
पंचायत समिती कार्यालय कंधार, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कक्ष अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती कंधार, जि. नांदेड.

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. १६.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित असुन प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी एस. ए. कदम हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२५.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये २००९ ते २०१५ पर्यंत बारुळ सर्कलमध्ये घरकुल लाभधारकांसदर्भात माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती न दिल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २९.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १०.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"आपल्या विभागाअंतर्गत बारुळ सर्कलमध्ये सन २००९ ते २०१५ आजपर्यंत इंदिरा आवास योजना, राजीव गांधी निवारा क्र. १, रमाई आवास योजना यांची गावनिहाय यादी, लाभधारकांना देण्यात आलेल्या धनादेशाचा तपशील, मोजमाप पुस्तिका, घर पुर्णत्वाचे प्रमाणपत्र, नमुना नं. ८ इ."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अधिनियमात नमुद मुदतीनुसार सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन माहिती पुरविली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे अपील मान्य करुन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

"१. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही जवळपास सात वर्षाची असुन ती जास्त स्वरुपाची आहे व वेगवेगळया विभागाशी संबंधीत असल्यामुळे अपिलार्थी श्री. परोडवाड यांनी ती माहिती पाहुन घ्यावी व जी आवश्यक आहे ती माहिती घेण्यात यावी. २. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दाखविण्याबाबत अपिलार्थी यांना एक दिवसाची कोणतीही तारीख देऊन बोलावुन घेऊन माहिती पाहणी करुन घेणेबाबत कळविणे किंवा तोंडी सुचना देणे."

त्यानंतर अपिलार्थीस दि. १३.०७.२०१५ च्या पत्रान्वये मोघम स्वरुपाचे अवलोकनाचे पत्र दिले. त्यावर अपिलार्थी यांनी दि. २०.०७.२०१५ रोजी अवलोकनासाठी निश्चित वेळ व तारीख कळवावा असे लेखी स्वरुपात सार्वजनिक प्राधिकरणास कळविल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले यावरुन त्यांना निश्चित दिनांक कळवुन अवलोकनाची संधी दिली गेली नाही असे आयोगाचे निरिक्षण आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी

यांनी विहित मुदतीमध्ये अपिलार्थी यांना प्रतिसाद न दिल्याने त्यांची कृती कलम ७ (१) चा भंग करणारी आहे. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील अंशतः मान्य करण्यात येत असुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एक निश्चित तारीख व वेळ देऊन माहितीचे पुनःश्च अवलोकन देण्यात यावे व त्यांनी चिन्हांकित केलेली माहिती कलम ७ (६) नुसार विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी यांचे नाव निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र. 6574 दि. 27-12-16 (अपील क्र.३२८२-अ/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२८३/२०१५

श्री. विजय मारोती परोडवाड, : अपिलार्थी
मु. जंगमवाडी, पो. फुलवळ, ता. कंधार, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत जंगमवाडी, ता. कंधार, जि. नांदेड.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), : उत्तरवादी
पंचायत समिती कंधार, जि. नांदेड.

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १६.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. एस. एल. सोनटक्के व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस. ए. कदम हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२२.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालयामार्फत तेराव्या वित्त आयोगाच्या योजनेअंतर्गत चालु असलेल्या कामाबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "मागितलेली माहिती न दिल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक २३.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १५.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"ग्रामपंचायत कार्यालयामार्फत तेरा वित्त आयोग योजनेअंतर्गत चालु असलेल्या कामाचे कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक, सर्वसाधारण अहवाल, कामासाठी वापरण्यात येत असलेल्या मटेरियच्या पावत्या इत्यादी "

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपीलीय सुनावणी दरम्यान माहिती दिली असल्याचे आयोगास सांगितले. त्यावर अपिलार्थी यांना विचारणा केली असता, त्यांनी माहिती मिळाली परंतु त्यामध्ये मटेरियलच्या पावत्या मला मिळाली नसल्याचे आयोगास सांगितले. सदर मटेरियलच्या पावत्या आज आयोगासमक्ष अपिलार्थीस देण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. याठिकाणी कलम ७ (१) चा जाणीवपुर्वक भंग दिसुन येत नाही. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.------------- 6575 दि.-------------- 27/12-16

(अपील क्र.३२८३/२०१५)

(61)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३३९५/२०१५

श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
म.न.पा. शाळा क्र. ३२, बरकत नगर, लातुर-४१३५१२

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, : उत्तरवादी
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, : उत्तरवादी
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

## निर्णय

अपिलार्थी यांनी दि. २९.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल आयुक्त, लातुर शहर महानगरपालिका, लातुर यांनी आयोगास तात्काळ कळवावा असे त्यांना कलम १९ (८) (क) अन्वये कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०६.०७.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये पदवीधर वेतणश्रेणी बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "काहीही एक माहिती दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०७.०८.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "कुठलीच माहिती मिळाली नाही तसेच सुनावणीचे पत्र काढले नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती टपालाने मागितलेली आहे.

"मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातुर यांच्या पदवीधर वेतणश्रेणी निश्चिती सन २०१४-१५ निर्णयांस अनुसरुन म.न.पा. लातुर मधील पदवीधर शिक्षकांची सेवाजेष्ठता यादी तयार करण्याबाबत मा. शिक्षण उप संचालक, लातुर विभाग, लातुर यांनी त्यांचे पत्र क्र. सीउसला/प्रावि-२/२०१४-२०१५/१०५२०/२१ दि. ०१.०८.२०१४ अन्वये आदेशीत केले होते त्यासंदर्भात झालेल्या कार्यवाहीचा आदेश देण्यात यावा."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, जन माहीती अधिकारी यांनी अपीलार्थी यांचा माहीतीचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन त्यांना मुदतीत माहीती पुरविण्यास्तव सकारात्मक दृष्टिकोन ठेवुन प्रयत्न केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अधिनियमातील तरतुदीनुसार कर्तव्याचे पालन केलेले नाही. यावरुन त्यांचे माहिती अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत सरळ व सोपे असुनही जन माहिती अधिकारी यांचा त्यासंदर्भात कोणताही प्रतिसाद दिसुन आला नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास दिसुन आले.

माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे.

प्रस्तुत प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थी यांनी द्वितीय अपील क्र. ३३९५/२०१५ या अपीलाची माहिती मिळाली आहे त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे या अपीलाबाबत कसलीही तक्रार राहणार नाही. मी आपणांकडे केलेले अपील परत घेत आहे असे लेखी स्वरुपात निवेदन आयोगाच्या पटलावर आहे. ही बाब विचारात घेऊन सदर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असुन खलीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

४. आयुक्त, लातुर शहर महानगरपालिका, लातुर यांनी जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

दिनांक:२४.११.२०१६

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.-6559- दि.-27-12-16 (अपील क्र.३३९५/२०१५)

प्रत,

आयुक्त, लातुर शहर महानगरपालिका, लातुर यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३३४७/२०१५

श्री. अंकुश रामचंद्र चामे, : अपिलार्थी
मु. पो. चिखली, ता. अहमदपुर, जि. लातुर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, अहमदपुर, जि. लातुर. : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातुर. : उत्तरवादी

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २४.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. आर. जी. लंगे हे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.०८.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये पिंपळदरी, किनगांव, अंधोरी, अहमदपुर रोड रस्ता कामाचे बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी दि.०४.०४.२०१५ रोजी प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "दिशाभुल करणारे पत्र दिले" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २७.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी दि. २५.०८.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "तीन महिन्यांनी सुनावणी घेऊन दिशाभुल करणारा आदेश दिला" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

"१) पिंपळदरी, किनगांव, अंधोरी, अहमदपुर या रोड रस्त्याचे दुरुस्ती, खड्डे बुजविणे व चिखली जवळ सिमेंट कॉंक्रेट रोड रस्ताचे काम आपल्या विभागामार्फत केले किंवा कंत्राटदारामार्फत केले याची माहिती द्या. २ ) रोड रस्त्याचे ज्या भागात प्रत्यक्षात काम केले त्या भागाचे निश्चित स्थळची माहिती द्या. ३) रोड रस्त्याचे दुरुस्तीची पध्दती व सुरु याची माहिती द्या व वापरलेल्या साहित्याच्या मिश्रणाची माहिती द्या. ४) सदर रोड रस्ता कामाची मोजणी पुस्तकाची प्रत द्या. ५) सदर रोड रस्ता स्केचची प्रत व अंदाजाच्या तपशीलाची प्रत व कार्यादेशाची प्रत द्या. ६) सदर रोड रस्ता खाड्डे बुजविणे व सिमेंट कॉंक्रेट करणे, काम सुरु केल्याची व काम पुर्ण केल्याच्या तारखेची माहिती द्या ७) सदर रोड रस्ता व सिमेंट कॉंक्रेट कामासाठी प्रदान केलेली रक्कम व त्याच्या देयकाची माहिती द्या. ८) सदर रस्ता दुरुस्तीच्या कामाची व सिमेंट कॉंक्रेट कामाची हमी खंड लागु केल्याची माहिती द्या. ९) सदर रस्ता कामाच्या कंत्राटात हमीचा खंड असेल तर हमी खंडाची व त्याच्या शर्तीची तरतुद असलेल्या दस्ताऐवजाची प्रत द्या."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी तीच माहिती दि. १३.१२.२०१४ रोजीच्या माहिती अधिकारात मागविलेली होती असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास

आणुन दिले. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे लेखी युक्तीवाद आयोगासमोर सादर केला.

"श्री. चामे अंकुश रामचंद्र मु. चिखली यांचा अर्ज दि. १३.१२.२०१४ च्या माहिती अधिकार खालील अर्जान्वये पिंपळदरी, अंधोरी, अहमदपुर रस्त्याची माहिती मागविण्यात आलेली होती. त्यानुसार पत्र क्र. लेखा/२१ दि. १५.०१.२०१५ अन्वये काम वाटप झालेले ठेकेदाराचे नांव, कार्यारंभ आदेश व अंदाजपत्रकासह १ ते ४४ पाने इतकी माहिती अर्जदारास देण्यात आली आहे. तसेच संबंधीत अर्जदाराने माहितीचा अर्ज दि. १३.१२.२०१५ नुसार दि. ०६.०२.२०१५ अन्वये लेखी नमुद केले की, सदरील प्रकरणी आपल्याकडुन पुर्णत: माहिती मिळाली असुन आता माझी माहिती मागितल्याबाबत कसलीही तक्रार नाही करीता माझा अर्ज निकाली काढण्यात यावा. असे लेखी देऊन सुध्दा अर्जदाराने दि. ३१.०१.२०१५ च्या अर्जान्वये प्रथम अपील केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातुर यांनी अर्जदारास मागणी केलेली माहिती दिलेली आहे असा जन माहिती अधिकारी यांचा युक्तीवाद व त्यापृष्ठयर्थ दस्तऐवज विचारात घेऊन दि. १०.०२.२०१५ रोजी सदर प्रथम अपील निकाली काढलेले आहे. त्यानंतर संबंधीत अर्जदाराने पुन्हा त्याच रस्त्याची म्हणजे पिंपळदरी, किनगांव, अंधोरी, अहमदपुर रस्त्याची दुसऱ्यांदा माहिती, माहिती अधिकाराअंतर्गत दि. ०८.०३.२०१५ अन्वये या कार्यालयास मागणी केलेली आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी यापुर्वी दि. १३.१२.२०१४ रोजी सदरील माहिती मागणी केलेली होती व ती त्यांना कार्यालयाकडुन देण्यात आलेली आहे तसेच अर्जदाराचे दि. ०६.०२.२०१५ च्या अर्जानुसार त्यांचा माहितीचा अर्ज निकाली काढलेला आहे असे दि.०४.०४.२०१५ च्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रतिसाद दिलेला आहे.तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा जन माहिती अधिकारी यांची कृती योग्य असल्याचे नमुद करुन त्यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे."

राज्य माहिती आयोग औरंगाबाद

जन माहिती अधिकारी यांचा वरील युक्तीवाद व त्यापृष्ठयर्थ सादर केलेले दस्तऐवज विचारात घेता अपिलार्थी यांनी एकच माहिती पुन्हा मागणे यामागे अपिलार्थी यांचे काय स्वारस्य आहे हे कळु शकलेले नाही. त्यामुळे एकदा दिलेली माहिती परत-परत देणे संयुक्तिक नसुन

यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाचा मनुष्यबळ व वेळ वाया जातो याचे भान अपिलार्थीने ठेवलेले दिसुन येत नाही. सारांशाने सदर अपील निकाली काढण्यास पात्र ठरत आहे.या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.-6570- दि.-27-12-16- (अपील क्र.३३४७/२०१५)

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०५७/२०१५

श्री. प्रल्हाद उत्तमराव मुगळे, : अपिलार्थी
प्लॉट नं. ८४, सुतमील कम्पाऊंड, सुतमील रोड, लातुर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, : उत्तरवादी
परिमल माध्यमिक विद्यालय, नारायण नगर, लातुर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), : उत्तरवादी
जिल्हा परिषद, लातुर

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. श्रीनिवास बाबुराव पाटील व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. आर. बी. ढाकणे हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२३.०१.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये परिमल माध्यमिक विद्यालयाची विविध विषयाबाबत माहिती

मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०२.२०१५ रोजी प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "चुकीची माहिती देणे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २३.०३.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २८.०४.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "अपुर्ण व चुकीची माहिती देणे" असे नमूद केलेले आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

"१) संच मान्यता, वैयक्तिक मान्यता, पटपडताळणी अहवाल, वार्षिक तपासणी अहवाल. २) तुकडी मान्यता आदेश ३) अनुदान मंजुरी ४) रोष्टर ५) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थिती पट २००५ ते २०१४-१५ ६) शाळा मान्यता आदेश"

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या म्हणण्यामध्ये व जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यामध्ये तफावत दिसुन येत आहे. तसेच अपिलार्थी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले की, मला अपुर्ण माहिती दिली आहे व जन माहिती अधिकारी हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम-२००५ चे नियम ३ चा ऊहापोह करीत आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातुर यांनी अपिलार्थी यांना जी माहिती दिली त्याच्या खुलाशासह पुढील सुनावणी तारखेस हजर राहावे. त्यानंतर कलम ७ (१) व १९ (६) च्या भंगाचा परामर्श करण्यात येईल.

आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद लातुरच्या माध्यमिक शिक्षण विभागामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी म्हणुन अधिक्षक वर्ग -२ दर्जाचे अधिकारी हे नियुक्त केलेले आहेत. त्या विभागाकडील प्रथम अपील सुनावणी अधिक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग, माध्यमिक, जिल्हा परिषद, लातुर हे घेत असल्याचे दिसते. वस्तुत: अधिक्षक हे शिक्षणाधिकारी, माध्यमिक, जिल्हा परिषद, लातुर या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी होऊ शकतात. त्यामुळे ते प्रथम

अपीलीय अधिकारी म्हणुन सुनावणी घेऊ शकत नाही. सदर सुनावणी ही शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांनी घेणे अपेक्षित आहे. यासंदर्भात आयोगाचे द्वितीय अपील क्र. २३३३/२०१५ सुनावणी दि. २२.०९.२०१५ मध्ये यथोचित सुचना दिलेल्या आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांना कलम १९ (८) (क) नुसार कळविण्यात येत आहे.

**अंतरीम आदेश**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांनी प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांना जी माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली त्याच्या खुलाशासह पुढील सुनावणीस उपस्थित राहावे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाशाने कळविण्यात येईल.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ औरंगाबाद ★

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.----6568---- दि.----27-12-16---- (अपील क्र.३०५७/२०१५)

प्रत,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातुर

यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(६७)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०५३/२०१५

श्री. विश्वंभर निवृत्ती चव्हाण, : अपिलार्थी
मु. पो. रामेश्वर, ता. जि. लातुर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत कार्यालय, रामेश्वर, ता. जि. लातुर.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, लातुर.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीबाबतची चौकशी करुन त्याचा अहवाल आयोगास सादर करावा असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांना कलम १९ (८) (क) अन्वये कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१०.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये हनुमंत रघुनाथ चव्हाण व हनुमंत तुळशीराम कराड यांचे ८ (अ) चे

उतारे मिळणे बाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्‌नंतर "वैयक्तिक" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. १०.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "मी मागितलेली माहिती मला दिली नाही." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"१) हनुमंत रघुनाथ चव्हाण यांचे नावाने १९९४-९५ चे ८ (अ) मिळणे बाबत २) हनुमंत तुळशीराम कराड यांच्या नावोन या वर्षाचे (वाचनालयाचे) ८ (अ) उतारे मिळणे बाबत. ३) हनुमंत तुळशीराम कराड यांनी ग्रामपंचायतचे बांधकाम परवाना घेतला आहे का याची माहिती मिळणे बाबत व घेतला असे तर त्या बांधकाम परवान्याची झेरॉक्स प्रत ग्रामपंचायत सही शिक्याने मिळणे बाबत. ४) हनुमंत तुळशीराम कराड (वाचनालयाच्या) यांच्या दक्षिण बाजुकडुन असलेला ग्रामपंचायतचा रस्ता किती फुट रुंदीचा आहे, याची माहिती मिळणे बाबत. "

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ दिसुन येत असुन त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे सहज सुलभ होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेऊन आदेश पारीत केलेले दिसुन आले नाही.

माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>**आदेश**</u>

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांनी जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नावे निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

(वसंत द. पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

दिनांक:२४.११.२०१६

---

जावक क्र.-6572- दि.-27-12-16

(अपील क्र.३०५३/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३१९४/२०१५

श्री. भागवत दगडु जाधव, : अपिलार्थी
सिध्दार्थ नगर, अहमदपुर, जि. लातुर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (पुरवठा), : उत्तरवादी
तहसिल कार्यालय, अहमदपुर, जि. लातुर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, : उत्तरवादी
अहमदपुर, जि. लातुर

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ०८.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. रविंद्र औदुंबर पारसेवार व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणुन सुध्दा श्री. रविंद्र औदुंबर पारसेवार हेच उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि. ०६.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मौजे गादेवाडी येथील स्वस्त धान्य दुकानाच्या विक्री संबंधी माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०४.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "दि. ०६.०४.२०१५ रोजीच्या अर्जाची माहिती न दिल्याने अपील करीत आहे." असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २३.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ३०.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "जन माहिती अधिकारी यांनी विनिर्दिष्ठीत वेळेत सदर माहिती उपलब्ध करुन दिली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. ३०.०७.२०१५ रोजी आदेश देऊनही माहिती अद्याप उपलब्ध करुन दिलेली नाही." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"मौजे गादेवाडी ता. अहमदपुर, जि. लातुर येथील स्वस्त धान्य व किरकोळ (रॉकेल) दुकानदार यांनी दि. ०१.०१.२०१५ ते आजपर्यंत राशन व रॉकेल विक्री केल्यासंबंधी स्टॉक रजिष्टर विक्री रजिष्टर तक्रार नोंद वही, विक्री पावत्या भेट रजिष्टरच्या मुळ प्रती मा. अ अ. २००५ च्या कलम ४ (ब) नुसार प्रत्यक्ष पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावी."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थीस प्रथम अवलोकनासाठी कळविले. तथापी, त्याची निश्चित तारीख कळविल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही रास्त भाव दुकानदाराची दिसुन येते. अपिलार्थी यांनी दि. २३.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसुन येते. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. ३०.०७.२०१५ रोजी प्रथम अपीलीय आदेश निर्गमित केलेले आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेला दिसुन येतो.

"अपिलार्थी यांचे अपील मंजुर करण्यात येते. संबंधीत रास्त भाव दुकानदार यांनी अपिलार्थी यांना पाहणीसाठी माहिती उपलब्ध करुन द्यावी"

अपिलार्थीस दि. २२.११.२०१६ रोजी प्रत्यक्षात माहिती उपलब्ध करुन दिली व त्यावर अपिलार्थी यांचे समाधान झाल्याचे त्यांनी कळविलेले आहे. त्यामुळे सदर अपील निकाली काढण्यास

पात्र ठरते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब केला म्हणुन कलम ७ (१) चा भंग झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांचा खुलासा घेणे आयोगास आवश्यक वाटते. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. जिल्हाधिकारी, लातुर यांनी जन माहीती अधिकारी यांचे नाव निश्चित करुन सदर आदेशाची प्रत त्यांच्यावर तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र. 6561 दि. 27-12-16 (अपील क्र.३१९४/२०१५)

प्रत,

जिल्हाधिकारी, लातुर यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३४४३/२०१५

श्री. उमाकांत धोंडीराम डीगे, : अपिलार्थी
मु. पो. अंधोरी, ता. अहमदपुर, जि. लातुर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, अहमदपुर, जि. लातुर.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती, अहमदपुर, जि. लातुर.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ३०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. नल्ले एस. बी. उपस्थित आहेत. व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.१४.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जा. क्र. पंसाअ/पंचायत/ग्रापवि/कावी-५०७ / २०१५ समिती कार्यालय अहमदपुर दि. ०८.०५.२०१५ या संचिकेबाबत (सन २०१४-१५ पासुन ते आजपर्यंत) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्‌नंतर "माहिती अधिकारी साहेबांनी विर्निदिष्टीत केलेल्या वेळेत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही." असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ३०.०६.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०७.०८.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती अधिकारी साहेबांनी विर्निदिष्टीत केलेल्या वेळेत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती पासुन वंचित ठेवले आहे." असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती शीघ्र टपालाने मागितलेली आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

"१) ग्रा. वि. अ. श्री. कदम हे जाणीवपुर्वक जन्म नोंदणी रजिस्टरला जन्माची नोंद करुन प्रमाण्पपत्र देत नाहीत तरी नोंद करुन प्रमाणपत्र मिळणे बाबत. उमाकांत धोंडीराम डीगे रा अंधोरी ता. अहमदपुर यांनी गटविकास अधिकारी अ. पुर यांना विनंती अर्ज केला होता. त्या जा. क्र. पंसाअ/पंचायत/ग्रापवि/कावी-५०७/२०१५ समिती कार्यालय, अहमदपुर दि. ०८.०५.२०१५ या संचिकेची माहिती छायांकित प्रतीत साक्षांकित करुन देण्यात यावी ही विनंती. "

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार चौकशी अहवाल मागितलेला आहे. सदर चौकशी अहवाल यथावकाशाने दि. ०८.०५.२०१५ रोजी गट विकास अधिकारी यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांना पाठविलेला दिसतो. सदर चौकशी अहवालात जाबजबाब व इतर बाबी प्रदर्शित केलेल्या आहेत. अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर दि. ०७.०८.२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आलेली दिसते. सदर सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी यांना २० दिवसांत माहिती विनाशुल्क देण्याचे आदेशात नमुद केलेले आहे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे. तथापी, प्रस्तुत प्रकरणात कलम ७ (१) व १९ (६) चा जाणीवपुर्वक भंग झालेला

आढळुन आला नाही. त्यामुळे सदर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असुन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.------------- 6578 दि.-------- 27-12-16

(अपील क्र.३४४३/२०१५)

(67)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३४४४/२०१५

श्री. बालाजी विठ्ठलराव वाघमारे, : अपिलार्थी
मु. पो. अंधोरी, ता. अहमदपुर, जि. लातुर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, अंधोरी, ता. अहमदपुर, जि. लातुर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, अहमदपुर, जि. लातुर

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ३०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. कदम एन. एम. व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. नल्ले एस. बी. हे सर्व उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२७.०४.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये सन २००४ पासुन आज दिनांकापर्यंत ग्रामपंचायतची ८-अ बाबत

माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती वेळेत उपलब्ध करुन दिली नाही" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. ०७.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर दि. ०७.०८.२०१५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या अपीलावर निर्णय दिलेला नाही. तसेच माहिती अधिकारी यांनी माहिती वेळेत उपलब्ध करुन दिली नाही" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

> "सन २००४ पासुन आज दिनांकापर्यंत १) ग्रामपंचायतचा ८-अ ची दर किती वर्षांनी आकारणी केली जाते? याबाबतची माहिती शासन निर्णय व वरीष्ठ कार्यालयाच्या आदेशाच्या प्रती. २) ८-अ ला जागेची नोंद करणेबाबत किती फिस आकारली जाते? याबाबतची माहिती शासन निर्णय व वरीष्ठ कार्यालयाच्या आदेशाच्या प्रती. ३) सद्या अस्तित्वात असलेला ८-अ कधी व कोणत्या दिनांकापासुन अस्तित्वात आला? त्या ग्रामसभेच्या मासिक सभेच्या प्रती. ४) नव्याने ८-अ अस्तित्वात आणण्याचे निकषाबाबत माहिती. ५) नव्याने ८-अ अस्तित्वात आणल्यानंतर जुना ८-अ जतन करुन ठेवला जातो का? की, नष्ट केला जातो याबाबत माहिती ६) सन १९९० -९१ च्या ८-अ ची मिळकत नंबर २०४/०२ च्या पानाची प्रत."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात एकुण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसुन येते. सदर माहितीचा कालावधी जवळपास १० वर्षांचा आहे. मुद्या क्र. ४ व ६ वगळता इतर मुद्यांची माहिती प्रश्नार्थक व प्रबोधनात्मक स्वरुपाची दिसुन येत आहे. आयोगाने

अपिलार्थी यांना माहिती कशी हवी असे विचारले असता, त्यांनी मला नोंदणीकृत टपालाने माहिती हवी आहे असे आयोगास सांगितले. त्यानंतर आयोगाने जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश दिले की, त्यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. ४ व ६ ची माहिती ही नोंदणीकृत टपालाने पाठवावी व अपिलार्थी यांनी ती तपासुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांचेकडुन कलम ७ (१) चा जाणीवपुर्वक भंग झाल्याचे आयोगाचे निरिक्षण आहे. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, श्री. एन. एम. कदम हे प्रस्तुत प्रकरणी जबाबदार असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणुन देण्यात आले आहे. सबब, सदर अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत असुन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी श्री. एन. एम. कदम यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, लातुर यांनी जन माहीती अधिकारी श्री. एन. एम. कदम यांच्यावर सदर आदेशाची प्रत तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

राज्य माहिती आयोग

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.---6573--- दि.---27-12-16

(अपील क्र.३४४४/२०१५)

प्रत,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, लातुर यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(7!)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३२७५/२०१५

श्री. अहमद रसुल शेख, : अपिलार्थी
मु. तुरुकवाडी, पो. रापका, ता. शिरुर अनंतपाळ,
जि. लातुर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत तुरुकवाडी, ता. शिरुर अनंतपाळ,
जि. लातुर.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि. लातुर.

राज्य माहिती आयोग ... औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १५.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सर्व अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांनी तात्काळ आयोगास पाठवावा असे त्यांना कलम १९ (८) (क) नुसार कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.३०.०५.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालय, तुरुकवाडी चे बँक खात्याबाबत (दि.

०१.०१.२०१२ ते आजतागायात) माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "माहिती न दिल्यामुळे" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ०४.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २८.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "माहिती न मिळाल्यामुळे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"१) ग्रा. पं. चे एकुण किती खाते कोणकोणत्या बँकेत आहेत, त्या सर्व खात्याच्या पासबुक झेरॉक्स, बँक स्टेटमेंट, चेकबुक कॉउन्टर स्लीप झेरॉक्स, चेक कोणाच्या नावाने कोणत्या कारणासाठी दिला? संबंधीत सर्व कागदोपत्री पुराव्यासहित, ग्रा. पं. किर्दची झेरॉक्स, एकुण किती फेरफारची नोंद घेण्यात आली ? ती कोणत्या मासिक बैठकीत घेण्यात आली? किती कर आकारण्यात आला? व ते पैसे कोणत्या खात्यामध्ये जमा करण्यात आले? व नंतर पैशाचे काम झाले संबंधीत सर्व कागदपत्रासहित."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवजानुसार असे दिसुन येते की, जन माहीती अधिकारी यांनी अपीलार्थी यांचा माहीतीचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन त्यांना मुदतीत माहीती पुरविण्यास्तव सकारात्मक दृष्टिकोन ठेवुन प्रयत्न केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास विचारणा केलेली माहिती आठ दिवसांत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असे नमुद करुन अपील निकाली काढलेले आहे. त्यानंतरही अपिलार्थीस माहिती पुरविलेली नसल्याने जोडपत्र "क" मध्ये तथ्यांश दिसुन येतो. ही बाब विचारात घेता सदर अपील मंजुरीस पात्र आहे. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावर सदर आदेशाची प्रत तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.---6656---- दि.-28-11-----

(अपील क्र.३२७५/२०१५)

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. २९४६/२०१५

श्री. शेख मौलासाब पि. नन्हेसाब, : अपिलार्थी
रा. कंधार वेस, दबीरपुरा, उदगीर, जि. लातुर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी नगरपरिषद कार्यालय, उदगीर, जि. लातुर : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, उदगीर, जि. लातुर : उत्तरवादी

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १३.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थींचे विधीज्ञ ॲड. एस. पी. ढोबळे हे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. त्यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल जिल्हाधिकारी, लातुर यांनी तात्काळ आयोगास पाठवावा असे त्यांना कलम १९ (८) (क) नुसार कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२३.०३.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये संचिका क्र. उनप-५/३एआर४९६/१३ संदर्भात माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१२/९८९प्र.क्र.४७९/६ चा चुकीचा अर्थ काढुन माझा अर्ज नामंजुर करण्यात आला" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक ३०.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०८.०७.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "प्रथम अपीलाच्या निकालात एका आठवडया माहिती देण्याचे आदेशीत करुनही आजपर्यंत माहिती न दिल्यामुळे" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे.

"संचिका क्र. उनप-५/३एआर४९६/१३ ची संपुर्ण संचिकेची (सर्वच कागदपत्रे) नकलेची मला कोर्ट कामासाठी अत्यंत आवश्यकता आहे. तरी देण्याची तसदीक घ्यावी."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७.१०.२०१४ च्या शासन परिपत्रकाचा संदर्भ देऊन माहिती देता येत नसल्याचे दि. २९.०४.२०१५ च्या पत्रानुसार अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील आदेशामध्ये खालीलप्रमाणे निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य करण्यात आले आहे.

"अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांची स्वतःची जागेचे नामांतर झालेले संचिका त्यांनी स्वतः मागणी केलेली आहे. तरी त्यांना एक आठवडयात देण्यात यावी."

आयोग प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या भुमिकेशी सहमत असुन जन माहिती अधिकारी यांचे दि. २९.०४.२०१५ रोजीचे पत्र बाजुला सारण्यात येत आहे. परिणाम स्वरुप संबंधीत जन माहिती अधिकारी यांची कृती कलम ७ (१) चा भंग करणारी ठरते. प्रस्तुत प्रकरणी श्री. एम. एस.

हालकुडे हे जन माहिती अधिकारी असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणुन दिले आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी श्री. एम. एस. हालकुडे यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. जिल्हाधिकारी, लातुर यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावर सदर आदेशाची प्रत तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.---6655--- दि.---28-12-16

(अपील क्र.२९४६/२०१५)

प्रत,

जिल्हाधिकारी, लातुर यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(७४)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३०६५/२०१५

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

श्री. मोतीराम गणपती राठोड व इतर, : अपिलार्थी
मु. पो. सोमनाथपुर, ता. उदगीर, जि. लातुर-४१३५१७

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी
ग्रामपंचायत, सोमनाथपुर, ता. उदगीर, जि. लातुर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), : उत्तरवादी
पंचायत समिती, उदगीर, जि. लातुर

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. २६.०८.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी श्री. प्रकाश यलाप्पा पवार व प्रथम अपीलीय अधिकारी श्री. यु. एम. केंद्रे हे सर्व उपस्थित आहेत.

प्रस्तुत अपीलाच्या सुनावणी दरम्यान जन माहीती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहीती जवळपास २० वर्षापुर्वीची असल्याने ती ग्रामपंचायतीस उपलब्ध नाही व तसे अपिलार्थीस सुध्दा कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दुजोरा दिला.

प्रकरणातील वर नमुद वस्तुस्थिती विचारात घेऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>अंतरीम आदेश</u>**

वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमुद केल्यानुसार सदर माहितीचा शोध घेऊन १५ दिवसाचे आत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. प्रसंगी सदर माहिती पंचायत समिती स्तरावर सुध्दा असु शकते व आढळ होत नसल्यास तसे शपथपत्र जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर करावे. त्याचप्रमाणे पुढील सुनावणीच्या वेळेस गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि. लातुर यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत असुन सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.-6654- दि.-29-12-16

(अपील क्र.३०६५/२०१५)

प्रत,

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि. लातुर यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

7/1

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३४५३/२०१५

श्री. संतोष तुळशीराम दळवी,
रा. हत्ता नाईक, ता. सेनगांव, जि. हिंगोली : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
गजानन प्राथमिक आश्रम शाळा, हत्ता नाईक,
ता. सेनगांव, जि. हिंगोली : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,
समाजकल्याण विभाग, जि. हिंगोली : उत्तरवादी

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. १०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. त्यांच्या विनाअनुमती अनुपस्थितीची चौकशी करुन त्याचा अहवाल प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, औरंगाबाद यांनी तात्काळ आयोगास पाठवावा असे त्यांना कलम १९ (८) (क) नुसार कळविण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२७.०१.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये गजानन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, हत्ता

नाईक यांच्यासदर्भात माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला दिसुन येत नाही.

तद्नंतर "अर्जदारास माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याबाबत" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दिनांक १०.०४.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहिती अप्राप्त" असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिश: मागितलेली आहे.

> "लक्ष्मी शिक्षण प्रसारक मंडळ, लिंगदरी, ता. सेनगांव, जि. हिंगोली अंतर्गत गजानन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, हत्ता नाईक ता. सेनगावं, जि. हिंगोली या शैक्षणिक संस्थेबाबतची खालील माहिती. १) संस्थेमधील कर्मचाऱ्यांची यादी २) संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या शिक्षणासंबंधी सर्व माहिती जसे की, ते कुठे-कुठे शिकलेले आहे? व केव्हाचे उत्तीर्ण झाले आहे? ३) आश्रम शाळेमध्ये निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांची सन २००२ पासुन ते २०१५ पर्यंतची यादी ४) संस्थेमधील कर्मचाऱ्यांची नियूक्त केल्याच्या तारखेबाबतची माहिती ५) संस्थेमधील कर्मचाऱ्यांनी आतापर्यंत उचलेल्या पेमेंटचे स्टेटमेंट. ६) संस्थेमध्ये पुरविल्या जाणाऱ्या सर्व सुविधांबाबत माहिती लेखी स्वरुपात देणे."

राज्य माहिती आयोग
खंडपीठ औरंगाबाद

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, जन माहीती अधिकारी यांनी अपीलार्थी यांचा माहीतीचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन त्यांना मुदतीत माहीती पुरविण्यास्तव सकारात्मक दृष्टिकोन ठेवुन प्रयत्न केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अधिनियमातील तरतुदीनुसार कर्तव्याचे पालन केलेले नाही.

माहीतीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचे पदनिर्देशन केलेले असते. अर्जदाराने मागितलेली माहीती ३० दिवसाच्या आत पुरविता आली नाही, किंवा अपुरी, चुकीची व दिशाभुल करणारी असेल तर अर्जदाराला प्रथम अपिलाद्वारे प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाद मागता येते. अशावेळी प्रथम अपिलीय अधिकारी हे जन माहीती अधिकाऱ्याला अचुक व पुर्ण माहीती पुरविण्यासाठी सांगु शकतो. अर्जदाराला माहीती मिळवुन देण्याच्या कामी अपिलीय अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्यामुळे याठिकाणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन केलेले नसल्याचे आयोगाचे निरीक्षण आहे. यावरुन दोन्ही अधिकाऱ्यांचे माहितीचा अधिकार अधिनियम- २००५ बाबतचे गांभीर्य स्पष्ट होते. परिणामी संबंधीतांची कृती कलम ७ (१) व १९ (६) चा भंग करणारी आहे. त्यामुळे सदर अपील मंजुरीस पात्र ठरते. या निष्कर्षासह आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदर अपील मंजुर करण्यात येत आहे.

२. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमुद प्रमाणे परिपुर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) चा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

४. संबंधीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणात सुनावणीचे आदेश निर्गमित न केल्यामुळे कलम १९ (६) चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. कलम १९ (८) (ग) व २० (२) नुसार त्यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करण्यात येऊ नये? याचा खुलासा त्यांनी (नांव व पदनामासह) आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष उपस्थित राहुन करावा.

५. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, औरंगाबाद यांनी संबंधीत जन माहीती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावर सदर आदेशाची प्रत तामील करावी व त्याची प्रत अभिलेख्यात जतन करुन ठेवावी.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

---

जावक क्र.------------- 6660 दि.------------- 28-12-16

(अपील क्र.३४५३/२०१५)

प्रत,

प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, खोकडपुरा, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(78)

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद -४३१००१

अपील क्र. ३४१२/२०१५

श्री. विजय ज्ञानबा राऊत, : अपिलार्थी
मु. कानडखेडा (खु), पो. कनेरगांव (नाका),
ता. जि. हिंगोली- ४३१५१३

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली ग्रामिण. : उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, हिंगोली. : उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक २४.११.२०१६)**

**निर्णय**

अपिलार्थी यांनी दि. ३०.०९.२०१५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. २४.११.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ०९.११.२०१६ रोजीच्या सुनावणी नोटिसीद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणुन पोलीस उप निरिक्षक, हिंगोली हे उपस्थित आहेत. व प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये दि.२३.०६.२०१५ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये मौजे खरबी ता. जि. हिंगोली संबंधीत गावातील दरोडा व चोरी

संबंधीत केसबाबत माहिती मागितलेली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३०.०७.२०१५ अन्वये प्रतिसाद दिलेला दिसुन येत आहे.

तद्नंतर "अ) जाणीवपुर्वक नियमाप्रमाणे ३० दिवसात माहिती दिली नाही. ब) जाणीवपुर्वक माझ्या मुलभुत अधिकाराचे हनन केले. क) जाणीवपुर्वक भ्रष्टाचार वाढीस प्रोत्साहन. ड) जाणीवपुर्वक न्यायापासुन वंचित ठेवले करीता तात्काळ माहिती मिळावी म्हणुन" असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये दि. २३.०७.२०१५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०६.०८.२०१५ रोजी निर्णय पारीत केलेला दिसुन येत आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे कलम १९(३) अन्वये वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनात "अ) जाणीवपुर्वक नियमाप्रमाणे ३० दिवसात माहिती दिली नाही. ब) जाणीवपुर्वक माझ्या मुलभुत अधिकाराचे हनन केले. क) जाणीवपुर्वक भ्रष्टाचार वाढीस प्रोत्साहन. ड) जाणीवपुर्वक न्यायापासुन वंचित ठेवले करीता तात्काळ माहिती मिळावी म्हणुन " असे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार खालीलप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली आहे.

> "मौजे खरबी ता. जि. हिंगोली या गावातील ग्रामस्थावर दरोडा, चोरी व लुटमार संबंधीत सन १९९१ जाने. ते ०१ जुलै २०१५ पावेतो दाखल केलेले दरोडा, चोरी आणि लुटमार संबंधीत गुन्हे, त्यापैकी सजा (शिक्षा) पात्र झालेल्या एकुण व्यक्ती आणि आणि निर्दोष झालेल्या व्यक्ति संबंधीत सविस्तर माहिती प्रमाणित स्वरुपात व सत्य प्रतीत देणे."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध दस्तऐवज व युक्तीवादानुसार असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी उप विभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली यांना जी माहिती मागितलेली होती ती त्यांना देण्यात आलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तीवाद केला व त्यापृष्ठयर्थ दस्तऐवज आयोगास दर्शविले. यावर अपिलार्थी यांना विचारणा केली असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी केवळ एकाच ग्रामिण पोलीस स्टेशनमधील माहिती दिली आहे. कळमनुरी, औंढा (नागनाथ), वसमत

ची माहिती दिली नाही. यावर आयोगाने अपिलार्थी यांना संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाला स्वतंत्र माहितीचा अर्ज करावा अशी सुचना केली. या निष्कर्षासह प्रस्तुत अपील निकाली काढण्यास पात्र ठरत असल्याचे आयोगाचे निरिक्षण आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ औरंगाबाद

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**दिनांक:२४.११.२०१६**

---

जावक क्र.--6589--- दि.--27-12-15

(अपील क्र.३४१२/२०१५)